# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ सोमवार १ जून २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०







## RCB ने जिंकले सलग दुसरे विजेतेपद

### फायनलमध्ये कोहलीचा 'विराट' शो

### गुजरातचा दारुण पराभव



**अहमदाबाद/वृत्तसंस्था-** IPL २०२६ च्या अंतिम सामन्यात RCB ने गुजरात टायटन्सचा पराभव करून सलग दुसरे विजेतेपद पटकावले.

IPL २०२६ च्या अंतिम सामन्यात विराट कोहलीने पुन्हा एकदा आपली छाप सोडत रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूला ऐतिहासिक विजय मिळवून दिला. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या या लढतीत RCB ने गुजरात टायटन्सचा पराभव करत सलग दुसऱ्यांदा IPL ट्रॉफीवर नाव कोरले. सामन्यात गुजरात टायटन्सने प्रथम फलंदाजी करत २० षटकांत ८ बाद १५५ धावा केल्या. संघासाठी वॉशिंग्टन सुंदरने सर्वाधिक झुंज देत ३७ चेंडूत ५० धावांची खेळी केली. मात्र त्याला इतर फलंदाजांची साथ मिळाली नाही. शुभमन गिल १०, साई सुदर्शन १२ आणि जोस बटलरही कमी धावा करुन बाद झाल्याने गुजरातला मोठी धावसंख्या उभारता आली नाही.

RCB च्या गोलंदाजांनी सुरुवातीपासूनच वर्चस्व राखले. जोश हेजलवूड आणि भुवनेश्वर कुमार यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले, तर रसिख सलाम डारने तीन विकेट्स घेत गुजरातच्या फलंदाजीला खिंडार पाडले. कृणाल पंड्यानेही एक महत्त्वाचा बळी घेतला.

१५६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना RCB ला विराट कोहलीने दमदार सुरुवात करून अर्धशतक ठोकले. विशेष म्हणजे, IPL कारकिर्दीतील हे त्याचे सर्वात वेगवान अर्धशतक ठरले. आपल्या १९ व्या IPL हंगामात, तेही अंतिम सामन्या सारख्या दबावाच्या क्षणी, विराटने युवा टी-२० फलंदाजांनाही लाजवेल अशी फलंदाजी केली. कोहलीने अवघ्या ११.२ षटकांत संघाला ११३ धावांपर्यंत पोहोचवण्यात मोठी भूमिका बजावली. या हंगामात त्याने ६४८ धावा करत १६७.०१ च्या स्ट्राइक रेटने खेळ केला आहे. IPL २०२६ मध्ये ६०० हून अधिक धावा करणाऱ्या फलंदाजांमध्ये वैभव सूर्यवंशी आणि ईशान किशन यांच्यानंतर सर्वाधिक वेगाने धावा करणारा फलंदाज म्हणूनही त्याने आपली छाप सोडली.एकीकडे विराटचा अनुभव आणि दुसरीकड RCB च्या गोलंदाजांची शिस्तबद्ध कामगिरी यामुळे गुजरातला पुनरागमनाची संधीच मिळाली नाही.

# विधान परिषद : महायुतीचं जागावाटपाचं कोडं सुटलं

## भाजप ११, शिवसेना ४, राष्ट्रवादी २ जागा

**मुंबई/प्रतिनिधी** : विधान परिषदेच्या १७ जागांसह राज्यसभेच्या एका जागेसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा सोमवार अखेरचा दिवस आहे. जागावाटपावरून महायुतीत निर्माण झालेला तिढा रविवारी सुटला. महायुतीत भाजपच्या वाट्याला ११, शिवसेना शिंदे गटाला ४ आणि अजित पवार गटाला २ जागा मिळाल्या. दुसरीकडे महाविकास आघाडीने दोन दिवसांपूर्वीच आपले जागावाटप जाहीर केले होते. त्यानुसार काँग्रेस ८, शिवसेना ठाकरे गट ४ व शरद पवार गट ३ जागा लढविणार आहे; तर नाशिक आणि नांदेड या दोन जागांवरील तिढा कायम आहे.

### असे ठरले जागावाटप

**भाजप** : नागपूर, अहिल्यानगर, धाराशिव, जळगाव, सोलापूर, लातूर, नांदेड, अमरावती, वर्धा-गडचिरोली-चंद्रपूर, भंडारा-गोंदिया आणि सातारा-सांगली.

**शिवसेना (शिंदे गट)** : ठाणे, नाशिक, परभणी-हिंगोली आणि यवतमाळ.

**राष्ट्रवादी (अजित पवार गट)** : पुणे, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुग.

'सोलापूर, सांगली-सातारा भाजपकडे



स्थानिक स्वराज्य संस्थांमधून निवडून द्यायच्या १७ जागांच्या निमित्ताने गेले १५ दिवस राज्यातील राजकीय वातावरण तापलेले आहे. अधिकाधिक जागा लढविण्याचा भाजपचा आग्रह होता. मित्रपक्ष शिंदे गट ७ जागांसाठी आग्रहीहोता. त्यासाठी राज्यातील वाटाघाटीनंतर शिंदे यांनी थेट भाजपच्या केंद्रीय नेतृत्वासोबत चर्चा केली. मात्र, या वाटाघाटीनंतर शिंदे गटाला चार जागांवर समाधान मानावे लागले. ठाणे, नाशिक, परभणी-हिंगोली आणि यवतमाळ या मतदारसंघांचा समावेश आहे. शिंदे यांचा बालेकिल्ला ठाण्यासाठी कोकणच्या जागेवरील दावा सोडावा लागला.

**पुणे मतदारसंघ खेचण्यात राष्ट्रवादीला यश-** तीन जागांचा आग्रह धरणाऱ्या राष्ट्रवादी अजित पवार गटाला पुणे व रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग या दोनच जागांवर समाधान मानावे लागले आहे.

**महाआघाडीत पुणे राष्ट्रवादीकडेच** : महाविकास आघाडीतील जागावाटपामुसार काँग्रेसच्या वाट्याला नागपूर, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली, यवतमाळ, ☞(पान २ वर)

### रायगडचे पालकमंत्रिपद शिवसेनेकडे

या बदल्यात रायगडचे पालकमंत्रिपद शिंदे गटाच्या पदरात पडल्याचे सांगितले जात आहे. छत्रपती संभाजीनगर-जालना या एका जागेवर भाजप आणि शिंदे गटात शेवटपर्यंत रस्सीखेच झाली. ती जागा भाजपच्या वाट्याला आली आहे.

## पर्यटकांची कार खोल दरीत कोसळली, ८ जण ठार

### हिमाचल प्रदेशात भीषण दुर्घटना

**चंबा /वृत्तसंस्था-** हिमाचल प्रदेशातील चंबा जिल्ह्यातील पर्यटकांच्या वाहनाला भीषण अपघात घडला. साच पास मार्गावर कार खोल दरीत कोसळल्याने चालकासह आठ जणांचा मृत्यू झाला. कालाबन परिसरातील तीव्र वळणावर चालकाचे नियंत्रण सुटल्याने हा अपघात घडल्याचे सांगितले जात आहे. याप्रकरणी स्थानिक पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून पोलिसांनी पुढील कारवाईला सुरुवात केली.



मिळालेल्या माहितीनुसार, बंगळुरूहून आलेल्या एका कुटुंबाने पर्यटनस्थळ डलहौजी येथे टॅक्सी बुक केली. या कुटुंबासोबत दुसऱ्या एका पर्यटक कुटुंबानेही टॅक्सी शेअर केली. हे पर्यटक बैरागढ-किलाड मार्गे साच पासच्या दिशेने रवाना झाले. परंतु, साच पासहून बैरागढच्या दिशेने येत असताना कालाबन परिसरातील तीव्र वळणावर कार खोल दरीत कोसळली. बुक केलेली टॅक्सी नियोजित वेळेत डलहौजीला परत न आल्याने वाहन मालकाला संशय आला. त्याने जीपीएसच्या मदतीने☞(पान २ वर)

## ममता बॅनर्जी सुवेंदू अधिकारींविरोधात २ जून रोजी रस्त्यांवर उतरणार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** ममता बॅनर्जी यांचे भाचे आणि तृणमूल काँग्रेसचे खासदार अभिषेक बॅनर्जी यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या घटनेमुळे पश्चिम बंगालमधील राजकारण ढवळून निघाले आहे. या हल्ल्याच्या निषेधासाठी देशभरातील विरोधी पक्ष तृणमूल काँग्रेससोबत एकवटले आहेत.

ममता बॅनर्जी यांचे भाचे आणि तृणमूल काँग्रेसचे खासदार अभिषेक बॅनर्जी यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या घटनेमुळे पश्चिम बंगालमधील राजकारण ढवळून निघाले आहे. या हल्ल्याच्या निषेधासाठी देशभरातील विरोधी पक्ष तृणमूल



काँग्रेससोबत एकवटले आहेत. तर ममता बॅनर्जी यांनी या घटनेनंतर पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांच्याविरोधात आरपारच्या लढाईची तयारी सुरू केली आहे. तसेच याचाच एक भाग म्हणून ममता बॅनर्जी यांनी २ ☞(पान २ वर)

## अल्पवयीन मुलांच्या तस्करीत 'पोक्सो'अंतर्गतही खटला चालणार

### सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-**; अल्पवयीन मुलांच्या व्यावसायिक लैंगिक शोषणात सामील असलेल्या तस्करांवर आता अत्यंत कडक अशा 'पोक्सो' कायद्यांतर्गतही खटला चालवला जाऊ शकतो, असा महत्त्वपूर्ण निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. हा खटला भारतीय न्याय संहिता व अनैतिक व्यापार (प्रतिबंध) कायदा या दोन्ही कायद्यांमधील तरतुदींव्यतिरिक्त असेल.

न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, तस्करीच्या प्रकरणांमध्ये

### मानवी तस्करी रोखण्यासाठी कडक पाऊल




कोणते कायदे लागू करायचे, हे पीडितेचे वय, तस्करांनी वापरलेली पद्धत आणि शोषणाचे स्वरूप यावर अवलंबून असेल. प्रज्वला या स्वयंसेवी संस्थेने मानवी तस्करी रोखण्यासाठी व पीडितांच्या संरक्षणासाठी दाखल केलेल्या याचिकेवरील सुनावणीदरम्यान न्यायालयाने हा आदेश दिला.

**मुलांची संमती पूर्णपणे निरर्थक**

न्यायालयाने कायदेशीर चौकट स्पष्ट करताना सांगितले, जर एखाद्या गुन्ह्यात बळजबरी, फसवणूक किंवा गैरवापर झाला असेल, तर पीडितेच्या☞(पान २ वर)

## पट्टेदार वाघाच्या हल्ल्यात गुराख्याचा मृत्यू

### मृतदेह ५०० मीटरपर्यंत फरफटत नेला

**चंद्रपूर/प्रतिनिधी:** चिमूर तालुक्यातील मोटेगाव येथील जंगल परिसरात रविवारी (३१ मे) सकाळी एका पट्टेदार वाघाने गुराख्यावर हल्ला करून त्याला ठार केल्याची धक्कादायक घटना घडली. दिलीप जानबा नन्नावरे (वय ४५) असे मृत गुराख्याचे नाव आहे. वाघाने हल्ला केल्यानंतर नन्नावरे यांचा मृतदेह जंगलात तब्बल ५०० मीटरपर्यंत फरफटत नेल्याचे समोर आले असून, या घटनेमुळे संपूर्ण परिसरात कमालीची घबराट पसरली आहे.

मोटेगाव येथील रहिवासी दिलीप नन्नावरे हे नेहमीप्रमाणे आपल्या १५ ते २० बकऱ्या चारण्यासाठी तळोधी वनपरिक्षेत्रांतर्गत येणाऱ्या मोटेगाव जंगल परिसरातील कक्ष क्रमांक ३८ मध्ये गेले होते. मोटेगाव ते पेंढरी मार्गावरील बद्री पहाडीच्या खाली ते बकऱ्या चारत असताना, दबा धरून बसलेल्या वाघाने त्यांच्यावर अचानक हल्ला चढविला.



वाघाच्या हल्ल्यानंतर घाबरलेल्या बकऱ्या सैरावैरा पळत घरी परतल्या. मात्र, दुपार झाली तरी दिलीप घरी न आल्याने मुलाने त्यांच्या मोबाईलवर संपर्क साधला, पण प्रतिसाद मिळाला नाही. कुटुंबियांनी मुलांसह जंगलात शोध घेतला असता, तिथे दिलीप यांचे फाटलेले कपडे आणि कुऱ्हाड आढळून आली. मुलांनी गावात धाव घेत माहिती दिल्यानंतर ग्रामस्थांनी जंगलात मोठी शोधमोहीम राबवली. घटनास्थळापासून ५०० मीटर अंतरावर दिलीप यांचा छिन्नविच्छिन्न अवस्थेतील मृतदेह आढळून आला. विशेष म्हणजे, रविवारी सकाळी आठच्या☞(पान २ वर)

## ज्येष्ठ पार्श्वगायिका सुमन कल्याणपूर यांचे निधन


**मुंबई/प्रतिनिधी** : संगीताच्या नभात अनेक तारे चमकतात, पण काही ताऱ्यांचा प्रकाश हा कधीही न मावळणारा असतो. असाच एक दैवी आणि मखमली आवाज आज शांत झाला. आपल्या सुरांनी लाखो हृदयांचा ठाव घेणाऱ्या ज्येष्ठ पार्श्वगायिका सुमन कल्याणपूर यांचे वयाच्या ८९ व्या वर्षी निधन झाले आहे. ३१ मे २०२६ चा हा दिवस संगीत इतिहासात एका युगसमाप्तीचा दिवस म्हणून नोंदवला जाईल. आवाजाची जादू आणि एक स्वतंत्र ☞(पान २ वर)



## शाळेच्या फीसाठी छळ, विद्यार्थिनीने संपवलं जीवन

**अमृतसर/वृत्तसंस्था-** शाळेची फी भरण्याच्या दबावामुळे त्रस्त झालेल्या एका विद्यार्थिनीने विष घेतलं. तब्येत बिघडल्याने कुटुंबीयांनी तिला तातडीने रुग्णालयात दाखल केलं. मात्र उपचारादरम्यान आज तिचा मृत्यू झाला. मृत्यूआधी या विद्यार्थिनीने रुग्णालयात एक व्हिडीओ देखील बनवला होता, ज्यामध्ये तिने सांगितलं की, फीसाठी तिचा खूप मानसिक छळ करण्यात आला. यासाठी मुख्याध्यापिका तिला एका वेगळ्या खोलीतही घेऊन गेल्या होत्या. यामुळे त्रस्त होऊन तिने हे टोकाचं पाऊल उचललं.

विद्यार्थिनीने आपलं वय १७ वर्षे आणि नाव अमजोत कौर असल्याचं सांगितलं. ती अमृतसरमधील ८८ फीट रोड परिसराची रहिवासी होती. ही विद्यार्थिनी आपली मावशी सरबजीत कौर यांच्याकडे राहून शिक्षण घेत होती. व्हिडिओमध्ये ती आयसीयू मध्ये रडत रडत



सांगत आहे, '११ मे रोजी मला शाळेत बोलावण्यात आलं होतं, जिथे माझा खूप मानसिक छळ करण्यात आला. मला क्लासच्या ग्रुपमधूनही काढून टाकण्यात आलं होतं. माझ्या सध्याच्या परिस्थितीला शाळा प्रशासन जबाबदार आहे. मी मृत्यूशी झुंज देत आहे. मी वाचेन की नाही हे मला माहीत नाही. पण मला न्याय मिळाला पाहिजे.' या मुलीचा व्हिडीओ पाहून सर्वांचे डोळे पाणावले आहेत.

अमजोतच्या शाळेची २० हजार रुपये फी थकीत होती. फी जमा करण्यासाठी शाळा प्रशासनाकडून सातत्याने दबाव टाकला जात☞(पान २ वर)






## माजलगावात २०० हून अधिक गोवंश हत्या प्रकरणात गुन्हा दाखल : दोघांना अटक

### सामाजिक संघटनांनी आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर पोलिसांची कारवाई

**माजलगाव** : माजलगाव शहरात बकरी ईदच्या दिवशी २०० हून अधिक गोवंशांची हत्या झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आल्यानंतर शनिवारी रात्री उशिरा यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असुन यात दोन आरोपींना पोलीसांनी अटक केली आहे.

बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर शहरात मोठ्या प्रमाणात गोवंश हत्या झाल्याची माहिती विविध सामाजिक कार्यकर्त्यांनी गेल्या आठ दिवसांपासून व बकरी ईदच्या पहिल्या दिवशी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांना लोकेशन पाठवूनही यावर काहीच कारवाई केली नाही असा आरोप केला जाऊ लागला होता. यानंतर सामाजिक कार्यकर्त्यांनी शनिवारी पोलिसांना याबाबत निवेदन दिल्यानंतर शहर पोलिसांनी घटनास्थळी भेट व घटनेचा पंचनामा करून रात्री गोष्टीला अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

त्यानंतर ☞(पान २ वर)

## समलैंगिक प्रेम; लग्नाला नकार दिल्याने चिरला मित्राचा गळा



**एटापल्ली (गडचिरोली) /वृत्तसंस्था-** सोशल मीडियाच्या माध्यमातून झालेल्या ओळखीचे रूपांतर आधी प्रेमात आणि नंतर थेट रक्तरंजित थरारात झाल्याची धक्कादायक घटना रविवार, ३१ मे रोजी सकाळी ७ वाजेच्या सुमारास एटापल्ली-जारावंडी मार्गावर समोर आली. इन्स्टाग्रामवर सुरूवातीला समलैंगिक प्रेम झाले. त्यानंतर लग्नास नकार दिल्याने, एका मित्राने दुसऱ्या मित्रावर चाकूने सपासप वार करत त्याचा गळा चिरून निर्घृण खून केला. हा थरार एटापल्लीपासून २० किमी अंतरावर असलेल्या हालेवारा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील देवदा गावाजवळ घडला. सतीशकुमार जगदीशप्रकाश निसाद (वय ३२, रा. नागेपल्ली, ता. अहेरी) असे मृत तरुणाचे नाव असून, आरोपी सूरज हलदार (वय ३०, रा. मिरगन, ता. रायघर, जि. नबरंगपूर, ओडिशा) याला नागरिकांनी रंगेहात पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.

**इन्स्टाग्रामवर झाली ओळख, वाढली समलैंगिक जवळीक-** मृत सतीशकुमार याचा नागेपल्ली येथे गॅरेजचा ☞(पान २ वर)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त टू व्हीलर रॅली

## प्रत्येक स्त्रीला प्रेरणास्रोत म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर- आ. सुलभा खोडके

### -' येळकोट येळकोट - जय मल्हार ' चा जयघोष, रॅलीचे अमरावतीत जागोजागी स्वागत

**अमरावती/प्रतिनिधीः-** प्रत्येक स्त्रीला जगण्याचे, लढण्याचे, स्वतःचे सत्व टिकवण्याचे धारिष्ट देणारे प्रेरणास्त्रोत म्हणजे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन आहे.लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ह्या एक महान समाज सुधारक तर होत्याच आणि त्या आपल्या न्यायबुद्धी, परोपकार आणि धर्म परायणतेसाठी प्रसिद्ध होत्या. ज्या मनगटात बळ, बुद्धी आणि चातुर्य आहे तोच स्वकर्तृत्वावर लोकाभिमुख राजा बनू शकतो असा संदेश देऊन त्यांनी आपल्या मनगटातील व बुद्धीच्या जोरावर राज्य कारभार केला.त्या केवळ एक पराक्रमी योद्धा नव्हत्या, तर महिलांच्या आत्मसन्मानासाठी आणि हक्कासाठी कायदेशीर पावले उचलणाऱ्या भारतातील पहिल्या काही महिला राज्यकर्त्यांपैकी त्या एक होत्या.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन हे न्याय, सेवा, धर्मपरायणता आणि लोककल्याण यांचे प्रेरणादायी उदाहरण आहे. त्यांचा आदर्श राज्यकारभार आजही प्रशासनासाठी मार्गदर्शक मानला जातो. लोकहिताला सर्वोच्च प्राधान्य देणारी त्यांची विचारसरणी आजच्या काळातही तितकीच महत्वपूर्ण आणि प्रेरणादायी आहे. असे प्रतिपादन आमदार सुलभा संजय खोडके यांनी उपस्थितांना संबोधून केले.

रविवार दिनांक ३१ मे २०२६ रोजी अमरावती येथील नवसारी - व्हिएमव्ही - विद्युत नगर परिसर समीप राजमाता अहिल्यादेवी होळकर चौक, अमरावती येथे लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंती दिन निमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या.कुशल प्रशासक पराक्रमी विरांगणा पुण्यश्लोक



राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस सर्वप्रथम आमदार खोडके यांनी नमन - वंदन - पूजन तसेच माल्यार्पण करीत विनम्र अभिवादन केले.यावेळी सर्व उपस्थित्यांच्या वतीने ' येळकोट येळकोट - जय मल्हार ' चा एकच जयघोष करण्यात आला.याप्रसंगी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त खासकरून आयोजित टू व्हीलर रॅलीत सहभागी झालेल्या महिला भगिनींनी पिवळ्या रंगाचे फेटे व पारंपारीक वस्त्र परिधान करीत सहभाग नोंदवला होता. यावेळी सकल धनगर समाजाच्या वतीने आमदार - सुलभा खोडके यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.तदनंतर आमदार खोडके यांनी हिरवी झेंडी दाखविल्यानंतर या टू व्हीलर रॅलीला सुरुवात झाली. ही रॅली शहराच्या मुख्य मार्गाने मार्गक्रमण करीत असताना जागोजागी या टू व्हीलर रॅलीचे अमरावती शहरवासियांचे वतीने स्वागत करण्यात आले.

त्यानंतर कठोरा नाका - शेगाव नाका - पंचवटी चौक - आरटीओ ऑफिस मार्गे ही रॅली मार्गस्थ झाली. याप्रसंगी राष्ट्रमाता - राजमाता माँ जिजाऊ यांच्या पुतळ्यास रॅलीतील सहभागी मान्यवरांनी माल्यार्पण केले. तदनंतर जिल्हाधिकारी कार्यालय - गव्हर्मेंट गर्ल्स हायस्कुल चौक मार्गे जात असताना या रॅलीचे आयोजन - नियोजन व शिस्तबद्ध व्यवस्थापन लक्षात घेता अमरावतीकरांनी या रॅलीला प्रतिसाद देत राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या रथारूढ प्रतिमेस वंदन केल्याचे दृश्य यावेळी दिसून आले. यादरम्यान इर्विन चौक येथील भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर येथे टू व्हीलर रॅलीत सहभागी मान्यवरांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस माल्यार्पण केले. या टू व्हीलर रॅलीच्या सुरुवातीपासून ते रॅलीची सांगता होईपर्यंत सकल धनगर समाज, अहिल्या महिला परिषद, महाराणी अहिल्यादेवी समाज प्रबोधन मंच, जिल्हा शाखा - अमरावती, धनगर एम्प्लॉईज वेलफेअर असोसिएशन तसेच अन्य संघटनेचे सर्व सदस्य व पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

# मेळघाटात कारवाईसाठी गेलेल्या वन कर्मचाऱ्यांवर गावकऱ्यांचा हल्ला; दोघे जण जखमी

**अमरावती :** मेळघाटातील चौराकुंड या गावात एका युवकाला वन गुन्ह्यासंदर्भात ताब्यात घेतल्यानंतर चौकशीसाठी गेलेल्या वनविभागाच्या पथकावर गावकऱ्यांनी हल्ला केल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. या घटनेने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील धारणी तालुक्यातील चौराकुंड वनपरिक्षेत्रात काही दिवसांपुर्वी चार रानगवे, दोन भेडकी आणि दोन माकडांसह ११ वन्यजीवांचा संशयास्पद मृत्यू झाला होता. प्राथमिक तपासात विषप्रयोग झाल्याची अधिकृत नोंद पशू शल्यचिकित्सकांनी केली आहे. पानवठ्यातील विषारी पाणी पिल्यामुळे या वन्यप्राण्यांचा मृत्यू झाल्याचे कारण समोर आले आहे.

चौराकुंड वनपरिक्षेत्रातील उत्तर अंजन झडप आणि चौराकुंड उत्तर खंड परिसरात जंगलगस्तीदरम्यान वन कर्मचाऱ्यांना वेगवेगळ्या ठिकाणी चार रानगवे आणि एक भेडकी मृतावस्थेत आढळून आली होती. नंतर इतर काही वन्यप्राण्यांचे मृतदेह देखील दिसून आले. २२ मे रोजी हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर एकच खळबळ उडाली होती. नैसर्गिक पानवठ्यात विषारी द्रव्य मिसळून प्राण्यांना ठार मारण्यात आल्याचे चौकशीत निष्पन्न झाल्यानंतर या प्रकरणात चौराकुंड येथील एका युवकाला अटक करण्यात आली होती. त्यामुळे गावकऱ्यांमध्ये रोष निर्माण झाला होता. या प्रकरणात आणखी सहा युवकांना नोटीस पाठवण्यात आली होती. हे संशयित फरार झाले आहेत. जेव्हा शनिवारी रात्री वन कर्मचारी चौकशीसाठी गावात पोहचले, तेव्हा वन कर्मचाऱ्यांच्या दिशेने दगडफेक करण्यात आली. या दगडफेकीत एका महिला महिलेसह दोन वनरक्षक जखमी झाले आहेत.

या घटनेने गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले. गावकऱ्यांच्या हल्ल्यात जखमी झालेल्या दोन्ही वनरक्षकांना उपचारासाठी धारणी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेने गावात तणावाचे वातावरण असून पोलिसांनी बंदोबस्त वाढवला आहे. वन विभागाने देखील हे प्रकरण अत्यंत गांभीर्याने घेतले आहे. वन विभागाची पथके गावालगतच्या हालचालींवर लक्ष ठेवून आहेत.

# १० जून पर्यंत राज्यातील बहुतांश भागात मान्सूनच्या आगमनाची शक्यता नाही

### -१ जून पासून वादळी पावसाचा अंदाज, मात्र शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये

**मुंबई :** सध्या राज्यातील हवामानात बदल होण्यास सुरुवात झाली आहे, आणि १ जून पासून सुरु होणाऱ्या आठवड्यात हवामानात अजून बदल होईल. प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि खानदेशात दुपार नंतरचे ढग आणि काही प्रमाणात वादळी पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. कोकणात देखील काही प्रमाणात पावसाचा अंदाज आहे. याच बरोबर मे महिन्याच्या तुलनेत राज्यातील कमाल तापमानात घट होईल, मात्र विदर्भातील काही भागांमध्ये, प्रामुख्याने पूर्व विदर्भ, कमाल तापमान ४० अंशाच्या वर कायम राहील. आगामी वादळी पावसाचा मान्सूनशी काहीही संबंध नाही, कारण मान्सून अद्याप केरळात पोहोचलेला नाही. सध्याच्या स्थितीनुसार राज्यातील बहुतांश भागांमध्ये किमान १० जून पर्यंत मान्सूनच्या आगमनाची शक्यता नाही.

कृषी आणि आपत्ती व्यवस्थापन विभागांकडून शेतकऱ्यांना आणि लोकांना आवाहन करण्यात येत आहे की, संभाव्य हवामान बदल लक्षात घेऊन योग्य ती प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी:

शेतकऱ्यांनी वादळी पावसावर अवलंबून राहून आणि मान्सूनचे आगमन होण्यापूर्वी पेरणीची घाई करू नये

विजेच्या कडकडाटाच्या वेळी नागरिकांनी व शेतकऱ्यांनी स्वतःची तसेच पाळीव जनावरांची सुरक्षितता सुनिश्चित करावी. अशा वेळी झाडाखाली, टिनशेडखाली तसेच विद्युत ट्रान्सफॉर्मर, वीज खांब आणि विद्युत वाहिन्यांच्या जवळ उभे राहणे टाळावे

## १ व १० वरील उर्वरित

### विधान परिषद : महायुतीचं

भंडारा-गोंदिया, अमरावती, अहिल्यानगर, सोलापूर, धाराशिव-लातूर-बीड हे मतदारसंघ आले आहेत; तर शिवसेना ठाकरे गट रायगड- रत्नागिरी-सिंधुदुर्ग, जळगाव, परभणी-हिंगोली, छत्रपती संभाजीनगर-जालना या जागा लढविणार आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीला पुणे, ठाणे आणि सांगली-सातारा हे मतदारसंघ सुटले आहेत. मात्र नांदेड आणि नाशिक या दोन मतदारसंघांबाबत अद्याप निर्णय झालेला नाही.

महायुतीमध्ये भाजपच्या वाट्याला ११ जागा आल्या आहेत. राज्यातील बहुतांशी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये भाजपचे प्राबल्य आहे. त्यामुळे या निवडणुकांच्या माध्यमातून विधान परिषदेतील आपले संख्याबळ अधिक करण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. भाजपच्या वाट्याला आलेल्या ११ जागांमध्ये नागपूर, अहिल्यानगर, धाराशिव, जळगाव, सोलापूर, लातूर, नांदेड, अमरावती, वर्धा-गडचिरोली-चंद्रपूर, भंडारा-गोंदिया आणि सातारा-सांगली या मतदारसंघांचा समावेश आहे.

### पर्यटकांची कार खोल

कारचा ठिकाणा शोधला. त्यावेळीकालाबन परिसरात असल्याचे दिसून आले. मात्र, कार कार बराच वेळ एकाच ठिकाणी थांबल्याचे त्याच्या लक्षात आल्याने त्यांनी शोध मोहीम सुरू केली. त्यावेळी कार खोल दरीत कोसळल्याची माहिती समोर आली.

या अपघाताची माहिती शनिवारी बैरागढ येथील अधिकाऱ्यांनी तीसा पोलीस ठाण्याला दिली.त्यानंतर स्थानिक प्रशासन आणि बचाव पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले आणि कारमधून आठ जणांचे मृतदेह बाहेर काढले. मृतांमध्ये चालक विश्वास सल्होटा (रा. मावा बनीखेत, चंबा) यांच्यासह कर्नाटक आणि छत्तीसगड येथील पर्यटक अरविंद चंद्राकर, प्राची, दर्श, अकशद, पी. जी. कार्तिघायन, मनीमाला आणि नंदन यांचा समावेश आहे. सर्व मृतदेह शवविच्छेदनासाठी चंबा मेडिकल कॉलेजमध्ये पाठवण्यात आले आहेत. अपघाताचे नेमके कारण समजू शकलेले नाही. परंतु, तीव्र वळणावर चालकाचे नियंत्रण सुटल्याने हा अपघात घडला असावा, असा पोलिसांना संशय आहे.

### ममता बॅनर्जी सुवेंदू

जून रोजी रस्त्यावर उतरून धरणे आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

ममता बॅनर्जी यांनी दिलेल्या या इशाऱ्यानंतर २ जून रोजी कोलकाता येथील ऐतिहासिक राजकीय केंद्र असलेला रानी राशमोनी रोड येथे मोठं राजकीय नाट्य रंगण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तृणमूल काँग्रेसमधील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार २ जून रोजी स्वत: ममता बॅनर्जी ह्या धरणे आंदोलनामध्ये सहभागी होऊन नेतृत्व करणार आहेत. कोलकाता येथील रस्त्यावर बसून ममता बॅनर्जी ह्या सुवेंदू अधिकारी यांच्या नेतृत्वाखालील सरकारची धोरणे, निवडणुकीनंतरचा कथित हिंसाचार आणि तृणमूल काँग्रेसच्या नेत्यांवर होत असलेल्या हल्ल्यांविरोधात हुंकार भरणार आहेत.

या माध्यमातून ममता बॅनर्जी ह्या पुन्हा एकदा आपल्या जुन्या आंदोलक अवतारामध्ये परतण्याची शक्यता आहे. जेव्हा जेव्हा ममता बॅनर्जी ह्या पश्चिम बंगालमध्ये राजकीय दृष्ट्या कमकुवत पडल्या आहेत. तेव्हा तेव्हा त्यांनी रस्त्यावर आंदोलन करून सत्तेत परतण्याचा मार्ग मोकळा केला आहे. त्यामुळे आता यावेळी आंदोलनाच्या माध्यमातून ममता बॅनर्जी पश्चिम बंगालच्या राजकारणात नेमकी काय उलथा पालथ घडवून आणतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### अल्पवयीन मुलांच्या तस्करीत

संमतीचा वापर बचावासाठी केला जाऊ शकत नाही. अल्पवयीन पीडितेची संमती ही कायदेशीरदृष्ट्या पूर्णपणे निरर्थक आहे.

पोक्सोमुळे तपासाची पद्धत बदलणार

जेव्हा एखादे मूल लैंगिक शोषणाला बळी पडते, तेव्हा भारतीय न्याय संहितेच्या कलम १४३ व १४४ सोबतच पोक्सो कायद्याच्या तरतुदी लागू होतील. पोक्सो कायदा लागू झाल्यानंतर गुन्ह्याची नोंद करणे, पीडितेचा जबाब नोंदवणे आणि वैद्यकीय तपासणी करण्याची संपूर्ण प्रक्रिया अधिक संवेदनशील आणि बालस्नेही पद्धतीने केली जाते, त्यामुळे पीडितांचे हित जपले जाईल.

पुनर्वसन हा घटनात्मक अधिकार

सर्वोच्च न्यायालयाने पीडितांच्या पुनर्वसनावर विशेष भर दिला आहे. संस्थात्मक आणि शासकीय पाठिंबा न मिळाल्यास या पीडितांना पुन्हा त्याच असुरक्षित दलदलीत जावे लागते, अशी भीती न्यायालयाने व्यक्त केली. पीडितांचे अर्थपूर्ण पुनर्वसन करणे हे संविधानाच्या कलम २१ (जगण्याचा अधिकार) आणि कलम २३ (शोषणाविरुद्धचा अधिकार) अंतर्गत मिळालेल्या संरक्षणाचाच एक भाग आहे, असेही खंडपीठाने स्पष्ट केले.

### पट्टेदार वाघाच्या हल्ल्यात

सुमारास याच परिसरातील रोपवाटिकेला पाणी देणाऱ्या महिला मजुरांना हा वाघ रस्ता ओलांडताना दिसला होता. काही इतर नागरिकांनीही वाघाला जंगलाच्या दिशेने जाताना पाहिले होते. मात्र, त्यानंतर काही वेळातच हा दुर्दैवी प्रकार घडला.

घटनेची माहिती मिळताच सहाय्यक वनसंरक्षक महेश गायकवाड, वनपरिक्षेत्र अधिकारी अनुप कन्नमवार, वनरक्षक केशव पाटील यांच्यासह वनविभागाचे पथक आणि चिमूर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी उपजिल्हा रुग्णालयात पाठविला आहे.

### ज्येष्ठ पार्श्वगायिका सुमन

ओळख सुमनताईंचा आवाज म्हटला की, अनेकदा लता मंगेशकर यांच्या आवाजाशी त्याचे साधर्म्य सांगितले जायचे. मात्र, त्या आवाजातही एक वेगळेपण होते. एक खणखणीतपणा, एक अस्सल भारतीय लय आणि शास्त्रीय संगीताची पक्की जाण त्यांच्या गायकीत होती. 'सुमन हेमाडी' या नावाने सुरुवातीच्या काळात त्यांनी आपली ओळख निर्माण केली होती. गझलसम्राट तलत महमूद यांनी जेव्हा पहिल्यांदा त्यांचा आवाज ऐकला, तेव्हाच त्यांना या हिऱ्याची पारख झाली होती. तिथून सुरू झालेला हा प्रवास चित्रपटसृष्टीच्या सुवर्णकाळाचा साक्षीदार राहिला. त्यांनी केवळ मराठी किंवा हिंदीतच नव्हे, तर बंगाली, पंजाबी, कानडी अशा अनेक भाषांत गाणी गायली. भाषेच्या सीमा ओलांडून 'सूर' कसे सार्वत्रिक असतात, याचे उत्तम उदाहरण म्हणजे सुमनताईंचे कार्य होते.

### शाळेच्या फीसाठी छळ

असल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. अमजोतची मावशी सरबजीत कौर यांनी सांगितलं की, डीडीआयएस (उउ्घ्ए) स्कूल फतेहगड चुडिया रोडच्या मुख्याध्यापिका शबनम शर्मा आणि वर्गशिक्षिका आकांक्षा शर्मा फीवरून अमजोतवर वारंवार दबाव टाकत होत्या. याच मानसिक दबावामुळे अमजोतने विष घेतलं आहे. याच दरम्यान, या प्रकरणात अद्याप शाळेकडून कोणतीही प्रतिक्रिया समोर आलेली नाही.

या घटनेनंतर विद्यार्थिनीला रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. मात्र उपचारादरम्यानच मुलीचा मृत्यू झाला. आता मृतदेहाचें शवविच्छेदन केलं जाणार आहे. चौकी विजय नगर पोलिसांनी कुटुंबीयांचे जबाब नोंदवून घेतले असून प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. शवविच्छेदन अहवाल आणि तपासात समोर येणाऱ्या तथ्यांच्या आधारे पुढील कारवाई केली जाईल, अशी माहिती पोलीस अधिकाऱ्यांनी दिली आहे.

### माजलगावात २०० हून अधिक

पोलिसांनी तांत्रिक पुराव्याच्या आधारे दोन आरोपींना अटक केली. अटक करण्यात आलेल्यांमध्ये जफर गफर कुरेशी (वय २५) व इम्रान शकील कुरेशी (वय ३३) रा . खाटीक गल्ली माजलगाव यांचा समावेश आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत

आंदोलनाचा इशारा देताच पोलिसांना आली जाग

शहर पोलिसांना लोकेशन देऊनही एवढ्या गाईंची कत्तल झालेली असताना येथील शहर पोलिसांनी याची साधी दखलही घेतली नव्हती. या विरोधात काही सामाजिक संघटनांनी आवाज उठवत आंदोलनाचा इशारा दिला होता यानंतर पोलिसांना जाग आली व पोलिसांनी शनिवारी रात्री उशिरा गुन्हा दाखल करत आरोपीला अटक केली.

### समलैंगिक प्रेम; लग्नाला

व्यवसाय आहे. काही महिन्यांपूर्वी त्याची आणि ओडिशातील सूरज हलदारची 'इन्स्टाग्राम' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर ओळख झाली. या ओळखीचे रूपांतर नंतर मैत्रीत आणि पुढे समलैंगिक जवळीकतेमध्ये झाले. दोघेही एकमेकांच्या प्रेमात पडले होते. यानंतर सूरज याने सतीशकुमारकडे लग्नाचा तगादा लावला होता. मात्र, सतीशकुमार हा आधीच विवाहित असल्याने तो सूरजसोबत लग्न करण्यास राजी नव्हता.

ओडिशाला सोडायला निघाला अन...

एकतर्फी प्रेमात बुडालेला सूरज हा दोन दिवसांपूर्वी सतीशकुमारला भेटण्यासाठी ओडिशातून नागेपल्ली येथे आला होता. येथे आल्यानंतर त्याला सतीशकुमार हा विवाहित असल्याचे कळले. दोन दिवस एकत्र घालवल्यानंतर, रविवारी पहाटे सूरज आपल्या गावी ओडिशाला जाण्यासाठी निघाला. सतीशकुमार त्याला सोडण्यासाठी आपल्या 'एमएच ३४ बीएफ २५६०' क्रमांकाच्या चारचाकी कारने छत्तीसगडच्या सीमाभागातून ओडिशाच्या दिशेने घेऊन जाणार होता. मात्र, प्रवासादरम्यान देवदा गावाजवळ पोहोचताच सतीशकुमार विवाहित असल्याच्या मुद्द्यावरून दोघांमध्ये कडाक्याचे भांडण झाले. भावना दुखावलेल्या सूरजने आधीच केलेल्या प्लॅनिंगनुसार आपल्यासोबत आणलेला चाकू काढला आणि सतीशकुमारवर सपासप वार करून त्याचा खून केला.

नागरिकांची तत्परता; आरोपीला पकडले

देवदा गावाजवळ सकाळी ७ वाजेच्या सुमारास हा रक्तरंजित प्रकार नागरिकांच्या निदर्शनास आला. नागरिकांनी प्रसंगावधान राखत पळून जाण्याच्या तयारीत असलेल्या आरोपी सूरज हलदारला जागीच पकडले आणि घटनेची माहिती पोलिसांना देऊन त्याला पोलिसांच्या स्वाधीन केले. सध्या त्याच्यावर एटापल्ली ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत, अशी माहिती हालेवारा पोलिस मदत केंद्राचे उपनिरीक्षक दाबेराव यांनी दिली.

### मेळघाटातील 'कुटीर' साडीला जागतिक

बार्बरा ओ'नील यांना ही सोलर चरखा कापडापासून तयार केलेली आकर्षक साडी भेट देण्यात आली होती. या साडीची उत्कृष्ट गुणवत्ता, सौंदर्य आणि अप्रतिम हस्तकला पाहून बार्बरा ओ'नील इतक्या प्रभावित झाल्या की, त्यांनी मुंबई येथील त्यांच्या पुढील मोठ्या कार्यक्रमात हीच साडी परिधान करून उपस्थितांना संबोधित केले.

धारणी तालुक्यातील मांडू येथील महिला कारागिरांनी आपल्या कष्ट, जिद्द आणि कलाकुसरीच्या बळावर तयार केलेल्या या उत्पादनाला मिळालेली ही जागतिक पसंती संपूर्ण महाराष्ट्रासाठी अत्यंत गौरवाचा क्षण ठरली आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून मेळघाटातील महिलांना केवळ रोजगारच मिळाला नसून, त्या स्वावलंबन आणि सन्मानाने शाश्वत विकासाकडे पाऊल टाकत आहेत.

अमरावतीचे जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी प्रदीप चेचरे म्हणाले की, 'मेळघाटातून जगभर' हा प्रवास आता केवळ एक स्वप्न राहिले नसून, ग्रामीण महिलांच्या हातांनी विणलेली ती एक प्रेरणादायी यशोगाथा बनली आहे, ज्यामुळे 'कुटीर' ब्रँडला जागतिक स्तरावर एक नवी ओळख मिळाली आहे.

### चार महिलांचा जीव घेणारी वाघीण

यश मिळवले. गोरेवाडा पार्क इथे या वाघिणीला नेले जाणार असे सांगितले जात होते. मात्र या वाघिणीला परतवाडा येथे आणण्यात आले आहे. आता या वाघिणीला मेळघाटच्या अकोट वनपरिक्षेत्रांतर्गत येणाऱ्या गुगामल वन्यजीव विभागाच्या जंगलात सोडणार अशी चर्चा पसरली आहे. या चर्चेने अनेकांना धडकी भरली आहे. वाघिणीला सध्या परतवाडा वन्यजीव विभागाच्या परिसरात ठेवले आहे.

दरम्यान या वाघिणीला काही दिवस परतवाडा येथेच ठेवले जाणार आहे. तिला नेहमीसाठी कुठे ठेवायचे याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही, असे वन्यजीव विभाग परतवाडा येथील सहाय्यक वनरक्षक विक्रम शिंदे यांनी सांगितले.

### आमदार लवटे धावले अपघातातील

वाहनातून उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय, दर्यापूर येथे आणून डॉक्टरांना जखमीवर उपचार करण्यासाठी सुचना दिल्या.

संकटाच्या काळात धावून जाणं, हाच खरा लोकप्रतिनिधीचा धर्म असल्याचे त्यांनी दाखवून दिले. त्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. यावेळी रुग्णांची मदत करण्याकरीता आमदार लवटे यांच्यासोबत युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर हे सुद्धा उपस्थित होते.

### मंत्री नितीन गडकरी यांनी घेतली भाजपचे

असलेले ज्येष्ठ नेते अरुण अडसड यांनी विदर्भात पक्षीय संघटनेचे कार्य पार पाडत असताना सर्वसामान्य कार्यकर्ते घडविले. आज गडकरी - अडसड यांच्यात अर्धा तास झालेल्या चर्चेत अनेक आठवणींना दोघांनी उजाळा दिला.यावेळी प्रतिभा अडसड, आमदार प्रताप अडसड, नगराध्यक्ष डॉ. अर्चना अडसड - रोठे, धामणगाव भाजपचे विधानसभा प्रमुख रावसाहेब रोठे, अमित देशमुख,आरती देशमुख कृष्णा अडसड तसेच अडसड कुटुंबातील सदस्य उपस्थित होते. आ. प्रताप अडसड यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे यावेळी स्वागत केले.

### वडनेर गंगाई येथे १६ लक्ष

मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केल्याचे रेवस्कर यांनी पोलिसांना माहिती दिली. दर्यापूर येथिल एचडीपीओ,एलसीबी, डॉग स्कॉट, फिंगरप्रिंट एक्सपर्ट ही सर्व टीम घटनास्थळी दाखल होऊन घटनेचा पंचनामा केला. घटनेचा पुढील तपास येवदा पोलिस स्टेशनचे ठाणेदार प्रफुल्ल गाडेकर व पोलिस कर्मचारी मुकेश माळोकार, नागोराव जांभुळकर करीत आहे. याप्रकरणी येवदा पोलिसांनी चोरट्यांविरुध्द कलम ३०५ अ ३३१/३/४ नुसार गुन्हा दाखल केला आहे.

### प्रशासनाला वारंवार निवेदने देऊनही

संरक्षण भिंतीसाठी खोदण्यात आलेला पाया नियोजित जागेऐवजी अन्यत्र खोदण्यात आल्याने गट क्रमांक ५ मध्ये अनावश्यक विभागणी निर्माण होत असून मंदिर परिसराच्या व्यवस्थापनावर त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो. यामुळे भाविकांना दर्शन व पूजाअर्चा करताना अडचणी निर्माण होण्याची शक्यता असल्याचेही तसेच शासनाचे निधीचा दुरुपयोग होत असल्याचे संस्थानने नमूद केले आहे.यापूर्वी संस्थानने मुख्यमंत्री,ग्राम विकास मंत्री,जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती, गट विकास अधिकारी पंचायत समिती चांदूर रेल्वे तसेच उपअभियंता बांधकाम उपविभाग, चांदुर रेल्वे यांच्याकडे वारंवार निवेदने व स्मरणपत्रे सादर करून काम थांबविण्याची मागणी केली होती. मात्र प्रशासनाने कोणतीही कार्यवाही न केल्याने आणि काम सुरूच ठेवल्याने अखेर संस्थानने शेवटचा पर्याय म्हणून उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत गट क्रमांक ५ मधील संरक्षण भिंतीच्या कामाची सखोल चौकशी करून काम तात्काळ स्थगित करावे तसेच संबंधित दोषींवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.दरम्यान, या प्रकरणामुळे ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत सुरू असलेल्या कामांच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून प्रशासन यावर काय भूमिका घेते याकडे स्थानिक नागरिक, भाविक आणि परिसरातील ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

### महात्मा फुले अर्बन को-ऑप. बँकेला

साली कॉटन मार्केट, अमरावती येथे माझ्या हस्ते झालेले आहे, या बँकेची आज स्वतःच्या मालकीची प्रशासकीय इमारत झाली असुन, बँकेच्या शाखांच्या विस्तार झाला ही बाब अतिशय प्रशांशिय असून याकरिता मी सर्व संचालक मंडळाचे कौतुक करतो व बँकेचे कर्मचारी, सभासद, ग्राहक, व हितचिंतक या सर्वांनी बँकेला भरभरून सहकार्य केल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन करतो. उत्तरौत्तर बँकेची अशीच प्रगती होत राहील अशी अपेक्षा बाळगतो. यावेळी अचलपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रवीण तायडे, मा. आमदार प्रवीण पोटे पाटील (माजी राज्यमंत्री) व बँकेचे संचालक वामनराव वासनकर, डॉ. अशोकराव लांडे, रमेशराव मडघे, संजयराव कुरळकर, मनोजराव भेले, डॉ. सुधाकरराव डेहनकर, बाळासाहेब अलोणे, प्रा. हेमंतराव बेलोकर, सुदेशराव भेले, दिपकराव लोखंडे, श्रीकांतराव आपले, यशवंतराव गोंडेकर, राजश्री जढाळे, निलिमा अडोकर, विठ्ठलराव बकाले, ॲड. आशिष लांडे, , नगरसेविका कल्याणी आकाश तायडे, वैशाली सिनकर, उद्योजक कपिल आंडे, सचिन वानखडे, सागर आंडे, श्रीनिवास लोखंडे, सुहास गोंगे, बँकेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी जितेंद्र भेले, सर्व शाखा व्यवस्थापक व समस्त कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तज्ञ संचालक ॲड. आशिष लांडे व आभार प्रदर्शन मुख्य कार्यकारी अधिकारी अजय सिनकर यांनी केले.

### गौरखेडा पारधीबेड्यावर पोलिसांची धाड

या प्रकरणी हातभट्टी चालक गिरीश सुभाष पवार (वय ४२, रा. गौरखेडा, ता. चांदूर रेल्वे) याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (फ), (क), (ड) तसेच भारतीय न्याय संहिता कलम १२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अप्पर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक थोरात, पोलीस निरीक्षक अजय आकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि नीतेश आझाडे, रोहित कुदळे तसेच चांदूर रेल्वे पोलीस पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली. पुढील तपास पोलीस स्टेशन चांदूर रेल्वे करीत आहे. अवैध दारू निर्मिती व विक्रीविरोधात अशीच कठोर कारवाई सुरू राहणार असून नागरिकांच्या आरोग्य व सुरक्षिततेला प्राधान्य दिले जाईल, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ सोमवार, १ जून २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# गर्भलिंगनिदान प्रकरणातील आरोपी ९ दिवसांनंतरही मोकाट



■ प्रतिनिधी | वाशिम ■

*मालेगाव येथील माने हॉस्पिटलमध्ये उघडकीस आलेल्या कथित गर्भलिंगनिदान प्रकरणाने जिल्हाभर खळबळ उडवून दिली असताना, गुन्हा दाखल होऊन तब्बल नऊ दिवस उलटूनही एकाही आरोपीला अटक न झाल्याने पोलिस प्रशासनाच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला जात आहे. एवढ्या गंभीर स्वरूपाच्या प्रकरणात आरोपी अद्याप फरार असल्याने 'तपास सुरू आहे' या नेहमीच्या उत्तरापलीकडे जाऊन प्रशासनाने जनतेसमोर स्पष्ट भूमिका मांडावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.*

## ✦ पोलिसांची निष्क्रियता की कुणाला वाचविण्याचा प्रयत्न?
## ✦ गंभीर गुन्ह्यात आरोपींना अटक नाही;
## ✦ 'पाणी कुठेतरी मुरतेय का?' असा जनतेचा सवाल



माने हॉस्पिटल गर्भलिंगनिदान प्रकरणातील आरोपी अद्याप मोकाट

पोलिसांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह, पाच आरोपींवर गुन्हा दाखल होऊनही अटक नाही

आरोपींना अभय कोणाचे?

राजकीय महत्त्वाकांक्षांवर प्रश्नचिन्ह?

गर्भलिंगनिदान हा केवळ कायद्याचा भंग नसून समाजाच्या मूलभूत नैतिक मूल्यांवर आघात करणारा गुन्हा मानला जातो. केंद्र सरकारच्या पीसीपीएनडीटी (Pre-Conception and Pre-Natal Diagnostic Techniques) कायद्यांतर्गत गर्भाचे लिंग सांगणे, त्यासाठी चाचणी करणे किंवा त्यास मदत करणे हा गंभीर आणि दखलपात्र गुन्हा आहे. दोषी आढळल्यास संबंधित डॉक्टरांचा वैद्यकीय परवाना निलंबित किंवा रद्द होऊ शकतो. तसेच कारावास आणि आर्थिक दंडाचीही तरतूद आहे. अशा गंभीर प्रकरणात पाच आरोपींवर गुन्हा दाखल झाल्यानंतरही त्यांना अटक करण्यात पोलिसांना यश आले नसल्याचे चित्र समोर येत आहे. सामान्य नागरिकांचा एखाद्या किरकोळ गुन्ह्यात काही तासांत शोध घेणारी यंत्रणा या प्रकरणात मात्र हात टेकल्यासारखी का दिसत आहे, असा सवाल उपस्थित होत आहे. जिल्ह्यात आता उघडपणे चर्चा सुरू झाली आहे की, आरोपींना अटक करण्यात होणारा विलंब हा केवळ तपासातील अडचणींचा परिणाम आहे की त्यामागे काही वेगळेच गणित आहे? 'पाणी कुठेतरी मुरतेय का?' अशी कुजबुज सर्वसामान्य नागरिकांपासून सामाजिक संघटनांपर्यंत ऐकू येऊ लागली आहे.विशेष म्हणजे या प्रकरणातील मुख्य आरोपींची ओळख, त्यांचे सामाजिक व राजकीय संबंध आणि त्यांचा प्रभाव लक्षात घेता त्यांना वाचविण्यासाठी कुठल्यातरी स्तरावर प्रयत्न तर होत नाहीत ना, अशी शंका अनेकांकडून व्यक्त केली जात आहे. आरोपींना संरक्षण मिळत असल्याची भावना जनमानसात निर्माण होणे हे स्वतः पोलिस यंत्रणेसाठी चिंतेचे कारण असल्याचे मत जाणकार व्यक्त करत आहेत. दरम्यान, या प्रकरणामुळे महिलांच्या सुरक्षिततेचा, मुलींच्या जन्मदराचा आणि कायद्याच्या अंमलबजावणीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. जर गर्भलिंगनिदानासारख्या समाजविघातक गुन्ह्यातील आरोपींनाच त्वरित अटक होत नसेल, तर सामान्य नागरिकांनी कायद्यावर विश्वास कसा ठेवायचा, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. आता जिल्हावासियांचे लक्ष एका गोष्टीकडे लागले आहे.पोलिस प्रशासन खरोखरच आरोपींपर्यंत पोहोचणार की हा तपासही केवळ कागदोपत्री हालचालींपुरताच मर्यादित राहणार? आगामी काही दिवसांत या प्रश्नांची उत्तरे मिळणे अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे.

### गर्भलिंगनिदान प्रकरण : कायद्याची भीती संपली का?

गर्भलिंगनिदान प्रतिबंधक कायद्याची कठोर अंमलबजावणी व्हावी यासाठी शासन दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च करते. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' सारख्या मोहिमा राबविल्या जातात. मात्र, अशा गंभीर गुन्ह्यात आरोपी अनेक दिवस पोलिसांच्या आवाक्याबाहेर राहतात, तेव्हा कायद्याची भीती उरली आहे का, असा प्रश्न उपस्थित होतो. आरोपींना त्वरित अटक करून संपूर्ण रॅकेटचा पर्दाफाश करण्याची मागणी आता अधिक तीव्र होत आहे.

# मुख्य रस्त्यासह चौकात सीसीटीव्ही लावण्याची गरज

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

### पोलीस प्रशासनाने व नगरपंचायतने पुढाकार घेण्याची मागणी

शहराचा वाढता व्याप तसेच वाढते गुन्हे तसेच अनुसुचित घटनांना आळा बसण्यासाठी शहरातील मुख्य चौकासह मुख्य मार्गावर ठिकठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याची नितांत गरज असून यासाठी नगरपंचायत प्रशासनाने व पोलीस प्रशासनाने पुढाकार घेऊन उच्च दर्जाचे सीसीटीव्ही कॅमेरे लावणे गरजेचे झाले आहे. मालेगाव पोलीस स्टेशनच्या वतीने जुन्या बस स्थानकावर पोलीस स्टेशन समोर लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यामुळे मागील महिन्यात जुने बस स्थानकावर सीसीटीव्ही कॅमेऱ्यामुळे मुख्य रस्त्यावर अल्पवयीन मुले दुचाकी ट्रिपल सीट अतिवेगाने चालविणे तसेच विविध दुकानासमोर दुचाकी, चारचाकी वाहने बेशिस्तपणे उभे करणे, गळ्यातील मंगळसूत्र तोडून पळविणे किंवा पोलीस असल्याची बतावणी करून नागरिकांना लुटणे अशा बऱ्याच गुन्ह्यांना आळा बसू शकतो किंवा असे झाल्यास सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या मदतीने त्याचा तपास लागू शकतो.

त्यामुळे शहरातील अकोला फाटा, जोगदंड हॉस्पिटल, शिव चौक, शेलू फाटा, तहसील चौक, नवीन बसस्थानक, लहुजी पुतळा चौक, जुने न्यायालय परिसर, गांधी चौक, दुर्गा चौक, गांधीनगर, नवीन मालेगाव आठवडी बाजार, नागरदास बायपास मार्ग इत्यादी ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावणे गरजेचे आहे. या अनुषंगाने नगरपंचायत प्रशासनाने पोलिसांच्या सहकार्याने टप्प्याटप्प्याने सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात यावे, अशी मागणी शहरातील सुज्ञ नागरिकांकडून होत आहे.

# पेरणीतून उभी राहिली मानवी संस्कृती– प्रा. इंद्रजीत भालेराव

■ प्रतिनिधी | वाशिम ■

माणसाने प्राण्यांची शिकार करून खाण्याऐवजी पेरून खाण्याची सुरुवात केली, तिथूनच खऱ्या अर्थाने मानवी संस्कृती आणि शेती संस्कृतीचा उदय झाला, असे प्रतिपादन प्रसिद्ध कवी, साहित्यिक व विचारवंत प्रा. इंद्रजीत भालेराव यांनी केले.



### 'वाशिम वासंतिक व्याख्यानमाला २०२६' मध्ये 'शोध – कृषी संस्कृतीचा' विषयावर व्याख्यान उत्साहात

वाशिम जिल्ह्यातील अधिकारी-कर्मचारी वृंदातर्फे आयोजित 'वाशिम वासंतिक व्याख्यानमाला २०२६' अंतर्गत दुसऱ्या पुष्पाचे व्याख्यान गुरुवारी दि. २२ मे रोजी उत्साहात पार पडले. स्व. बाळासाहेब ठाकरे शेतकरी प्रशिक्षण केंद्र (आत्मा), काटा चौफुली, वाशिम येथे आयोजित कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर उपस्थित होते.

ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री ना.चं.कांबळे, बाबाराव मुसळे यांच्यासह अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरीफ शाहा, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) संजय रणवीर जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पी एस ठोंबरे आदींची प्रमुख उपस्थिती होती. 'शोध – कृषी संस्कृतीचा' या विषयावर बोलताना प्रा. भालेराव यांनी प्राचीन लोकपरंपरा, वेदकालीन संस्कृती, रामायण-महाभारतकालीन कृषी व्यवस्था तसेच संत साहित्य आणि कृषीविषयक ग्रंथांच्या आधारे शेती संस्कृतीचा समृद्ध इतिहास उलगडून सांगितला. व्याख्यानादरम्यान त्यांनी पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या विचारांचा संदर्भ देत शेतीच्या प्रारंभाचा इतिहास स्पष्ट केला.

त्रिशूलाचे तिफणीत झालेले रूपांतर, बसव्या बैलाची लोकपरंपरा आणि शेतीसाठी पशूंचा उपयोग याविषयी त्यांनी रंजक माहिती दिली.

# वाचनालयात माता रमाई आंबेडकर व पंडीत नेहरू यांना अभिवादन



■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्थानिक अजय बहुजन हिताय सार्वजनिक वाचनालय संतोषी माता नगर वाशीम येथे दि.२७ मे रोजी सायंकाळी ६:३० वाजता त्याग मूर्ती माता रमाई आंबेडकर व देशाचे पहिले प्रधानमंत्री पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले.

प्रसंगी वाचनालयाचे संस्थापक सचिव समाधान अवचार, डायमंड कोचींग क्लासेसचे संचालक माधव डोंगरदिवे, से.नि.शिक्षक आर.पी.कांबळे, डॉ बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान, आदर्श ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन, समाज भूषण पुरस्कार प्राप्त प्रविण पट्टेबहादूर यांची प्रमुख उपस्थिती होती. सुरूवातीला माता रमाई आंबेडकर व पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेला उपस्थित मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.नंतर राजकुमार पडघान, यांनी माता रमाई आंबेडकर यांचा शांत ,सहन शिलतेचा संघर्ष म्हणजे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना देशासाठी कार्य करण्यासाठी दिलेली साथ होय.त्यांच्या संघर्षातूनच देशाला समता, स्वातंत्र्य बंधुता व न्याय देणारे संविधान मिळाले आहे आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधान हे तत्कालीन प्रधानमंत्री पंडीत जवाहरलाल नेहरू व त्यांच्या मंत्रिमंडळाला स्वाधीन करून समानतेची वागणूक दिली.

# पोहरादेवी येथील 'बणजारा विरासत' संग्रहालयाची मंत्री संजय राठोड यांच्याकडून पाहणी व आढावा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी पोहरादेवी येथील 'बणजारा विरासत' संग्रहालयाला भेट देऊन पाहणी केली तसेच संग्रहालयाच्या कामकाजाचा आणि उपलब्ध सुविधांचा आढावा घेतला.



यावेळी त्यांच्या समवेत लोकमत मिडिया समुहाचे चेअरमन विजय दर्डा यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, कारंजा प्र.उपविभागीय अधिकारी रवी महाले, उपविभागीय पोलिस अधिकारी योगेश क्षीरसागर, मानोरा तहसीलदार राजेंद्र पाटील, सार्वजनिक बांधकाम विभाग मंडळ अकोलाचे अधीक्षक अभियंता सुनील थोटांगे, प्रादेशिक जलसंधारण अधिकारी दिलीप निपाने, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता शुभम जोशी, मृद व जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता श्याम फेरवाणी, कार्यकारी अभियंता (विद्युत) निता बोकाडे, महंत जितेंद्र महाराज आदी उपस्थित होते.

दरम्यान, मंत्री संजय राठोड व मान्यवरांनी सुरुवातीला बणजारा विरासत संग्रहालय परिसरात असलेल्या सेवाध्वजास वंदन केले तसेच संत सेवालाल महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्प अर्पण केले. यावेळी मंत्री राठोड यांनी संग्रहालयाच्या विकासासाठी करण्यात आलेल्या कामांचा आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली. पर्यटकांसाठी उपलब्ध सुविधा, परिसर विकास आणि भविष्यातील नियोजनाबाबतही त्यांनी माहिती घेतली.यावेळी विजय दर्डा यांनी मनोगत व्यक्त करताना महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक व स्व. सुधाकरराव नाईक यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, स्व. वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्राच्या विकासाला नवी दिशा देत कृषी, ग्रामीण विकास आणि सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी मोलाचे योगदान दिले. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे राज्याच्या प्रगतीचा भक्कम पाया रचला गेला.

# संतुलित खत व्यवस्थापन, मृदा आरोग्य व शाश्वत शेती तंत्रज्ञान विषयक जनजागृती कार्यक्रम उत्साहात



■ प्रतिनिधी | वाशिम ■

भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली पुरस्कृत कृषी विज्ञान केंद्र, वाशिम यांच्या वतीने दि. ३० मे रोजी कामरगाव, ता. कारंजा (लाड), जि. वाशिम येथे संतुलित खत व्यवस्थापन, मृदा आरोग्य संवर्धन व शाश्वत शेती तंत्रज्ञान या विषयावर शेतकरी प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ.आर.एल.काळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

कार्यक्रमात कृषी विज्ञान केंद्र, वाशिम येथील कृषीविद्या तज्ञ टी. एस. देशमुख यांनी खरीप हंगामातील पिकांसाठी संतुलित व शिफारशीनुसार खतांचा वापर, मृदा परीक्षणाचे महत्त्व, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन (घ्न्श), तसेच सेंद्रिय, जैविक व रासायनिक खतांचा समन्वित वापर याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी पर्जन्यजल संधारण व मृदा संरक्षणासाठी शेतबांधालगत चर खोदणे, बीबीएफ व मृत सरी तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे महत्त्व स्पष्ट केले. याशिवाय, सोयाबीन ऌ तूर आंतरपीक पद्धती, ठराविक अंतरावर सोड ओळ (एव्ज्ंदै) तंत्र, तसेच इरवड ज्वारी, तीळ व एरंडी यांसारख्या संरक्षणात्मक पिकांचा समावेश, कमी कालावधीच्या सुधारित वाणांची निवड आणि बीजप्रक्रियेचे महत्त्व याबाबत शास्त्रीय माहिती देण्यात आली.

# राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी



■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्थानिक शुक्रवार पेठ येथील राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमांमध्ये त्यांच्या पुतळ्याला वाशिम मंगरूळपीर विधानसभा आमदार श्याम खोडे यांच्या हस्ते हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी भाजपा नगरपरिषद गटनेते नगरसेवक बाळूभाऊ मुरकुटे, पैलवान नगरसेवक गजानन लांडगे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष निलेश सोमानी, भाजपाचे सुभाष नानवटे, जगदीश देशमुख, पैलवान महादेवराव लांबाडे, गजानन वाळके व मान्यवर परिसरातील जेष्ठ मंडळी युवक उपस्थित होते.

# कारगिल योद्धा विष्णू रेखे यांना सैनिक रत्न पुरस्कार जाहीर

■ प्रतिनिधी | वाशिम ■

सैनिक फेडरेशन महाराष्ट्र राज्य तर्फे देण्यात येणारा प्रतिष्ठेचा 'सैनिक रत्न पुरस्कार २०२६' रिसोड तालुक्यातील आसेगाव पेन येथील रहिवासी असलेले सेवानिवृत्त हवालदार विष्णू पी. रेखे यांना जाहीर झाला आहे.



त्यांच्या उल्लेखनीय सैनिकी सेवेची आणि सेवानिवृत्ती नंतरही सुरू असलेल्या राष्ट्रसेवेची दखल घेऊन या पुरस्कारासाठी त्यांची निवड करण्यात आली आहे. २८ ऑक्टोबर १९९६ रोजी भारतीय सैन्याच्या २७० इंजिनिअर रेजिमेंट मध्ये भरती झालेल्या रेखे यांनी तब्बल १८.५ वर्षे देशसेवा बजावली. या कालावधीत त्यांनी जम्मू-काश्मीर, नगरोटा, श्रीनगर, कारगिल, आसाम, अरुणाचल प्रदेश, गुजरात आणि पंजाब यांसारख्या दुर्गम व संवेदनशील भागात आपले कर्तव्य बजावले. ऑपरेशन विजय अंतर्गत झालेल्या कारगिल युद्धात त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून शौर्याचे दर्शन घडवले. याशिवाय गुजरातमधील महापुराच्या वेळी त्यांनी रेस्क्यू ऑपरेशनमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली होती.

त्यांच्या या समर्पित सेवेबद्दल त्यांना ऑपरेशन विजय मेडल, ऑपरेशन स्टार, स्पेशल सर्विस मेडल, ऑपरेशन रक्षक मेडल, लॉंग सर्विस मेडल, हाय अल्टिट्यूड मेडल, सेना सेवा मेडल आणि र्थ्थैएइ र्ख यांसारख्या अनेक सन्माननीय पदकांनी गौरविण्यात आले आहे.

# सुसंस्कार शिबिराचा उत्साहात समारोप

**कारंजा :** अडगाव (खाकी) येथील श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सुसंस्कार शिबिराचा समारोपीय सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. शिबिरातून विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, शिस्त, राष्ट्रप्रेम व सामाजिक जाणीवा रुजविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अडगाव (खाकी)चे माजी सरपंच रमेश पाटील सालोडकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून राजेंद्र आप्पाजी शेटे उपस्थित होते. तसेच ह.भ.प. सौ. शिला चिवरकर, ह.भ.प. अरुण महाराज सालोडकर, अवधूतराव काळे, विलास आप्पा बोनकिले, निलेश आप्पा शेटे, श्याम ठाकरे आणि विनोद डहाके यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. शिबिरार्थी मुला-मुलींनी स्वागतगीत सादर करून उपस्थितांचे स्वागत केले. यावेळी अध्यक्षीय भाषणात रमेश पाटील सालोडकर यांनी आजच्या धकाधकीच्या आणि तंत्रज्ञानप्रधान युगात मुलांमध्ये चांगले संस्कार रुजविणे ही काळाची अत्यंत महत्त्वाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. सुसंस्कार शिबिरांमुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला दिशा मिळते, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य शिक्षिका समीक्षा चवात यांनी केले. शिबिराचे मार्गदर्शन अरुण महाराज सालोडकर यांनी केले. शिबिरात अमोल अरुण सालोडकर यांनी भजन शिक्षण, पुरुषोत्तम कानपुरे यांनी कथाकथन, तर मैथिली चवात यांनी बौद्धिक विषयांवर मार्गदर्शन केले.

# आरोग्य सेवांच्या गुणवत्तेसाठी यंत्रणांनी प्रभावीपणे काम करावे - जिल्हाधिकारी

## आरोग्य विषयक विविध समित्यांची आढावा बैठक

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील नागरिकांना गुणवत्तापूर्ण आणि सक्षम आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य यंत्रणेने अधिक प्रभावीपणे काम करावे. चालू वर्षाअखेर जिल्ह्यातील किमान ५० टक्के आरोग्य संस्था राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानके अंतर्गत प्रमाणित करण्यात याव्यात, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील वाकाटक सभागृहात राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत विविध आरोग्य योजना व कार्यक्रमांचा सविस्तर आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पी. एस. ठोंबरे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे यांच्यासह आरोग्य यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते.

आरोग्य सेवांच्या गुणवत्तेत वाढ करण्यासाठी जिल्हा रुग्णालय वाशिमच्या ँैंए प्रमाणीकरणाला प्राधान्य देण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिल्या. आगामी २८ जून रोजी होणाऱ्या पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेच्या पार्श्वभूमीवर लसींचा साठा सुरक्षित राहण्यासाठी वीजपुरवठा खंडित होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश संबंधित विभागांना देण्यात आले. तसेच पल्स पोलिओ आणि एचपीव्ही लसीकरण मोहिमेबाबत प्रभावी जनजागृती करण्यासाठी विविध शासकीय कार्यालये, सार्वजनिक ठिकाणे आणि गर्दीच्या भागात माहितीपर बॅनर्स व पोस्टर्स लावण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. या मोहिमेत खाजगी वैद्यकीय व्यावसायिक तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्याचे आवाहनही जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले. नियमित लसीकरणाची डेटा एन्ट्री वेळेत पूर्ण करण्यासह गोवर साथीचा संभाव्य उद्रेक रोखण्यासाठी आवश्यक पूर्वतयारी ठेवण्याच्या सूचनाही यावेळी दिल्या. गरजू मातांना जननी सुरक्षा योजनेचा लाभ वेळेत मिळावा यासाठी गरोदर मातांच्या नोंदणीवेळीच आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्याचे निर्देश देत अपुरी कागदपत्रे गरोदरपणाच्या कालावधीतच पूर्ण करून घेण्यावर भर देण्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले.



जिल्ह्यातील स्त्री-पुरुष जन्मदर संतुलित राखण्यासाठी गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र (पीसीपीएनडीटी) कायद्यांतर्गत तपासण्या आणि डिकॉय कारवायांमध्ये सातत्य ठेवण्याचे आदेशही बैठकीत देण्यात आले. 'माझे गाव आरोग्य संपन्न गाव' अभियानांतर्गत सर्व शासकीय विभागांच्या समन्वयातून गावोगावी आरोग्य मेळावे आयोजित करून ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्य तपासणी व उपचार सेवा उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्याच्या सूचना संबंधितांना दिल्या. टेलिमेडिसिन सेवा, असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम तसेच जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसह व्यापक जनजागृती करण्यावरही विशेष भर देण्यात आला.

# कर्जमाफीबाबत कृषीमंत्री दत्तात्रय भरणेंची घोषणा


**मुंबई-**राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' जाहीर केलेली आहे.येणाऱ्या ८ ते १० दिवसांत शेतकऱ्यांची कर्जमाफी केली जाणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची परवानगी घेऊन ही घोषणा करत आहे', असे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले आहे.

महायुतीचे सरकार जनतेबरोबर आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार हे तिन्ही नेते जनतेसाठीच काम करत आहेत', असे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी म्हटले आहे.राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याचा अर्थसंकल्प मांडताना अनेक मोठ्या घोषणा केल्या होत्या. या घोषणांमध्ये शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा देखील समावेश होता. शेतकऱ्यांचे दोन लाख रुपयांपर्यंत कर्ज माफ केले जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले होते.



या कर्जमाफीला 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' असे नावही देण्यात आले. मात्र, राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी बहुप्रतीक्षित कर्जमाफीची घोषणा केली असली तरी अद्याप अंमलबजावणी झालेली नाही किंवा अंमलबजावणी संथ गतीने सुरू असल्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली होती. यातच आता पावसाळा देखील तोंडावर आलेला असताना शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळाला नसल्याने शेतकऱ्यांची कर्जमाफी कधी होणार? असा सवाल विचारला जात होता. तसेच शेतकऱ्यांची कर्जमाफी नेमकी कधी होणार? यावरून विरोधकांनीही राज्य सरकारवर टीकेची झोड उठवली होती. राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज (३१ मे) शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या संदर्भात मोठी घोषणा केली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील एका कार्यक्रमात बोलताना कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची थेट तारीख सांगितली आहे.

## धोका वाढला! इबोलामुळे जगभरात २२३ मृत्यू



**नवी दिल्ली-**आफ्रिकेतील डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगो आणि युगांडामध्ये इबोलाने चांगलीच चिंता वाढवली आहे. इबोलाचा आजार हा घामातून पसरत असल्याचे समोर आल्याने खळबळ उडाली आहे. धक्कादायक म्हणजे कोरोनापेक्षा अधिक वेगाने हा आजार पसरत आहे. शिवाय इबोला या विषाणूमध्ये मृत्यूचे प्रमाणही अधिक आहे. जगभरात इबोलाची लागण ९०६ लोकांना झाली असून २२३ जणांचा मृत्यू झाला आहे.

हिंदुस्थानात या व्हायरलचा पहिला रुग्ण आढळल्यानंतर आरोग्य यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. दिल्लीमध्ये त्याबाबत महत्त्वाची बैठक झाली असून आरोग्य मंत्रालयाने काँगो, युगांडा आणि दक्षिण सुदानमधून येणाऱ्या प्रवाशांसाठी आरोग्यविषयक सूचना जारी केली आहे. विमान कंपन्यांना काही सूचना जारी केल्या आहेत. इबोला प्रतिबंधक लस आणि अँटीबॉडीज विकसित करण्यात भारतीय शास्त्रज्ञ आणि औषध कंपन्या काम करत आहेत.

# मराठवाड्यात टँकरची संख्या तीनशेच्या पार

**छत्रपती संभाजीनगर-** मराठवाड्यात पाणीटंचाईची तीव्रता दिवसेंदिवस अधिक तीव्र होत आहे. मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात विभागातील छत्रपती संभाजीनगरसह विभागातील चार जिल्ह्यांत ९२ गावे आणि ३६ वाड्यांना १५६ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू होता. आता विभागातील १७९ गावांसह ८८ वाड्यांना २० शासकीय आणि २८८ खासगी अशा एकूण ३०८ टँकरद्वारे पाणीपुरवठा होत आहे.

यंदा एप्रिल महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील चार गावांतून टँकरची मागणी झाली. उन्हाचा पारा वाढत गेला आणि त्या प्रमाणात टँकरच्या संख्येतही भर पडत असल्याचे चित्र आहे. एप्रिल अखेर छत्रपती संभाजीनगर, जालना आणि लातूर जिल्ह्यांतील तहानलेल्या गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू होता. दरम्यान, उन्हाचा पारा वाढत गेला त्याप्रमाणे तहानलेल्या गावांची संख्या व सोबतच टँकरच्या संख्येतही भर पडत गेली. टँकरमुक्त असलेल्या अन्य जिल्ह्यांतील तहानलेल्या गावांतून टँकर मागणीचे प्रस्ताव सादर होत आहेत.




छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पाणीटंचाईचा प्रश्न सर्वाधिक गंभीर असल्याचे चित्र आहे. १० मे दरम्यान, १०१ गावे व २५ वाड्यांना १६० टँकरद्वारे पाणीपुरवठा जिल्ह्यात सुरू होता. तर सध्या ११५ गावे व ३८ वाड्यांना १९४ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असल्याचे विभागीय आयुक्तालयाच्या सूत्रांनी नमूद केले. यासह जालना जिल्ह्यातील ४० गावे आणि ३१ वाड्यांना ६८ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. यासह परभणी जिल्ह्यातील सहा गावांना ११ टँकरद्वारे, हिंगोली जिल्ह्यातील एक गाव व तीन वाड्यांना दोन टँकरद्वारे, नांदेड जिल्ह्यातील चार गावे व १५ वाड्यांना १४ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे.

बीड जिल्ह्यातील चार गावांना आठ टँकरद्वारे तसेच लातूर जिल्ह्यातील दोन गावे आणि एका वाडीला दोन टँकरद्वारे, तर धाराशिव जिल्ह्यातील तहानलेल्या सात गावांना नऊ टँकरद्वारे पाणीपुरवठा होत आहे. अशा प्रकारे मराठवाड्यातील या आठ जिल्ह्यांतील १७९ गावे आणि ८८ वाड्यांना मिळून ३०८ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे, अशी माहिती विभागीय आयुक्तालयाच्या सूत्रांनी दिली.

### ९५८ विहिरींचे अधिग्रहण

मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांतील खासगी विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. २८ मेच्या अहवालानुसार, मराठवाड्यात एकूण ९५८ खासगी विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले. यामध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १६४, जालना ६८, परभणी ५४, हिंगोली ४९, नांदेड २६५, बीड १९२, धाराशिव ६९, तर लातूर जिल्ह्यातील ९७ विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले. यात टँकरसाठी १७१ गावांतील १६२ विहिरींचे, तर टँकरव्यतिरिक्त ५७८ गावांतील ७९६ विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे.

## राज्यातील कायदा-सुव्यवस्था ढासळली; काँग्रेसची टीका

मुंबई-महाराष्ट्रातील कायदा-सुव्यवस्था रसातळाला गेली असून, मंत्रालयापर्यंत हप्ते पोहोचवले जात आहेत. राज्यात ड्रग्जचा खुलेआम काळाधंदा सुरू आहे, गांजा विकला जातो, हातभट्ट्या व विषारी दारूने थैमान घातले आहे. या अवैध धंद्यातूनच पुण्यात विषारी दारूने २२ निष्पाप लोकांचे बळी घेतले आहेत. राज्यातील कायदा व सुव्यवस्था ढासळल्याची टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.

मराठा आंदोलनावेळी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नवी मुंबईतील वाशी येथे मध्यरात्री मनोज जरांगे यांना आरक्षण दिल्याचे जाहीर केले व गुलाल उधळला होता, त्यानंतर आझाद मैदानातील आंदोलनावेळीही गुलाल उधळला, यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या दोन्ही आंदोलनावेळी मुख्यमंत्र्यांनी काय आश्वासन दिले होते, ते जाहीर करावे. आरक्षणाचा प्रश्न सोडवायचा असेल, तर जातनिहाय जनगणना करावी. त्यातून मराठा समाजासह समाजांच्या आरक्षणाचा प्रश्न सुटू शकतो.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना मुख्यमंत्र्यांचे अभिवादन

**अहिल्यानगर-**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त चौंडी (ता.जामखेड) येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारकास भेट देऊन अभिवादन केले. यावेळी राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनीही अभिवादन केले.

याप्रसंगी विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे आदी उपस्थित होते. याप्रसंगी मुख्यमंत्र्यांसह उपस्थित मान्यवरांनी अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक येथे जाऊन दर्शन घेतले.यावेळी मंत्रिमंडळातील अनेक सहकारी व अधिकारी उपस्थित होते.

**राज्यपालांचे अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन**

मुंबई-पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती दिनानिमित्त राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी लोकभवन मुंबई येथे त्यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केले. यावेळी लोकभवनातील अधिकारी व कर्मचारी यांनी देखील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस अभिवादन केले.

## संक्षिप्त

### भीमाशंकर मंदिर १५ जूनपासून दर्शनासाठी खुले

**पुणे-**बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेले श्री क्षेत्र भीमाशंकर



मंदिर भाविकांसाठी पुन्हा खुले होणार आहे. गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेल्या नूतनीकरण आणि विकासकामांनंतर मंदिर प्रशासनाने १५ जून २०२६ पासून नियमित दर्शन पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.सन २०२७ मध्ये होणाऱ्या नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीचा भाग म्हणून भीमाशंकर परिसरात विविध विकासकामे हाती घेण्यात आली आहेत. मंदिराच्या मुख्य सभामंडपासह पायरीमार्गाचे काम अंतिम टप्प्यात पोहोचले असून भाविकांच्या सोयीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यात येत आहेत. याच कारणास्तव मंदिर प्रशासनाने ९ जानेवारी २०२६ पासून दर्शनासाठी मंदिर तात्पुरते बंद ठेवले होते. नंतर या बंदीची मुदत ३१ मे २०२६ पर्यंत वाढवण्यात आली होती.

### सिंगापूर ओपनमध्ये भारताची दमदार झेप!

**सिंगापूर-**भारताची स्टार पुरुष दुहेरी जोडी सात्विकसाईराज




रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी सिंगापूर ओपन सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेत शानदार कामगिरी केली आहे. या जोडीने आता अंतिम फेरीत धडक मारली आहे. उपांत्य फेरीत भारतीय जोडीने जगातील अव्वल मानांकित दक्षिण कोरियाच्या किम वोन हो आणि सियो सेउंग जे या जोडीचा २१-१९, २१-१८ अशा सरळ गेममध्ये पराभव केला आहे.५२ मिनिटे रंगलेल्या या रोमांचक सामन्यात सात्विक आणि चिराग यांनी संयम, आक्रमकता आणि उत्कृष्ट कामगिरी करत अंतिम फेरित धडक मारली आहे. विशेष म्हणजे, किम-सियो या जोडीविरुद्ध भारतीय जोडीचा हा पहिलाच विजय ठरला आहे. त्यामुळे या यशाला अधिक महत्त्वाचा मानलं जात आहे. पहिल्या गेममध्ये कोरियन जोडीने सुरुवातीला आघाडी घेतली होती. मध्यंतरावेळी ते १३-११ ने पुढे होते. मात्र, सात्विक-चिराग यांनी दबाव झुगारून सलग गुणांची कमाई करत सामना आपल्या बाजूने फिरवला आणि पहिला गेम २१-१९ ने जिंकला. दुसऱ्या गेममध्येही भारतीय जोडी ११-१४ अशा पिछाडीवर होती. पण त्यानंतर दोघांनी अप्रतिम खेळ दाखवत प्रतिस्पर्ध्यांना पुनरागमनाची संधीच दिली नाही. सलग गुण मिळवत त्यांनी दुसरा गेम २१-१८ ने जिंकला आणि अंतिम फेरीचे तिकीट निश्चित केले.



### मुंबई-गोवा महामार्गावर थरार

**मुंबई-**महाडहून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या एका फॉर्च्यूनर चालकाने मुंबई-गोवा महामार्गावर अक्षरशः धिंगाणा घातला. विरुद्ध दिशेने गाडी चालवत त्याने समोरून येणाऱ्या एका गाडीला कट मारली. पुढे तीन ते चार गाड्यांना धडक दिली. इतक्यावरच न थांबता त्याने वाहतूक पोलिसाच्या अंगावर गाडी घालून त्याला चिरडण्याचा प्रयत्न केला. या घटनेनंतर म्हसळ्याच्या दिशेने पळून जाणाऱ्या या सुसाट गाडीचालकावर पोलिसांनी झडप घातली. रेहान उर्फ मोहम्मद रमजान अली हिरानी (२६) असे या माथेफिरू गाडीचालकाचे नाव असून तो गुजरातमध्ये राहतो.रेहान हिरानी हा गाडीचालक त्याच्या फॉर्च्यूनर कारमधून (जीजे-२३-बीएल-००७२) मुंबईच्या दिशेने निघाला होता. गाडीत त्याची पत्नी व मुलगा याच्यासह आणखी एक पुरुष, महिला व लहान मुलगा हेही होते. ढालघर फाट्याजवळ येताच रेहान हिरानीने महामार्गावरील वन वेमध्ये गाडी घुसवली आणि समोरून वेगाने येणाऱ्या गाडीला त्याने कट मारली. रेहान हिरानीचा हा जीवघेणा स्टंट पाहून समोरून येणाऱ्या गाडीचालकाने गाडी वळवली. त्याने रेहान हिरानी याला रोखण्याचा प्रयत्न केला, परंतु सुसाट गाडी चालवत रेहानने माणगावच्या अरुंद रस्त्यावर आणखी तीन ते चार गाड्यांना धडक देत पळून जाण्याचा प्रयत्न केला. ही घटना ड्युटीवर असलेले वाहतूक पोलीस दीपक शेरकर यांना दिसली. शेरकर यांनी त्याला रोखण्याचा प्रयत्न केला, तेव्हा त्याने शेरकर यांना चिरडून पळ काढण्याचा प्रयत्न केला. शेरकर यांनी वेळीच सुरक्षित बाजूला उडी मारल्याने त्यांचे प्राण सुदैवाने बचावले.

# देशातील पहिल्या एकीकृत शहर घनकचरा प्रक्रिया केंद्रामुळे कचरामुक्त शहराची संकल्पना साकार-मुख्यमंत्री

## तीनशे कोटी रुपयांची गुंतवणूक;१ हजार २०० मेट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया; २८ टन गॅसची निर्मिती

**नागपूर-**देशातील पहिला एकिकृत शहर घनकचरा प्रक्रिया प्रकल्प भांडेवाडी येथे खासगी गुंतवणुकीतून साकारत असून या प्रकल्पामुळे कचरामुक्त शहराची संकल्पना प्रत्यक्षात येणार आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून सुमारे १ हजार २०० मेट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया होऊन २८ टन प्रतिदिन गॅसची निर्मिती होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

भांडेवाडी परिसरात केवा सुस बडे या आंतरराष्ट्रीय उद्योग समूहातर्फे शहरात दररोज निर्माण होणाऱ्या १ हजार २०० मेट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया होणार आहे. या प्रकल्पाची पाहणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार सर्वश्री कृष्णा खोपडे, प्रवीण दटके, महापौर नीता ठाकरे, उपमहापौर लीना हातीबेड, स्थायी समितीच्या सभापती शिवानी दानी, अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान, महानगरपालिका आयुक्त डॉ. विपीन इटनकर, केवा सुसबडे या प्रकल्पाच्या कार्यकारी संचालक रुंदा ठाकूर, फायनान्स डायरेक्टर विनोद तणदोन, उपाध्यक्ष विजय चिपळूणकर तसेच लोकप्रतिनिधी व अधिकारी उपस्थित होते.

एकिकृत शहर घनकचरा प्रक्रिया केंद्र तीन टप्प्यात पूर्ण होणार असून येत्या ऑगस्ट महिन्यापर्यंत शहरातील १ हजार २०० मेट्रिक टन कचऱ्यावर



संपूर्ण प्रक्रिया अत्यंत आधुनिक पद्धतीने करण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी ओला व सुका कचरा संकलित करून त्यावर प्रक्रिया होणार आहे. या प्रक्रियेनंतर बायोगॅस, कंपोस्ट खत तसेच सुक्या कचऱ्यापासून पावर प्लेट्स इंधन तयार होणार आहे.भारतातील अशा प्रकारचा हा पहिलाच प्रकल्प आहे या प्रकल्पासाठी नागपूर महानगरपालिकेतर्फे ३० एकर जागा उपलब्ध करून देण्यात आली असून गॅस विक्रीतून महानगरपालिकेला दरवर्षी १५ लाख रुपयांची रॉयल्टी सुद्धा मिळणार आहे. पर्यावरण पूरक या प्रकल्पासाठी प्रशासनातर्फे आवश्यक सहकार्य करण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिल्या.

एकिकृत शहर घनकचरा प्रक्रिया केंद्रामुळे पुढच्या काळात शहरातील सर्व कचऱ्यावर प्रक्रिया सुलभ होणार असून नागपूर शहर हे घनकचरा व्यवस्थापन तसेच कचरा मुक्त शहर म्हणून संपूर्ण भारतात ओळखले जाईल. या प्रकल्पामुळे पर्यावरणाची हानी होणार नसल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले.

या प्रकल्पाच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या बायोगॅस वर शहरातील १९८ बसेस साठी सीएनजी ही ग्रीन एनर्जी उपलब्ध होणार आहे. खासगी भागीदारी तत्त्वावर सुरू होणाऱ्या या प्रकल्पासाठी महानगरपालिकेला कुठलाही खर्च येणार नसून शहरात निर्माण होणाऱ्या १ हजार ३०० मेट्रिक टन कचरा व्यवस्थापनावर होणारा दैनंदिन खर्च वाचणार आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून चांगल्या प्रतीचे कंपोस्ट खत तयार होईल. महाजनको साठी लागणाऱ्या एनर्जी प्लेट्स सुद्धा उपलब्ध होणार आहेत.

कचऱ्यापासून खत व खतापासून बायोगॅस, कंपोस्ट खत, पॉवर प्लेट्स आदी निर्माण करणारा हा प्रकल्प अत्याधुनिक असल्यामुळे पर्यावरणासाठी आदर्श प्रकल्प म्हणून संपूर्ण भारतात ओळखल्या जाईल, असा विश्वासही यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. प्रारंभी केवा सुजबडे या प्रकल्पाच्या कार्यकारी संचालक रुंदा ठाकूर यांनी संपूर्ण प्रकल्पाची व घनकचऱ्यावर होणाऱ्या प्रक्रिये संदर्भात माहिती दिली. महापौर नीता ठाकरे व महापालिका आयुक्त डॉ. विपिन इटनकर यांनी या प्रकल्पासाठी महानगरपालिकेतर्फे आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची ग्वाही दिली.

# मनोज जरांगे यांचे उपोषण मागे

## राज्य सरकारने सर्व मागण्या मान्य केल्या

**पुणे-**ना मंडप, ना सावली, ना पाणी, ना अन्नष्ठ डोक्यावर आग ओकणारा सूर्य, पायाखाली तव्यासारखी तापलेली जमीन, पारा चाळिशीच्या पुढे गेलेला.. रखरखत्या उन्हात मराठा आरक्षणासाठी सुरू केलेले उपोषण मनोज जरांगे पाटील यांनी सरकारने दिलेल्या आश्वासनानंतर मागे घेतले. उपोषणाला बसण्यापूर्वी सरकारच्या वतीने मराठा आरक्षण उपसमितीचे राधाकृष्ण विखे पाटील आणि भाजप आमदार प्रसाद लाड यांनी दोन वेळा जरांगे यांची मनधरणी करण्याचा प्रयत्न केला. अखेर रात्री उशिरा या प्रयत्नांना यश आले.मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्यात यावे, सगेसोयऱ्यांचा अध्यादेश काढावा, मराठा आंदोलकांवरील



गुन्हे मागे घ्यावेत, मराठा आरक्षण उपसमिती बरखास्त करण्यात यावी, हैदराबाद, सातारा गॅझेटचा आदेश काढावा आदी मागण्यांसाठी शनिवारपासून रखरखत्या उन्हात उपोषणाला बसणार असल्याचे मनोज जरांगे यांनी जाहीर केले होते. २८ मेपर्यंत मागण्या मान्य करण्यासाठी त्यांनी सरकारला मुदत दिली होती. मनोज जरांगे यांची मनधरणी करण्यासाठी अगोदर भाजप आमदार प्रसाद लाड येऊन गेले. त्यानंतर २८ मे रोजी उपसमितीचे राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार प्रसाद लाड, छत्रपती संभाजीनगरचे भाजप शहर अध्यक्ष किशोर शितोळे आले. परंतु, चर्चेतून कोणताही तोडगा निघाला नाही, त्यामुळे आपण उपोषणावर ठाम असल्याचे मनोज जरांगे यांनी सांगितले होते. शनिवारी सकाळी सरकारच्या वतीने १४ आश्वासनांचा खलिता घेऊन राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार प्रसाद लाड हे पुन्हा आंतरवालीत दाखल झाले. भरउन्हात दीड तास मनोज जरांगे आणि विखे पाटील, लाड यांच्यात चर्चा झाली. मात्र, त्यातूनही काही मार्ग निघाला नाही. सरकारच्या प्रस्तावावर मंथन करण्यासाठी अभ्यासकांनी आंतरवालीत यावे, त्यांच्या निर्णयानंतरच बघू, असे ठणकावून सांगत मनोज जरांगे यांनी उपोषण सुरू केले. राधाकृष्ण विखे पाटील, आमदार प्रसाद लाड, किशोर शितोळे यांनी उपोषण सोडू नका, पण निदान सावलीत बसा ही केलेली विनंतीही जरांगे यांनी धुडकावून लावली.

# ८० लाख 'लाडक्या बहिणी' अपात्र

## ई-केवायसीला मुदतवाढ देण्यासही नकार

**मुंबई-**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या भविष्याबाबत उलटसुलट चर्चा सुरू असतानाच आता मोठी अपडेट समोर आली आहे. राज्य सरकारने राबवलेल्या कडक पडताळणी मोहिमेनंतर या योजनाचा लाभ घेणाऱ्या तब्बल ८० लाख महिलांना यातून वगळण्यात आले आहे. विधानसभा निवडणुकीआधी महायुती सरकारने महिलांना दरमहा १५०० रुपये देणारी ही योजना आणली होती. त्यावेळी राज्यातील जवळपास २.४६ कोटी महिला या योजनेचा लाभ घेत होत्या, मात्र आता ही संख्या घटून १.६६ कोटींवर आली आहे. आगामी काळामध्ये ई-केवायसी करण्यासाठीही मुदतवाढ दिली जाणार नाही. तसेच नवीन लाभार्थ्यांना या योजनेत समावेश करण्याचा सरकारचा कोणताही मानस नसल्याचे स्पष्ट झाले आहे. लोकसभा निवडणुकीत बसलेल्या फटक्यानंतर महिला



मतदारांना आपल्याकडे वळवण्यासाठी महायुती सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना आणली. जुलै २०२४ पासून ही योजना सुरू करण्यात आली. त्यानंतर पात्र नसलेल्या लाभार्थ्यांची ओळख पटवण्यासाठी आणि कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी सरकारने ई-केवायसी मोहीम हाती घेतली होती. राज्य सरकारने ई-केवायसीसाटी दिलेली मुदत ३० मार्च रोजी संपली होती. त्यानंतर ही मुदत ३० एप्रिल वाढवण्यात आली होती. ही मुदतही आता संपली असून ज्या महिलांची नावे या यादीतून बाद झाली आहेत त्यांनी पुन्हा मुदतवाढ देण्याची मागणी केली.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १८४ ■ सोमवार, १ जून २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# मुंढे आले अन् गोरस भंडारवर धाड; इतकी वर्षे प्रशासनाचे डोळे मिटले होते का ?

## देशभर गाजलेला गोरसपाक अचानक संशयाच्या भोवऱ्यात; नेमके पाप कुणाचे



**वर्धा जनमाध्यम :** अन्न व औषध प्रशासन विभागाने मगनवाडी येथील गोरस भंडारवर टाकलेल्या धडक कारवाईमुळे जिल्हाभर खळबळ उडाली असली, तरी या कारवाईपेक्षा तिच्यामागील कारणांबाबत अधिक चर्चा रंगू लागली आहे. एकेकाळी वर्ध्याची ओळख बनलेला गोरस भंडार पेढा आणि गोरसपाक हे केवळ जिल्ह्यातच नव्हे तर राज्य, देश आणि परदेशातही प्रसिद्ध होते. गोरसचे दुग्धजन्य पदार्थ अनेक शहरांमध्ये पाठविले जात होते. मुंबईतील अनेक वरिष्ठ अधिकारी, राजकीय नेते, लोकप्रतिनिधी आणि मान्यवरांनीही गोरसपाकच्या उत्पादनांचा आस्वाद घेतल्याचे अनेकदा सांगितले जात होते.

मग आज अचानक त्याच गोरस भंडारच्या उत्पादनांवर भेसळीचा संशय कसा निर्माण झाला? इतकी वर्षे ज्याला 'स्वादिष्ट', 'दर्जेदार' आणि 'वर्ध्याचा ब्रँड' म्हणून गौरवण्यात आले, त्याच उत्पादनांबाबत आता संशय व्यक्त होत असल्याने नागरिक संभ्रमात पडले आहेत. जर उत्पादनांमध्ये त्रुटी होत्या तर त्या यापूर्वी का आढळल्या नाहीत? आणि जर नव्हत्या, तर अचानक एवढी मोठी कारवाई करण्यामागे नेमके कारण काय असे प्रश्न सर्वसामान्य नागरिक विचारत आहेत. रविवारी अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ अंतर्गत वर्धा व नागपूर येथील अधिकाऱ्यांच्या संयुक्त पथकाने गोरस भंडारची तपासणी केली. तपासणीदरम्यान अस्वच्छ वातावरणात उत्पादन व साठवणूक होत असल्याचे आढळून आल्याचा दावा प्रशासनाने केला. तसेच दूध, ताक, तूप आणि खवा यांचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले. नाशवंत असल्याने अडीचशे ते तीनशे लिटर ताक घटनास्थळीस नष्ट करण्यात आले, तसेच भेसळीच्या संशयावरून तब्बल २५ लाख ८६ हजार १६८ रुपयांचा साठा जप्त करण्यात आला असून उत्पादन बंद ठेवण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

मात्र या कारवाईनंतर आणखी एक प्रश्न उपस्थित होत आहे. गेल्या अनेक वर्षांत शहरातील विविध मिठाई हॉटेल संचालक भेसळ करण्याच्या अनेक तक्रारी आणि बातम्या समोर आल्या होत्या. तरीही अन्न व औषध प्रशासनाकडून अशी मोठी कारवाई का करण्यात आली नव्हती संबंधित यंत्रणा दुर्लक्ष करत होती का की कुणाच्या प्रभावामुळे कारवाई होत नव्हती या प्रश्नांवर प्रशासनाने स्पष्ट भूमिका घेण्याची मागणी होत आहे.

दरम्यान, तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासन आयुक्तपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर विभाग अचानक सक्रिय झाल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळेच मुंढे आले आणि कारवाई झाली अशी चर्चा सुरू आहे. मात्र, ही कारवाई केवळ नियमित तपासणीचा भाग आहे की त्यामागे अन्य काही कारणे आहेत, याबाबत अधिकृत खुलासा अद्याप झालेला नाही. नमुने तपासणीचा अंतिम अहवाल येणे बाकी असताना दोष निश्चित झालेला नाही. त्यामुळे सत्य काय आहे, हे प्रयोगशाळेच्या अहवालातूनच स्पष्ट होणार आहे. परंतु एक गोष्ट निश्चित आहे, गोरस भंडारवरील कारवाईने केवळ एका संस्थेवरच नव्हे तर प्रशासनाच्या पूर्वीच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उभे केले,

### कारवाईचा फटका शेतकरी, ग्राहक अन् चिमुकल्यांना

अन्न व औषध प्रशासनाच्या कारवाईनंतर गोरस भंडारची दूध खरेदी-विक्री पुढील आदेशापर्यंत बंद करण्यात आली आहे. मात्र या निर्णयाचा सर्वाधिक फटका शेतकरी आणि सामान्य ग्राहकांना बसत असल्याची चर्चा शहरात सुरू आहे. सायंकाळी हजारो लिटर दूध घेऊन आलेल्या शेतकऱ्यांना दूध स्वीकारले जाणार नसल्याचे सांगण्यात आल्याने त्यांच्यासमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. दिवस-रात्र कष्ट करून उत्पादित केलेले दूध आता टाकायचे कुठे, विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांना नियमित दूधपुरवठा खंडित होण्याची भीती व्यक्त होत आहे. कारवाई झाली ती योग्य की अयोग्य यावर चर्चा असली, तरी त्याची झळ मात्र थेट शेतकरी आणि जनतेला बसत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

# अबब...! १०० कोटींचा उड्डाणपूल की भ्रष्टाचाराचा उड्डाणपूल

तीन वर्षांत तब्बल सहा वेळा भगदाड; कंत्राटदार-बांधकाम अधिकाऱ्यांच्या संगनमताचा संशय



**हिंगणघाट । जनमाध्यम :** हिंगणघाटच्या नांदगाव चौकातील कोट्यवधी रुपये खर्चून उभारण्यात आलेला उड्डाणपूल पुन्हा एकदा जीवघेण्या भगदाडामुळे चर्चेत आला आहे. विशेष म्हणजे अवघ्या तीन वर्षांच्या कालावधीत या पुलाला तब्बल सहा वेळा भगदाड पडल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. त्यामुळे हा उड्डाणपूल विकासाचे प्रतीक नसून भ्रष्टाचाराचे स्मारक ठरत असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करीत आहेत.

ज्या पुलाच्या उद्घाटनावेळी विकासाची मोठी स्वप्ने दाखविण्यात आली, तोच पूल आता नागरिकांच्या जीवाशी खेळत असल्याचा आरोप होत आहे. वारंवार पडणाऱ्या भगदाडांमुळे बांधकामाचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याचे उघड होत असून संबंधित कंत्राटदार आणि बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

१०० कोटी रुपयांचा निधी खर्च होऊनही पूल सुरक्षित राहू शकत नसेल, तर जनतेच्या कररुपी पैशाचा हिशेब कोण देणार, असा सवाल उपस्थित होत आहे. केवळ रंगरंगोटी, लायटिंग आणि सौंदर्यीकरणाच्या गाजावाजामागे निकृष्ट कामे लपविण्याचा प्रयत्न झाला काय, अशीही चर्चा शहरात सुरू आहे.

उड्डाणपुलावरील हे भगदाड केवळ सिमेंटमधील नसून प्रशासनाच्या कारभारातील भगदाड असल्याची टीका होत आहे. एखादी मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी दोषींवर कठोर कारवाई करून संपूर्ण बांधकामाची उच्चस्तरीय चौकशी करावी, अशी जोरदार मागणी हिंगणघाटकरांकडून होत आहे.

# स्वतःचा वाढदिवस विसरून समाजाचा उत्सव साजरा करणारा कर्मयोगी

## वृक्षारोपण आणि समाजसेवकांच्या सन्मानाने बाळकृष्ण हांडे दादांचा ८२ वा वाढदिवस साजरा



**वर्धा जनमाध्यम :** वाढदिवस म्हटला की केक, शुभेच्छांचा वर्षाव आणि जल्लोष असे चित्र डोळ्यांसमोर उभे राहते. मात्र गुरुदेव सेवा मंडळाचे ज्येष्ठ कार्यकर्ते तथा राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांचे निष्ठावंत प्रचारक बाळकृष्ण हांडे दादा यांनी आपल्या ८२ व्या वाढदिवसानिमित्त समाजासमोर एक वेगळाच आदर्श ठेवला. निसर्ग सेवा समितीच्या ऑक्सिजन पार्क परिसरात वृक्षारोपण करून तसेच तीन ज्येष्ठ समाजसेवकांचा सन्मान करून त्यांनी वाढदिवसाला समाजसेवेचे स्वरूप दिले.

प्रा. डॉ. राजेंद्र मुंढे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात प्रमोद भोयर, सौ. वेणूताई हांडे, बाबाराव राऊत, श्री. मोहोड यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. पहाटे चार वाजता उठून ग्रामगीता पठण करणारे आणि राष्ट्रसंतांचे विचार शेवटच्या माणसापर्यंत पोहोचविण्यासाठी आयुष्य वेचणारे हांडे दादा आजही तरुणांनाही लाजवेल अशा उत्साहाने कार्यरत आहेत. यावेळी पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे सुरेश नागापुरे, राष्ट्रसंत विचारांचे प्रचारक गजानन फाले (हिंगणघाट) आणि बालसंस्कार चळवळीचे कार्यकर्ते कृष्णाजी पाहुणे (बोरगाव) यांचा सत्कार करण्यात आला. स्वतःचा गौरव टाळून इतरांचे कर्तृत्व समाजासमोर आणण्याचा हांडे दादांचा हा उपक्रम उपस्थितांच्या मनाला भावला.

मोठेपण स्वतःसाठी जगण्यात नाही, तर दुसऱ्यांचे मोठेपण जपण्यात आहे, हा संदेश देणारा हा सोहळा अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला. कार्यक्रमाचे संचालन रमेश भोले यांनी केले तर आभार डॉ. शोभा बेलखोडे यांनी मानले. राष्ट्रवंदनेने कार्यक्रमाची सांगता झाली.



### उन्हाच्या झळांनी मुक्या जीवांचीही लाहीलाही

**वर्धा :** वाढत्या उष्णतेमुळे माणसांसह मुक्या प्राण्यांचेही हाल होत आहेत. माणसांकडे उष्णतेपासून बचावाची साधने असली तरी प्राण्यांना सावली आणि थंडावा शोधत भटकावे लागत आहे. आलोडी येथील एका रहिवासी संकुलाच्या बेसमेंटमध्ये माकडांची संपूर्ण टोळी आश्रयासाठी येऊन शांतपणे बसल्याचे चित्र पाहायला मिळाले. उन्हाच्या तीव्र झळांपासून बचावासाठी त्यांनी निवडलेला हा थंडावा अनेकांना अंतर्मुख करून गेला. वाढत्या तापमानाचा फटका वन्यजीवांनाही बसत असल्याचे या घटनेतून दिसून आले.

**छायाचित्र : राहुल तेलरांधे, वर्धा**

# तुटलेल्या वीजतारेचा फटका; दोन गायींचा मृत्यू



**मांडगाव :** हिंगणघाट तालुक्यातील मांडगाव येथे रविवारी दुपारी वादळी वाऱ्यामुळे विद्युत पोलवरील वीजवाहक तार तुटून पडल्याने दोन गायींचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेत गायी राखणारा व्यक्ती थोडक्यात बचावल्याने मोठा अनर्थ टळला.

मिळालेल्या माहितीनुसार, दुपारी ३ ते साडेतीन वाजताच्या सुमारास परिसरात मेघगर्जनेसह जोरदार वादळी वारे सुरू होते. यावेळी स्थानिक रहिवासी सुरेश भिमाजी डांगरी यांच्या मालकीच्या तसेच ब्रह्म-विष्णू मंदिराच्या गायी चारून नदीवर पाणी पाजण्यासाठी नेण्यात येत होत्या. रमेश नारायण डफ व महादेव डफ यांच्या शेतालगत असलेल्या विद्युत पोलवरील वीजतार अचानक तुटून खाली पडली.

कळपातील बहुतांश गायी पुढे गेल्या होत्या. मात्र मागून येणाऱ्या दोन गायींचा तुटलेल्या तारेशी संपर्क आल्याने त्यांना जबरदस्त विजेचा धक्का बसून त्या जागीच दगावल्या. गायी राखणारे तुकाराम बावणे हे काही अंतरावर असल्याने प्रसंगावधान राखत मागे सरकले व त्यांचा जीव वाचला.

घटनेची माहिती मिळताच मांडगावचे पोलिस पाटील गणेश तडस यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. त्यानंतर हिंगणघाट पोलिसांना माहिती देण्यात आली. मांडगाव बिटचे जमादार किशोर गाडेवाण व पोलीस शिपाई स्वप्नील निकोर पुढील तपास करीत आहेत. या घटनेमुळे पशुपालक सुरेश डांगरी यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# १५ मिनिटांच्या वादळाने हिरावले हक्काचे छत

## टाकळी (निधा) येथे वादळी वाऱ्याचा तडाखा; अनेक घरांची टिनपत्रे उडाली, संसार उघड्यावर



**टाकळी (निधा) :** अवघ्या १५ मिनिटांच्या वादळाने टाकळी (निधा) गावातील अनेक कुटुंबांचे होत्याचे नव्हते केले. रविवारी दुपारी ४ वाजताच्या सुमारास आलेल्या अचानक वादळी वारा व अवकाळी पावसाने गावाला जबर तडाखा दिला. या वादळात रत्नाकर लोंढे, गंगाधर थुल, कमलाकर वनकर यांच्यासह अनेक गावकऱ्यांच्या घरांवरील टिनपत्रे अक्षरशः कागदासारखी उडून गेली.

दुपारच्या शांत वातावरणात अचानक काळे ढग दाटून आले आणि काही क्षणांतच सोसाट्याच्या वाऱ्याने रौद्ररूप धारण केले. 'धाड-धाड' आवाज करत घरांची छपरे हवेत उडाली. अनेकांच्या डोळ्यांदेखत त्यांच्या आयुष्यभराच्या कष्टाचे घर उद्ध्वस्त झाले. ज्या छताखाली कुटुंबाने सुख-दुःखाचे क्षण अनुभवले, तेच छत क्षणात नाहीसे झाल्याने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला.

वादळानंतरचे दृश्य अत्यंत हृदयद्रावक होते. घरांवरील पत्रे वाकडी-तिकडी होऊन शेतात व अंगणात विखुरलेली दिसत होती. अन्नधान्य, कपडे, संसारोपयोगी साहित्य आणि महत्त्वाची कागदपत्रे पावसात भिजून नुकसान झाले. अनेक झाडेही उन्मळून पडली.

सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणात झाले आहे. ग्रामस्थांनी वादळग्रस्त कुटुंबांना मदतीचा हात दिला असून प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून आर्थिक मदत व घर दुरुस्तीसाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# वादळी वाऱ्याचा कहर; घरांची छपरे उडाली, वीजपुरवठा खंडित

## पोहना, वडनेर, शेकापूर, आजनसरा परिसरात मोठे नुकसान



**वडनेर जनमाध्यम :** हिंगणघाट तालुक्यातील पोहना, वडनेर, शेकापूर व आजनसरा परिसरात रविवारी दुपारी अचानक आलेल्या वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला. अवघ्या काही मिनिटांच्या या नैसर्गिक आपत्तीमुळे ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

दुपारी सुमारे चार वाजताच्या सुमारास जोरदार वादळी वारे सुरू झाले. त्यानंतर तुफान पावसाने हजेरी लावल्याने अनेक घरांवरील टीनपत्रे उडून गेली. काही ठिकाणी झाडे उन्मळून पडल्याने वाहतुकीलाही अडथळा निर्माण झाला. शेतातील बांध कोसळल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून पिकांनाही फटका बसला आहे.

वादळी वाऱ्याच्या तडाख्यात अनेक ठिकाणी वीज खांब कोसळल्याने वीजपुरवठा खंडित झाला. त्यामुळे नागरिकांना अंधाराचा सामना करावा लागला. वीज वितरण कंपनीचे कर्मचारी नुकसानग्रस्त भागात दुरुस्तीचे काम हाती घेत असल्याची माहिती मिळाली.

अचानक आलेल्या या वादळी पावसामुळे ग्रामीण भागातील जनजीवन विस्कळीत झाले असून नुकसानग्रस्त शेतकरी व नागरिकांना तातडीने मदत देण्याची मागणी होत आहे. महसूल प्रशासनाने पंचनामे करून नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत द्यावी, अशी अपेक्षा परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# पावसापासून बचावासाठी थांबला; विजेच्या तडाख्याने मजूर ठार



**नंदोरी :** समुद्रपूर तालुक्यातील नंदोरी येथील राजाभाऊ मॅडमवार यांच्या गिट्टी खदानीत काम करणाऱ्या एका मजुराचा विजेच्या तडाख्याने मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना रविवारी दुपारी घडली.

अनुज सिंग मरावी (२९, रा. मकरा, ता. पाली, जि. उमरिया, मध्य प्रदेश) असे मृतकाचे नाव आहे. तो खदानीत ब्लास्टिंग मशीन ऑपरेटर म्हणून कार्यरत होता. दुपारी सुमारे ४ वाजताच्या सुमारास वादळी वाऱ्यासह मेघगर्जना आणि पावसाला सुरुवात झाली. त्यामुळे काम बंद करून तो शेडकडे जात होता.

याचवेळी झाडाखाली ठेवलेल्या पाण्याच्या कॅनमधून पाणी पिण्यासाठी तो थांबला. हातातील ग्लास घेऊन कॅनला स्पर्श करताच अचानक वीज कोसळली. विजेचा जबरदस्त धक्का बसल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच पोलीस पाटील इमरान शेख यांनी समुद्रपूर पोलिसांना कळविले. पोलीस उपनिरीक्षक चेतन टेंभुर्णे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## चिखलात गाडला विकास

# गांगापूर-वडनेर पांदण रस्त्याची दयनीय अवस्था; ३० वर्षांपासून शेतकऱ्यांची फरफट

### निवेदने देऊनही प्रशासन मुके, लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष; संतप्त शेतकऱ्यांचा सवाल



**वडनेर । जनमाध्यम :** हिंगणघाट तालुक्यातील गांगापूर ते वडनेर या गावांना जोडणारा पांदण रस्ता गेल्या २५ ते ३० वर्षांपासून दुर्लक्षित असून शेतकरी आणि शेतमजुरांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न बनला आहे. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७ आणि श्री साईबाबा लोकप्रबोधन कला महाविद्यालयाकडे जाणारा हा महत्त्वाचा मार्ग आजही चिखल, खड्डे आणि काटेरी झुडपांच्या विळख्यात अडकला आहे.

पावसाळ्यात रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचत असल्याने चिखलाचे साम्राज्य निर्माण होते. नाल्यांची व्यवस्था नसल्यामुळे गावातील व शेतातील पाणी थेट रस्त्यावर येते. परिणामी अनेक ठिकाणी तीन फूट खोल खड्डे पडले असून बैलबंडी, ट्रॅक्टर आणि इतर वाहने वारंवार अडकून पडतात. कापूस, तूर, सोयाबीन, गहू, हरभरा, खत आणि शेती साहित्य वाहून नेताना शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

सामाजिक कार्यकर्ते सचिन महाजन आणि भाजप तालुका प्रतिनिधी कैलास भोयर यांनी अनेकदा निवेदने देऊनही प्रश्न कायम असल्याचा आरोप करण्यात येत आहे. अपूर्ण रस्त्यामुळे काही ठिकाणी अतिक्रमणाचे संकटही निर्माण झाले आहे.

विकासाच्या घोषणा कागदावरच राहिल्या का असा प्रश्न शेतकरी उपस्थित करीत असून गांगापूर-वडनेर पांदण रस्त्याचे तातडीने पक्कीकरण करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी अमोल राऊत, विलास राऊत, विनोद भोयर, विठ्ठल पोहनकर व अन्य शेतकऱ्यांनी केली आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## भारताची मनधरणी

अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मार्को रुबिओ (मार्कियो) यांचा अलीकडील भारत दौरा अशा वेळी पार पडला, जेव्हा दोन्ही देशांमधील संबंध गेल्या वर्षभरापासून अभूतपूर्व तणावातून आणि एका संथ दुरावल्यातून जात होते. ट्रम्प प्रशासनाचे कठोर आयात शुल्क (टॅरिफ) धोरण आणि रशियाकडून भारताची तेल खरेदी यावरून निर्माण झालेली कटुता कमी करण्यासाठी रुबिओ भारतात आले होते. नवी दिल्लीमध्ये त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्याशी दीर्घ चर्चा केली तसेच क्वाड परिषदेच्या निमित्ताने हिंद-प्रशांत (इंडो-पॅसिफिक) क्षेत्रातील सुरक्षेचा आढावा घेतला.या दौऱ्याने दोन्ही देशांमधील सामरिक भागीदारीला नवी गती दिली असली, तरी व्यापारी आघाडीवर रुबिओ यांनी केलेला पाचशे अब्ज डॉलरच्या खरेदीचा दावा आणि भारत-अमेरिका व्यापार कराराची (बीटीए) सद्यस्थिती यामुळे एका मोठ्या धोरणात्मक संभ्रमाला जन्म दिला आहे. या दौऱ्याचे यशापयश आणि त्यातील अंतर्विरोध समजून घेणे गरजेचे आहे. या दौऱ्यातील सर्वात मोठा आणि लक्षवेधी ठरलेला मुद्दा म्हणजे रुबिओ यांनी 'सोशल मीडिया' वर केलेली घोषणा. भारताने पुढील पाच वर्षांमध्ये अमेरिकेकडून पाचशे अब्ज डॉलर (सुमारे ४१ लाख कोटी रुपये) किमतीच्या वस्तू खरेदी करण्याचे मान्य केले असल्याचा दावा त्यांनी केला. यामध्ये प्रामुख्याने ऊर्जा (तेल आणि गॅस), प्रगत तंत्रज्ञान (जीपीयू आणि डेटा सेंटर्स) आणि कृषी उत्पादनांचा समावेश असल्याचे सांगितले गेले. भारताचा सध्याचा अमेरिकेशी असलेला व्यापार, त्यातील अमेरिकेकडून होणाऱ्या आयातीशी असलेले प्रमाण पाहता रुबिओ यांनी केलेला पाचशे अब्ज डॉलरच्या खरेदीचा दावा आकडा अतिरंजित वाटतो. सध्याच्या आर्थिक वास्तवाचा विचार केला असता भारत दरवर्षी अमेरिकेकडून साधारणपणे ५३ अब्ज डॉलरची आयात करतो. रुबिओ यांचा पाचशे अब्ज डॉलरचा दावा खरा मानायचा झाल्यास भारताला आपली वार्षिक आयात दुप्पट करून दरवर्षी शंभर अब्ज डॉलरवर न्यावी लागेल. गेल्या वर्षभरात अमेरिकन डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपयाचे मूल्य सुमारे १२ टक्क्यांनी घसरले आहे. अशा स्थितीत अमेरिकेकडून मोठ्या प्रमाणावर आयात वाढवणे भारताच्या परकीय चलन साठ्यावर प्रचंड ताण आणू शकते. भारताची व्यापारी तूट आधीच चिंताजनक असताना केवळ अमेरिकेला खूश करण्यासाठी एवढी मोठी आयात करणे भारताच्या देशांतर्गत अर्थव्यवस्थेसाठी आणि स्थानिक उद्योगांसाठी आत्मघातकी ठरू शकते. रुबिओ यांच्या दौऱ्यातून भारत-अमेरिका द्विपक्षीय व्यापार कराराच्या (बीटीए) दिशेने प्रगती झाली का, या प्रश्नाचे होकारार्थी उत्तर देण्यापूर्वी या कराराच्या बदललेल्या कायदेशीर चौकटीकडे पहावे लागेल. रुबिओ यांनी दावा केला, की दोन्ही देश व्यापार कराराच्या अगदी अंतिम टप्प्यात असून हा करार आठवड्यांमध्येच त्यावर स्वाक्षरी होईल; परंतु वस्तुस्थिती वेगळी आहे. अलीकडच्या काळात अमेरिकेने भारतीय उत्पादनावरील प्रस्तावित २५ टक्के आयात शुल्क कमी करून १८ टक्के करण्याचे मान्य केले होते, तर त्या बदल्यात भारताने अमेरिकेकडून मोठ्या प्रमाणावर ऊर्जा आणि विमानांची खरेदी करण्याचे आश्वासन दिले होते; मात्र २० फेब्रुवारी रोजी अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने ट्रम्प प्रशासनाचे आयात शुल्क कायदे अंशतः रद्द ठरवले. यामुळे कराराचा पायाच कोसळला. न्यायालयाच्या निर्णयानंतर ट्रम्प प्रशासनाने सरसकट सर्व देशांवर दहा टक्के 'फ्लॅट टॅरिफ' लादले. याचा अर्थ असा, की भारताने अमेरिकेशी विशेष करार केला, तरी भारताला कोणतीही विशेष सवलत मिळणार नाही, कारण सर्वांसाठी एकच नियम लागू झाला आहे. अमेरिकेकडून भारताला कोणतीही विशेष व्यापारी सवलत मिळणार नसल्यास भारताने पाचशे अब्ज डॉलरच्या खरेदीचे बंधन का पाळावे, हा मूळ प्रश्न आहे.नुकतेच मलेशियानेही याच कारणास्तव अमेरिकेसोबतचा आपला व्यापार करार 'शून्य आणि बाद' घोषित केला. त्यामुळे रुबिओ गाजावाजा करत असलेल्या व्यापार कराराचा व्यापारी तर्क अत्यंत कमकुवत झाला आहे. व्यापारी आघाड्यांवर संभ्रम असला, तरी भूराजकीय आणि सामरिक पातळीवर या दौऱ्याने मोठे यश मिळवले आहे.आणखी एक मुद्दा.गेल्या काही काळापासून युरोप आणि मध्य पूर्वेतील युद्धांमध्ये व्यस्त असल्याने 'क्वाड' परिषदेकडे अमेरिकेचे काहीसे दुर्लक्ष झाले होते,अशी टीका होत होती; मात्र रुबिओ यांनी ही कसर भरून काढली. दक्षिण चीन समुद्र आणि हिंद महासागरातील चीनचा वाढता विस्तारवाद रोखण्यासाठी 'क्वाड'ने सागरी सुरक्षा अधिक कडक करण्याचा निर्णय घेतला आहे.सागरी क्षेत्रातील संशयास्पद जहाजांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी माहितीची देवाणघेवाण वाढवण्यावर एकमत झाले. सेमीकंडक्टर, इलेक्ट्रिक वाहने आणि प्रगत संरक्षण उपकरणांसाठी आवश्यक असणाऱ्या 'क्रिटिकल मिनरल्स' वर सध्या चीनची मक्तेदारी आहे. ही मक्तेदारी मोडून काढण्यासाठी 'क्वाड' देशांनी एकत्रित पुरवठा साखळी निर्माण करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. रुबिओ यांनी स्पष्ट केले, की आम्हाला केवळ वर्षातून दोनदा भेटणाऱ्या देशांचा गट बनायचे नाही, तर जमिनीवर ठोस काम करणारा मंच बनायचे आहे. वर्षाच्या शेवटी होणाऱ्या 'क्वाड' शिखर परिषदेसाठी ठोस प्रकल्प तयार ठेवण्याचे आदेश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत. एकीकडे अमेरिका भारताला आपला सर्वात महत्त्वाचा सामरिक भागीदार म्हणते, आशियामध्ये चीनला शह देण्यासाठी भारताच्या लष्करी ताकदीची गरज ओळखते; परंतु दुसरीकडे, व्यापाराचा विषय येतो तेव्हा त्यांचे धोरण अत्यंत 'ट्रांझॅक्शनल' (केवळ देवाणघेवाणीचे) आणि व्यापारी नफा-तोटा पाहणारे बनते. रुबिओ यांनी पत्रकार परिषदेत सांगितले, की ट्रम्प प्रशासनाचे व्यापारी धोरण भारताला त्रास देण्यासाठी नाही, तर अमेरिकेची जागतिक व्यापारी तूट भरून काढण्यासाठी आहे; परंतु भारतासारख्या विकसनशील देशाला अमेरिकेच्या अंतर्गत आर्थिक समस्यांचे ओझे वाढवण्यास भाग पाडणे कितपत न्याय्य आहे, हा प्रश्न अनुत्तरित राहतो. संरक्षण आणि तंत्रज्ञान क्षेत्रात सहकार्य वाढवण्याचे आश्वासन दिले गेले असले, तरी आयात शुल्काचा तिढा सुटत नाही, तोपर्यंत व्यापारी संबंधांमधील पूर्ण क्षमता प्रत्यक्षात येऊ शकत नाही. थोडक्यात सांगायचे तर रुबिओ यांचा भारत दौरा एकाच वेळी 'राजकीय सुसंवाद' आणि 'व्यापारी संभ्रम' यांचे मिश्रण ठरला आहे.

# क्लासरुम कुलुपात, कोचिंग जोरात

**प्रवेशपरीक्षेच्या तयारीच्या नावाने उभ्या राहिलेल्या 'समांतर शिक्षण व्यवस्थेने' आपली पारंपारिक शाळा-कॉलेज संस्कृती उद्ध्वस्त केली आहे. दुर्दैवाने, आपण एका संपूर्ण पिढीला केवळ 'परीक्षार्थी' बनवून सोडले आहे. आज अकरावी-बारावी म्हणजे शिक्षण कमी आणि प्रवेशपरीक्षाच्या रणांगणाची तयारी अधिक, अशी परिस्थिती आहे.**

राष्ट्रीय पात्रता व प्रवेश म्हणजेच 'नीट' परीक्षेच्या विश्वासार्हतेभोवती जे वादळ निर्माण झाले आहे, त्याने देशातील कोट्यवधी प्रामाणिक विद्यार्थी आणि पालकांच्या पायाखालची जमीनच सरकली आहे. निकालांनंतर विद्यार्थ्यांच्या डोळ्यांतून वाहणारे अश्रू हे केवळ तांत्रिक त्रुटींचे फलित नाही, तर एका सडलेल्या व्यवस्थेचे उघडे पडलेले विदारक वास्तव आहेत. पेपर लीकच्या घटना, गुणांमधील संशयास्पद गल्लत आणि न्यायालयापर्यंत पोहोचलेले हे वाद केवळ एका परीक्षेतील गैरव्यवहारापुरते मर्यादित नाहीत. हा खरेतर आपल्या संपूर्ण शिक्षण व्यवस्थेला लागलेल्या एका असाध्य कर्करोगाचे दृश्य स्वरूप आहे. वैद्यकीय, अभियांत्रिकी, केंद्रीय विद्यापीठे यांसारख्या प्रत्येक ठिकाणी प्रवेशासाठी स्वतंत्र परीक्षा, स्वतंत्र अभ्यास आणि त्यासाठी एक अवाढव्य स्वतंत्र अर्थव्यवस्था निर्माण झाली आहे. गेल्या दोन दशकांत कोचिंग क्लासेस हा केवळ एक पूरक पर्याय राहिलेला नाही, तर अनेक विद्यार्थ्यांसाठी तीच मुख्य शिक्षणव्यवस्था बनली आहे.

**'कोचिंग इकॉनॉमी'चे साम्राज्य**

पुणे, कोटा, हैदराबाद, दिल्ली, नाशिक आणि लातूर यांसारख्या शहरांत कोचिंग हा आता एक स्वतंत्र आणि बलाढ्य आर्थिक विभाग बनला आहे. लाखोंची फी, निवासी बॅचेस, डिजिटल टेस्ट सिरीज, 'रँकर्स'चे कोट्यवधींचे जाहिरात फलक आणि पालकांसाठीचे व्यावसायिक समुपदेशन; हे सगळे आता शिक्षणाच्या बाजारव्यवस्थेचे मुख्य घटक झाले आहेत.

या उद्योगाची 'इकॉनॉमी' पालकांचे कंबरडे मोडणारी आहे. अकरावी-बारावीच्या दोन वर्षांसाठी एका विद्यार्थ्यामागे सरासरी तीन ते पाच लाख रुपये केवळ कोचिंग फी म्हणून मोजावे लागतात. यात राहण्याचा, खाण्याचा आणि तथाकथित 'डमी कॉलेज'चा खर्च जोडला, तर हा आकडा सहज सात ते १० लाखांच्या घरात जातो. हा पैसा वसूल करण्यासाठी मध्यमवर्गीय पालक आपली आयुष्यभराची पुंजी लावतात, कर्ज काढतात किंवा जमिनी गहाण ठेवतात. शिक्षणाचे हे असे क्रूर 'बाजारी ज्ञान' देण्याऐवजी 'रँक' विकण्याचा धंदा बनले आहे. अर्थात, अनेक प्रामाणिक शिक्षक आणि संस्थाही गुणवत्तापूर्ण मार्गदर्शन करत आहेत; मात्र संपूर्ण व्यवस्थेचे व्यापारीकरण ही चिंतेची बाब ठरत आहे. धक्कादायक बाब म्हणजे, आता पाचवी-सहावीपासूनच 'फाउंडेशन कोर्सेस'च्या नावाखाली कोवळ्या मुलांना या चक्रव्यूहात ओढले जात आहे.

कोविडनंतर डिजिटल कोचिंग प्लॅटफॉर्म्सनी या समांतर व्यवस्थेला आणखी वेग दिला आहे. मोबाईल ॲप्स, रेकॉर्डेड लेक्चर्स आणि एआय आधारित टेस्ट विश्लेषण यामुळे मोठ्या शहरांपुरता मर्यादित असलेला कोचिंग उद्योग आता थेट ग्रामीण घरांपर्यंत पोहोचला आहे. मात्र, या डिजिटल शिक्षणामुळे शिक्षक-विद्यार्थी संवाद, वर्गातील चर्चा आणि सामूहिक शिकण्याचा अनुभव कमी होत चालल्याची खंत शिक्षणतज्ज्ञ व्यक्त करतात. अनेक विद्यार्थ्यांचे शिक्षण आता स्क्रीन, टेस्ट सिरीज आणि अल्गोरिदमपुरते मर्यादित होत आहे.

**भ्रष्टाचाराचे केंद्रीकरण**

हा सगळा प्रवास एका रात्रीत घडलेला नाही. १९९० नंतर व्यावसायिक शिक्षणाच्या संधी वाढल्या आणि अभियांत्रिकी-वैद्यकीय क्षेत्रातील स्पर्धा तीव्र झाली. गेल्या दीड-दोन दशकांत राज्यांच्या स्वतःच्या सीईटी (CET) बंद करून 'एक देश, एक परीक्षा' या सूत्राखाली सर्व यंत्रणेचे केंद्रीकरण झाले. 'ऑब्जेक्टिव्ह पॅटर्न', वेग, अचूकता आणि वेळ व्यवस्थापन यावर आधारित अभ्यासपद्धती विकसित झाली. परिणामी शाळा-कॉलेजांमधील पारंपरिक अध्यापन आणि प्रवेशपरीक्षांची मागणी यामध्ये मोठी दरी निर्माण झाली.

राष्ट्रीय स्तरावर एकच परीक्षा असण्याच्या कल्पनेमागे पारदर्शकता आणि समान संधीचा मोठा दावा केला गेला होता. मात्र, प्रत्यक्षात यामुळे 'नॅशनल टेस्टिंग एजन्सी' (NTA) सारख्या संस्थांच्या हाती अतिरिक्त केंद्रीकरण झाले आणि त्यातून एका मोठ्या व्यावसायिक यंत्रणेला गैरव्यवहार करणे अधिक सोपे झाले की काय, अशी शंका घेण्यासारखी आजची परिस्थिती आहे.दुसरीकडे, अकरावी-बारावीच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेतील ढिसाळपणामुळे दरवर्षी हजारो विद्यार्थी आणि पालक गोंधळात पडतात. प्रवेश फेऱ्यांचे महिनोन् महिने चालणारे सत्र विद्यार्थ्यांचे सुरुवातीचे मौल्यवान दिवस खाऊन टाकते. या विलंबाचा नेमका फायदा घेऊन खासगी क्लासेस आपले वर्ग आधीच सुरू करून मोकळे होतात. साहजिकच, विद्यार्थ्यांचा ओढा कॉलेजपेक्षा क्लासकडे अधिक वाढतो.

**छुप्या युतीचे गुपित**

यात सर्वांत मोठी विसंगती अशी की, एकीकडे विविध प्रवेशप्रक्रियांमध्ये पात्रता निकष म्हणून बारावी निर्णायक ठरते; पण विद्यार्थ्यांचा मूळ अभ्यासक्रमाशी असलेला संबंध मात्र अधिकाधिक औपचारिक होत जातो. अनेक विद्यार्थी कॉलेजमध्ये फक्त उपस्थिती लावण्यापुरते जातात असे म्हटले जायचे; पण वास्तव हे आहे की, आता मुले उपस्थिती लावण्यासाठीही कॉलेजची पायरी चढत नाहीत. 'अभ्यास' क्लासमध्येच होतो आणि 'डमी कॉलेज' ही संकल्पनाच आता एक उघड गुपित बनली आहे.

आज महाराष्ट्रातील कोणत्याही नामांकित ज्युनिअर कॉलेजच्या अकरावी-बारावीच्या वर्गात फेरफटका मारला, तर शुकशुकाट दिसतो. मैदानांवर गवत उगवले आहे, लायब्ररी कुलूपबंद आहे आणि प्रयोगशाळा धूळ खात पडल्या आहेत. शाळा-कॉलेजेस आता ओस पडली आहेत आणि मुले क्लासेसच्या खोल्यांमध्ये डांबली गेली आहेत. याचे कारण कोचिंग क्लासेस आणि कॉलेजेस यांच्यातील छुप्या 'टाय-अप' (इन्टिग्रेटेड प्रोग्राम्स) मध्ये दडले आहे. या व्यवस्थेत विद्यार्थी ज्युनिअर कॉलेजमध्ये फक्त कागदोपत्री प्रवेश घेतो. कॉलेज प्रशासन विद्यार्थ्याला उपस्थितीची पूर्ण सूट देते आणि बदल्यात क्लासेसकडून काही कॉलेजला मोठी आर्थिक रसद मिळते.

या समांतर व्यवस्थेने कॉलेजमधील अकरावी-बारावीच्या हक्काच्या, पात्र शिक्षकांचे अस्तित्वच नाकारले आहे. जे शिक्षक पूर्वी विद्यार्थ्यांचे भविष्य घडवायचे, त्यांचे काम आता फक्त बोर्डाच्या प्रात्यक्षिक परीक्षांचे फॉर्म भरणे, अंतर्गत गुण देणे आणि हजेरी पटावर 'प्रेझेंटी' लावण्यापुरतेच मर्यादित राहिले आहे.

**मानसिक आरोग्याचा बळी**

वयाच्या १६ ते १८ या वर्षांमध्ये माणसाच्या व्यक्तिमत्त्वाची खरी जडणघडण होते. मित्र जोडणे, वादविवाद, सांस्कृतिक कार्यक्रम, खेळ आणि अपयशाशी दोन हात करायला शिकणे हे सगळे अनुभव ज्युनिअर कॉलेजच्या आवारात मिळतात. आज अनेक विद्यार्थ्यांचे आयुष्य क्लास, टेस्ट, रँक आणि स्क्रीन इतकेच उरले आहे. कॉलेज म्हणजे फक्त परीक्षा केंद्र अशी भावना तयार होते आहे. व्यक्तिमत्त्व विकासाची महत्त्वाची दोन वर्षे एका अखंड स्पर्धेच्या दडपणाखाली जात आहेत. छत्रपती संभाजीनगरमधील एका विद्यार्थ्याने या वास्तवावर थेट प्रकाश टाकला. तो म्हणाला, 'कॉलेजमध्ये माझे वर्गमित्र कोण आहेत हेही मला माहिती नाही. माझा संपूर्ण दिवस क्लास, टेस्ट आणि मोबाईलवरील रेकॉर्डेड लेक्चर्स पाहण्यातच जातो.' ही भावना आज हजारो विद्यार्थ्यांची आहे.

सकाळी ६ ते रात्री ८ अशी क्लासेसची दिनचर्या असलेल्या



या मुलांना सततच्या स्पर्धात्मक वातावरणामुळे सामाजिक आणि भावनिक अनुभवांना मुकावे लागत आहे. केवळ 'एमसीक्यू' सोडवण्याचे तंत्र शिकताना मुलांचा बौद्धिक आणि भावनिक विकास पू णपणे खुंटतो आहे. विचार करण्याची, विश्लेषण करण्याची आणि स्वतःचे मत बनवण्याची क्षमताच नष्ट होत आहे. या दोन वर्षांत त्यांचा नैसर्गिक विकास होत नाही, तर एका विशिष्ट साच्यात त्यांचे मेंदू प्रोग्राम केले जातात. बहुतांश कोचिंग क्लासेसमध्ये दर आठवड्याला चाचणी परीक्षा घेतल्या जातात आणि हे गुण व विद्यार्थ्यांचे रँक सर्वांसमोर जाहीर केले जातात. हुशार मुलांची स्टार बॅच वेगळी केली जाते आणि कमी गुण मिळवणाऱ्या मुलांना दुय्यम वागणूक दिली जाते. हा भेद मुलांच्या आत्मसन्मानाला थेट ठेच पोहोचवतो. केवळ परीक्षार्थी बनण्याचे हे भीषण दुष्परिणाम मुलांच्या मानसिक आरोग्यावर होत आहेत. समस्येचा आणखी एक पैलू म्हणजे करिअरच्या मर्यादित कल्पना! डॉक्टर किंवा इंजिनीअर हाच यशाचा एकमेव मार्ग असल्याचे चित्र समाजात निर्माण केले गेले आहे. कौशल्याधारित शिक्षण, सामाजिक विज्ञान, संशोधन, कला या क्षेत्रांना समाजात अद्याप अपेक्षित प्रतिष्ठा मिळालेली नाही.

या चक्रव्यूहामुळे 'मी नीट किंवा जेईई क्रॅक करू शकलो नाही, तर माझे आयुष्य संपले,' हा आत्मघातकी विचार मुलांच्या मनात पक्का रुजत जातो. रोजच्या टेस्ट सिरीज, रँकिंगचे फलक आणि पालकांच्या अवास्तव अपेक्षा यांच्या दबावाखाली ही कोवळी मने चिरडली जात आहेत. राजस्थानचे कोटा किंवा महाराष्ट्रातील लातूर-पुण्यासारख्या शहरांमधून दर महिन्याला समोर येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या बातम्या व्यवस्थेच्या क्रूरतेची साक्ष देतात. गेल्या एका दशकात केवळ कोटा येथे १५० हून अधिक कोवळ्या विद्यार्थ्यांनी नैराश्यातून आत्महत्या केली आहे.

**सार्वजनिक शिक्षणाची पडझड**

या व्यवस्थेतील सर्वांत वेदनादायक बाजू म्हणजे वाढती आर्थिक विषमता. शहरातील उच्च मध्यमवर्गीय कुटुंबे मोठा खर्च करून मुलांना क्लासेसमध्ये पाठवू शकतात; पण शेतकरी, कामगार, निम्न मध्यमवर्गीय पालक हा खर्च करण्यासाठी अक्षरशः कर्ज काढतात. पूर्वी जिल्हा परिषदेच्या किंवा अनुदानित शाळांमधून शिकून ग्रामीण भागातील मुले गुणवत्ता यादीत यायची. आज ती शक्यता समांतर व्यवस्थेमुळे जवळपास संपुष्टात आली आहे. गुणवत्तेपेक्षा आर्थिक क्षमता प्रवेशाच्या संधी ठरवू लागली, तर शिक्षणातील समानतेचा मूलभूत विचारच धोक्यात येतो.

गेल्या दशकात लाखभर शाळा बंद झाल्याचा उल्लेख 'नीती आयोगाच्या' अहवालांतून समोर येतो. याचे अनेक तांत्रिक दाखले दिले जात असले, तरी याचा थेट संबंध सार्वजनिक व्यवस्थेच्या उदासीनतेशी आहे. जेव्हा सरकारी शाळा बंद होतात किंवा त्यांचा दर्जा घसरतो, तेव्हा ग्रामीण भागातील गरीब वर्ग दर्जेदार शिक्षणापासून आपोआप वंचित होतो. जेव्हा समाजाचा विश्वास शाळांपेक्षा बाह्य प्रशिक्षण व्यवस्थेवर वाढतो, तेव्हा सार्वजनिक शिक्षणव्यवस्था कमकुवत होऊ लागते.

सत्ताधारी पक्ष कोणताही असो, एकूणच शिक्षणाकडे पाहण्याचा राज्यकर्त्यांचा दृष्टिकोन हा नेहमीच उपेक्षित किंवा निव्वळ 'मतपेढी'पुरता राहिला आहे. अनेक बड्या कोचिंग क्लासेसच्या मागे किंवा डमी कॉलेजेसच्या संस्थाचालकांमध्ये प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे राजकीय नेत्यांचे हितसंबंध गुंतलेले असतात. त्यामुळेच या समांतर व्यवस्थेवर कठोर कायदेशीर नियंत्रण आणायला सरकारे नेहमीच टाळाटाळ करतात. नवीन शैक्षणिक धोरणाचा (NEP) उदोउदो केला जात असला, तरी जोपर्यंत जमिनीवरील ही 'डमी संस्कृती' आणि व्यावसायिक दबावगट यांचे जाळे उखडून फेकले जात नाही, तोपर्यंत कोणत्याही धोरणाचे कागदी घोडे विद्यार्थ्यांचे भले करू शकत नाही.

**उपायांची ठोस दिशा**

**या दलदलीतून बाहेर पडण्यासाठी आता संपूर्ण शैक्षणिक रचनेत आमूलाग्र बदलांची गरज आहे.**

१)बोर्डाच्या परीक्षांना महत्त्व - जोपर्यंत अकरावी-बारावीच्या बोर्डाच्या परीक्षांना प्रवेश प्रक्रियेत किमान ५० टक्के वजन (Weightage) दिले जात नाही, तोपर्यंत शाळा-कॉलेजेसमध्ये चैतन्य परत येणार नाही. जेव्हा बोर्डाचे गुण महत्त्वाचे ठरतील, तेव्हाच विद्यार्थी कॉलेजच्या वर्गाकडे वळेल.

२) **डमी संस्कृतीला चाप** - सरकारने डमी कॉलेजेसचे परवाने तात्काळ रद्द केले पाहिजेत. बायोमेट्रिक हजेरी सक्तीची करून कॉलेजेसची नियमित आणि कडक तपासणी झाली पाहिजे.

३) **अभ्यासक्रमातील तफावत दूर करणे** -प्रवेशपरीक्षा आणि बोर्ड अभ्यासक्रम यांच्यातील तफावत कमी करावी लागेल. सार्वजनिक शिक्षणव्यवस्थेत गुणवत्तापूर्ण अध्यापन, समुपदेशन आणि करिअर मार्गदर्शन वाढवावे लागेल.

४) **नियामक चौकट आणि सरकारी केंद्रे** - कोचिंग उद्योगासाठी काही स्पष्ट आणि कडक नियामक चौकट आवश्यक आहे. तसेच, ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसाठी शासनस्तरावर मोफत किंवा नाममात्र खर्चातील स्पर्धा परीक्षा तयारी केंद्रे सक्षमपणे उभी करावी लागतील.

५) **विकेंद्रीकरण आणि पारदर्शकता** - वैद्यकीय प्रवेशांबाबत राज्यांना त्यांचे अधिकार अंशतः परत दिले पाहिजेत किंवा परीक्षा पद्धती अधिक सुरक्षित व टप्प्याटप्प्याने (Multi-stage exam) होणारी करावी, जेणेकरून एकाच परीक्षेवरील ताण कमी होईल.

**..तर केवळ 'रोबोट्स' तयार होतील!**

समाज म्हणून आपणही आता आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. 'नीट' गैरव्यवहार म्हणजे छोटा ओरखडा नसून, तो संपूर्ण व्यवस्थापोखरली गेल्याचा ढळढळीत पुरावा आहे. हा देश, समाज आणि धोरणकर्त्यांसाठी एक अत्यंत गंभीर 'वेक-अप कॉल' आहे.

शिक्षणाकडे केवळ 'पॅकेज' आणि 'रँक'च्या चष्म्यातून पाहणे थांबवावे लागेल. प्रत्येक विद्यार्थी डॉक्टर किंवा इंजिनीअर होणार नाही आणि होण्याची गरजही नाही; पण प्रत्येकाला अर्थपूर्ण शिक्षण आणि सन्मानाने जगण्याची संधी मिळाली पाहिजे. आपण शिक्षण या संकल्पनेला व्यावसायिक बाजारातून मुक्त करून पुन्हा ज्ञानकेंद्री आणि कौशल्याधारित करत नाही, तोपर्यंत कोचिंगचे कारखाने असेच चालत राहतील आणि गुणवत्तेचा बळी जात राहील. भविष्यात आपल्याकडे पदव्यांचे कागद घेतलेले, पण मूलभूत कौशल्ये आणि मानवी संवेदनशीलता नसलेले केवळ 'रोबोट्स' तयार होतील. शिक्षण हा देशाचा पाया आहे. हा पाया मजबूत करायचा असेल, तर ओस पडलेल्या शाळा-कॉलेजांमध्ये पुन्हा मुलांचा किलबिलाट सुरू व्हावा लागेल आणि शिक्षणाचा बाजार मांडणाऱ्या समांतर व्यवस्थेला चाप लावावाच लागेल!(साभार म.टा.संवाद)

**-डॉ. सुनील पाटील**

## कृत्रिम बुद्धिमत्ता

कृत्रिम बुद्धिमत्ता हे सध्याच्या काळातील सर्वात अधिक परिवर्तनशील तंत्रज्ञानापैकी एक असल्यामुळे त्याचा आपल्या दैनंदिन जीवनावर सर्वाधिक प्रभाव पडत आहे. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर आता कृषी, आरोग्य, उद्योग,व्यवसाय,शिक्षण, बँकिंग आणि फायनान्स अशा सर्वच क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढला आहे.अशा प्रकारे सर्वच क्षेत्रांमध्ये वाढणारा कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभाव लक्षात घेऊन तसेच या तंत्रज्ञानातील माहिती, सखोल तपशील व पारदर्शकता विचारात घेऊन केरळम हे देशातील पहिलेच कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) मंत्रालय स्थापन करणारे राज्य ठरले आहे. केरळमच्या या नवनिर्मित 'एआय' मंत्रालयाचा मुख्य उद्देश सरकारी प्रशासनात पारदर्शकता आणणे आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा लोककल्याणासाठी वापर करणे हा आहे. त्यानुसार आरोग्यसेवा, शिक्षण, कृषी क्षेत्र, उद्योग आणि सार्वजनिक सेवांमध्ये 'एआय'चा वापर करून कामकाज अधिक गतिमान करणे, तंत्रज्ञान आधारित स्टार्टअप्स आणि संशोधनाला प्रोत्साहन देणे, रोजगार निर्मितीसाठी तरुणांना एआय आणि डिजिटल कौशल्यांचे प्रशिक्षण देणे इत्यादी गोष्टींवर भर दिला जाणार आहे. विशेष म्हणजे दोन वर्षांपूर्वी केरळमच्याच तिरुवनंतपुरम येथील एका शाळेने 'आयरीस' नावाचा भारतातील पहिला आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) शिक्षक रोबोट सादर करून शिक्षण क्षेत्रात एक क्रांतीकारी पाऊल उचलले होते.

**-प्रदीप मोरे**

## तंबाखू विक्रीवर बंदी आणा

जागतिक तंबाखूमुक्ती दिन नुकताच सरला. भारतात तंबाखू आणि धुम्रपानामुळे होणाऱ्या मृत्यूची टक्केवारी वर्षागणिक वाढते आहे. तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थांच्या निर्मिती आणि विक्रीवर भारतात दुर्दैवाने कोणतेच निर्बंध नाहीत. तंबाखूजन्य पदार्थाच्या विक्रीतून मोठ्या प्रमाणात महसूल मिळत असल्याने अशा पदार्थांवर बंदी आणण्याची सरकारची मानसिकताही नाही. परिणामी या पदार्थांच्या नियमित सेवनामुळे अपंगत्व येण्याचे, कर्करोगासारखे गंभीर आजार होण्याचे आणि मृत्यूचे प्रमाण देशात दिवसागणिक वाढते आहे. तंबाखूजन्य पदार्थांच्या वेष्टनांवर वैधानिक इशारा छापण्याची सक्ती करण्यात आलेली असली तरी व्यसन जडलेल्यांना याचे काहीच सोयरसुतक नसते. मृत्यूदर घटवण्यासाठी एकीकडे वैद्यकीय क्षेत्रात नवनवीन संशोधन सुरू आहे तर दुसरीकडे मृत्यूकडे घेऊन जाणाऱ्या तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीला सरकार प्रोत्साहन देत आहे. मोठमोठे सिने अभिनेते आणि खेळाडू लोकांना जाहिरातींच्या माध्यमांतून गुटखा आणि तंबाखू खाण्याचे आवाहन करत आहेत. तंबाखूसारखे पदार्थ माणसाचे व्यक्तिमत्व बिघडवण्याचेही काम करते. गुटखविक्रीवर बंदी घालण्यात आली तेव्हा तत्कालीन राज्य सरकारच्या निर्णयाचे सर्वच स्तरातून स्वागत करण्यात आले होते. तंबाखूवर बंदी आणून सरकारने आणखी एक ऐतिहासिक पाऊल उचलावे.

**मोक्षदा घाणेकर**

## भोंदूगिरीवर कायद्याची गरज

अलीकडेच राज्यातील नाशिकच्या अशोक खरात प्रकरणाने राजकारण्यांची वरात काढलेली आहे. त्याच्याशी बरेच राजकारणी संबंधित असण्याची शक्यता व्यक्त होते आहे. स्थानिक पातळीवर पोलीस यंत्रणेकडून जाणीवपूर्वक अशोक खरातच्या भोंदूगिरीला एकाअर्थी संरक्षणच दिले गेले. कोणत्या व्यक्तीकडे कोणते महत्वाचे लोक जात आहेत ते का जात आहेत. याची खडानखडा माहिती पोलिसांकडे असते. पोलिसांनी केलेले दुर्लक्ष एकाअर्थी अनेकांचा मानसिक आणि आर्थिक छळ करणारे ठरले आहे. सरकारने एसआयटी चौकशी सुरु केली असली तरी या प्रकरणाकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई होणार हे सुद्धा स्पष्ट होण्याची आवश्यकता आहे. कारण या राजकारणांच्या वरातीत या अधिकाऱ्यांनी हातभार लावलेला आहे. अगदी त्याच्याबरोबर बड्या अधिकाऱ्यांच्या बैठका त्यात झालेले निर्णय या सगळ्याच गोष्टींचा अतिशय कठोर पंचनामा होण्याची आवश्यकता आहे. इतकी प्रचंड संपत्ती गोळा होईपर्यंत आणि अनेक महत्वाचे निर्णय अशोक खरातला खुश करण्याकरिता घेतले जात असताना पोलिसांसकट इतर सरकारी यंत्रणा मूग गिळून बसल्या .

**प्रा. मधुकर चुटे**
नागपूर

सोमवार, दि. १ जून २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# अमित शहांचा नातेवाईक असल्याचे सांगून भाजपच्या पदाधिकाऱ्यास 20 कोटींचा गंडा घालण्याचा प्रयत्न...

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ३१ :** भाजपचे यवतमाळ-पुसद समन्वयक तथा माजी जिल्हाध्यक्ष नितीन भुतडा यांना केंद्रीय राज्यमंत्री दर्जाच्या महामंडळावर नियुक्तीचे आमीष दाखूवन तब्बल २० कोटी रूपयांची फसवणूक करण्याचा डाव अवधूतवाडी पोलिसांनी माजी आमदारांच्या कार्यालयातच उधळला.

जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडवून देणारी ही घटना शनिवारी घडली असून, नितीन सुरेशचंद्र भुतडा यांच्या तक्रारीवरून अवधूतवाडी पोलिसांनी शनिवारी रात्री तीन भामट्यांना रंगेहात अटक केली. लौकीक जगन्नाथ फुलकर, गणेश लालसिंग राठोड आणि विश्वजित सुरेश राठोड (सर्व रा. यवतमाळ) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

तक्रारीनुसार, १६ मे २०२६ रोजी आरोपी लौकीक फुलकर याने भुतडा यांच्या व्हॉट्सॲपवर संपर्क साधला. त्यानंतर २० मे रोजी त्याने केंद्र सरकार अंतर्गत येणाऱ्या ४२ महामंडळांची एक बनावट यादी पाठवली, ज्यावर 'कँडेट्स रिक्वायर्ड फॉर बीजेपी'असे लिहिले होते. या नियुक्तीसाठी सर्व काम करून देणारा मुख्य इसम म्हणून गणेश राठोडचा संपर्क देण्यात आला होता. यानंतर गणेश राठोडने भुतडा यांच्याशी संपर्क साधून केंद्रीय राज्यमंत्री दर्जाचे पद मिळवून देण्यासाठी थेट २० कोटी ५० लाख रुपयांची मागणी केली. व्यवहार पक्का करण्यासाठी एकूण रक्कमेच्या ५ टक्के 'टोकण रक्कम' देण्याची अट घालण्यात आली आणि सोमवारपर्यंत टोकण पोहचल्यास दिल्लीहून थेट कॉल येईल, अशी भुलथाप मारली.

या संपूर्ण व्यवहारात विश्वास निर्माण करण्यासाठी गणेश राठोड याने एका महिलेशी भुतडा यांचे फोनवर बोलणे करून दिले. तिचे नाव हेमलता अग्रवाल असून ती केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची नातेवाईक आहे आणि मध्यभारतातील एका हिंदी वृत्तपत्र समूहाची मॅनेजिंग डायरेक्टर आहे, असा खोटा परिचय देण्यात आला. त्या महिलेनेही आर्थिक व्यवहार पूर्ण करा, तुम्हाला केंद्रीय राज्यमंत्री दर्जाचे पद मिळेल, टेन्शन घेऊ नका, असे सांगून भुतडा यांना जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न केला.

नितीन भुतडा यांना यापूर्वीच्या फसवणुकीच्या प्रकारांवरून आरोपींवर तीव्र संशय आला. त्यांनी आरोपींना धडा शिकवण्यासाठी स्वतः एक प्लॅन आखला. त्यांनी बाजारातून एक गुप्त कॅमेरा घड्याळ खरेदी केले आणि या भामट्यांसोबत बैठक आयोजित केलेल्या माजी आमदार मदन येरावार यांच्या कार्यालयात संपूर्ण भाग दिसेल असे लावून दिले. ३० मे रोजी सकाळी ११:३० वाजता आरोपी गणेश आणि विश्वजित राठोड कार्यालयात पोहोचले. व्यवहारासाठी भुतडा यांनी एक तपकिरी लेदरची बॅग तयार केली होती, ज्यात ५० लाख रुपये असल्याचा भास व्हावा म्हणून खाली कागदाचे रिम, नोटबुक आणि वरच्या बाजूला ५०० रुपयांच्या नोटांचे ५० हजार रुपये ठेवले होते. दोन्ही आरोपींसोबत पदाबाबत चर्चा पूर्ण झाल्यावर आरोपींनी चहापाणी घेतले आणि टोकण रकमेची मागणी केली. जशी विश्वजित राठोडने ती ५० हजारांची बॅग ताब्यात घेतली, त्याचवेळी दबा धरून बसलेल्या अवधूतवाडी पोलिसांनी त्यांना पकडले आणि बॅग जप्त केली.

## दारू नाकारल्याचा राग, व्यवस्थापकावर जीवघेणा चाकूहल्ला..!

### एलसीबीच्या शिताफीने आरोपी जेरबंद

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**आर्णी, दि. ३१ :** दारूचे दुकान बंद झाल्यानंतर दारू देण्यास नकार दिल्याचा राग मनात धरून व्यवस्थापकावर जीवघेणा चाकूहल्ला करणाऱ्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या काही दिवसांत अटक करून गुन्ह्याचा छडा लावला. या कारवाईमुळे आर्णी परिसरात खळबळ उडाली असून पोलिसांच्या तत्परतेचे कौतुक होत आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २९ मे २०२६ रोजी रात्री रामराव रमेश मिसाळ (वय ५०, रा. शिवाजी नगर, आर्णी) हे हिरा टॉकीजजवळील देशी दारू दुकानात व्यवस्थापक म्हणून काम आटोपून घरी जात होते. यावेळी एका अज्ञात इसमाने त्यांच्याकडे दारूची मागणी केली. दुकान बंद झाल्याने दारू देण्यास नकार मिळताच आरोपीने वाद घालत रामराव मिसाळ यांच्यावर पोट व पाठीवर चाकूने सपासप वार केले. गंभीर जखमी झालेल्या मिसाळ यांच्यावर उपचार सुरू असून या प्रकरणी आर्णी पोलिस ठाण्यात खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस अधीक्षक कुमार चिंता व अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेने समांतर तपास सुरू केला. घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज तपासून संशयिताची ओळख पटविण्यात आली. गोपनीय माहितीच्या आधारे तोफिक रफिक शहा (वय २२, रा. गिरोली, ता. मानोरा, जि. वाशिम) याचा दिग्रस परिसरात शोध घेऊन त्याला शिताफीने ताब्यात घेण्यात आले. चौकशीत आरोपीने गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर त्याला पुढील कायदेशीर कारवाईसाठी आर्णी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. ही कारवाई पोलिस निरीक्षक सतीश चवरे यांच्या नेतृत्वाखालील स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

## समृद्ध पंचायतराज अभियानात टेंभी ग्रामपंचायतीची दमदार झेप

### जिल्हास्तरीय समितीकडून विकासकामांचे कौतुक

✦जनमाध्यम | प्रतिनिधी .

✦ किरण नरवाडे



**महागाव, दि. ३१ :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत पंचायत समिती राजुरा व जिल्हा परिषद चंद्रपूर यांच्या तालुकास्तरीय मूल्यमापनात प्रथम क्रमांक प्राप्त केलेल्या ग्रामपंचायत टेंभी येथे आज जिल्हास्तरीय मूल्यमापन समितीने भेट देऊन विविध विकासकामांची पाहणी केली.

यावेळी जिल्हा परिषद गडचिरोलीचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. सुहास गाडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. पंकज भोयर तसेच कार्यकारी अभियंता (ग्रा. पा. पु.) श्री. विनोद उद्धरवार यांनी ग्रामपंचायतीच्या विविध योजनांचे व विकासकामांचे सविस्तर मूल्यमापन केले. ग्रामपंचायतीच्या स्वच्छता, पाणीपुरवठा, शिक्षण, ग्रामविकास तसेच नागरिकाभिमुख उपक्रमांचे समितीने कौतुक केले. या प्रसंगी महागाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी दतराव कदम, विस्तार अधिकारी सुरेश चव्हाण, नागरगोजे, देशमुख, ग्रामविकास अधिकारी राजुरे व वेरुळकर, मुख्याध्यापक, शिक्षक, अंगणवाडी सेविका, अमोल चिकने, सरपंच तथा सरपंच, तथा तालुका महागाव सरपंच संघटनेचे अध्यक्ष, ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य, कर्मचारी तसेच आशा सेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## पावसाळ्यापूर्वीच १५ व्या वित्त आयोगाचा निधी खर्च..!

### दिग्रस तालुक्यात सरपंच-सचिवांच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**दिग्रस, दि. ३१ :** ग्रामीण भागातील पाणीपुरवठा, स्वच्छता अभियान, नालीसफाई तसेच नागरिकांच्या मूलभूत सुविधांसाठी शासनाकडून ग्रामपंचायतींना १५ व्या वित्त आयोगांतर्गत निधी उपलब्ध करून दिला जातो. मात्र दिग्रस तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतींमध्ये हा निधी पावसाळ्यापूर्वीच सरपंच व ग्रामपंचायत सचिवांच्या संगनमताने खर्च करण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर येत असून, या प्रकारामुळे ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

दिग्रस तालुक्यात एकूण ५४ ग्रामपंचायती असून ७४ गावांचा समावेश आहे. दरवर्षी पावसाळ्यापूर्वी गावांमध्ये नालीसफाई, स्वच्छता मोहीम, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच विविध विकासकामांसाठी शासनाकडून निधी वितरित केला जातो. मात्र अनेक ठिकाणी आवश्यक कामांना प्राधान्य न देता सरपंच व सचिवांनी आपल्या मर्जीतील कामांवर निधी खर्च केल्याची माहिती पुढे येत आहे. विशेष म्हणजे शासन नियमानुसार १५ व्या वित्त आयोगाचा निधी खर्च करण्यापूर्वी गटविकास अधिकाऱ्यांची परवानगी घेणे आवश्यक असते. परंतु काही ग्रामपंचायतींमध्ये या नियमांची पायमल्ली करत परस्पर निधी खर्च करण्यात आल्याचे समोर येत आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित होत आहेत.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, गावांमध्ये अद्यापही नालीसफाई, पाणीपुरवठा व स्वच्छतेची अनेक कामे रखडलेली आहेत. तरीदेखील निधी खर्च झाल्याचे दाखवण्यात आल्याने आर्थिक गैरव्यवहाराचा संशय व्यक्त केला जात आहे. काही ग्रामपंचायतींमध्ये तर कामे न करताच कागदोपत्री खर्च दाखवण्यात आल्याची चर्चा रंगू लागली आहे. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून संबंधित सरपंच, सचिव तसेच जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. दरम्यान, दिग्रस तालुक्यातील या कथित गैरव्यवहारामुळे ग्रामपंचायत प्रशासन पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहे.

## थोडक्यात



### हिवरा (सं) येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी

✦ किरण नरवाडे

**महागाव:** तालुक्यातील हिवरा संगम ग्रामपंचायत कार्यालयामध्ये आज दि.३१/०५/२०२६. रोजी पुण्यश्लोक लोकमाता राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती साजरी करण्यात आली.यावेळी ग्रामपंचायत उपसरपंच श्री.शरद पाटील.सदस्य.राजूभाऊ धोतरकर.व यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक श्री.कैलास आंडगे.श्री.जितेंद्र आंडगे.श्री.किरण आंडगे.श्री. दयानंद लकडे.श्री.रमेश धोतरकर.श्री.गजानन आंडगे.श्री.शिरीष बोरूळकर. श्री.समाधान आंडगे यावेळी श्री.संतोष चव्हाण यांनी पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जीवन चरित्रावर थोडक्यात प्रकाश टाकला अहिल्याबाई होळकर ह्या धर्मप्रेमी प्रजाहितदक्ष राजमाता लोककल्याण आणि आदर्श प्रशासनाचा उज्वल वारसा निर्माण करणाऱ्या लोकमाता होत्या असे प्रतिपादन केले.ग्रामपंचायत कर्मचारी श्री.सुधीर कदम श्री.राहुल आंडगे श्री.समाधान मोरे.उपस्थित होते.आंडगे श्री.समाधान मोरे.उपस्थित होते.

### ढाणकीत वाढत्या अवैध धंद्यांमुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर ..!

**नागरिकांकडून कारवाईची मागणी**

**ढाणकी :** ढाणकी शहरात चक्री, मटका, क्लब, जुगार, अवैध रेती तस्करी, गुटखा तस्करी, गांजा विक्री तसेच अवैध शिंदी विक्री यांसारखे अवैध धंदे खुलेआम सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. शहरातील जुन्या बसस्थानक परिसरातील एका मोठ्या कॉम्प्लेक्समध्ये अशा अवैध धंद्यांचे केंद्र निर्माण झाल्याची चर्चा सध्या शहरात रंगली आहे.नागरिकांच्या म्हणण्यानुसार, बिटरगाव पोलीस ठाण्यात काही कर्मचारी दीर्घकाळापासून कार्यरत असून, स्थानिक हितसंबंध आणि राजकीय पाठबळामुळे अवैध व्यवसायांवर प्रभावी कारवाई होत नसल्याची भावना सर्वसामान्यांमध्ये निर्माण झाली आहे. विविध राजकीय पक्षांतील काही पदाधिकाऱ्यांचे अवैध धंद्यांशी संबंध असल्याच्या चर्चांमुळे नागरिकांमध्ये नाराजी वाढत असल्याचे चित्र आहे. शहरातील वाढत्या अवैध धंद्यांमुळे गुन्हेगारी प्रवृत्तींना चालना मिळत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. यामुळे तरुण पिढीवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असून, कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न अधिक गंभीर बनत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

काही जागरूक नागरिकांकडून संबंधित कर्मचाऱ्यांच्या बदलीसाठी तसेच अवैध धंद्यांवर कठोर कारवाईसाठी प्रशासकीय स्तरावर पाठपुरावा सुरू असल्याची माहिती मिळत आहे. मात्र, या प्रक्रियेत विविध प्रकारचे राजकीय दबाव आणि हस्तक्षेप होत असल्याच्याही चर्चा शहरात सुरू आहेत.

ढाणकीतील सर्वसामान्य नागरिक अवैध धंद्यांच्या विरोधात असून, संबंधित यंत्रणांनी निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. तसेच पोलीस अधीक्षकांनी या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन अवैध धंद्यांवर आळा घालण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.

## ४३ हजाराची रक्कम मुळमालकास केली परत

### उमरखेड पोलीसांची कौतुकास्पद कामगिरी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**उमरखेड़, दि. ३१ :** केंद्र सरकारतर्फे राबविण्यात येत असलेल्या राष्ट्रिय सायबर क्राईम रिपोर्टिंग पोर्टल पोलीस स्टेशन उमरखेड येथे तक्रारदार सौ.ज्योती राजेश नागेश्वर रा.उमरखेड यांचे दि.१९/०२/२०२६ रोजी ४३०००/- रुपये त्यांचे खात्यातुन ऑनलाईन फसवणुक झाल्याने पोलीस स्टेशन उमरखेड येथे NCCR Portal Akn. no.३१९०२२६००३८७४४ दाखल करून सायबर चक्रे फिरवुन तक्रारदार यांची ऑनलाईन फसवणुक झालेली ४३०००/- रुपये कार्यकौशल्याने परत मिळवुन दिली.

सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक कुमार चिंता, उपविभागिय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरिक्षक शंकर पांचाळ, सायबर सेलच्या पोलीस निरिक्षक यशोधरा मुनेश्वर मॅडम यांचे संयुक्त मार्गदर्शनात पोलीस स्टेशन उमरखेड चे पोलीस अमलदार विष्णु राठोड व सायबर सेलचे पोलीस अंमलदार अविनाश शहारे यांनी केली.

सर्व शहरात कौतुकाची चर्चा सुरू असुन तक्रारदार यांनी पोलीसांचे आभार व्यक्त केले आहे,

## ग्रामीण जनतेने साथ मात्र ठेकेदारांच्या मनमानीने शेतकऱ्यांमध्ये संताप

### नाला सरळीकरण कामांबाबत चौकशीची मागणी, शेतकऱ्यांना विश्वासात न घेतल्याचा आरोप

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**दिग्रस, दि. ३१ :** विधानसभा निवडणुकीच्या काळात विकासकामांच्या जोरावर मतदारांचा पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. दिग्रस शहरातून अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू असतानाच ग्रामीण भागातील गोरगरीब जनतेने मोठ्या प्रमाणात मतदान करून आमदार संजय राठोड यांच्यावर विश्वास दाखविला. मात्र निवडणुकीनंतर ग्रामीण भागातील अनेक प्रश्न अद्यापही कायम असून त्यात आता ठेकेदारांच्या कथित मनमानीची भर पडल्याने शेतकरी व नागरिकांमध्ये नाराजी वाढत असल्याचे चित्र आहे.

मतदारसंघातील अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली असून नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्याचवेळी सुरू असलेल्या नाला सरळीकरणाच्या कामांबाबत गंभीर तक्रारी पुढे येत आहेत. विशेषतः बाहेरील ठेकेदारांकडून शेतकऱ्यांना विश्वासात न घेता कामे केली जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, नाला सरळीकरणाच्या कामांदरम्यान नाल्यातील माती व गाळ योग्य पद्धतीने न हटवता काही ठिकाणी ढिगारे टाकण्यात आले आहेत. त्यामुळे पावसाळ्यात पाण्याचा नैसर्गिक प्रवाह अडथळला जाऊन शेतांमध्ये पाणी साचण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. कामाची खोली, रुंदी, मंजूर आराखडा किंवा खर्च याबाबत कोणतीही माहिती देण्यात आलेली नसून अनेक ठिकाणी कामाचे माहिती फलकदेखील लावण्यात आले नसल्याची तक्रार आहे.ग्रामस्थांचा आरोप आहे की, संबंधित ठेकेदारांकडून "हे काम वरिष्ठांच्या माध्यमातून होत असल्याने कोणी काही करू शकत नाही," अशा प्रकारची भाषा वापरून स्थानिकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले असून प्रशासनाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. गांधीनगर, साकरा परिसरासह विविध भागांतील नाला सरळीकरण व इतर विकासकामांच्या दर्जाबाबत नागरिकांनी शंका व्यक्त केली आहे. या कामांची तांत्रिक तपासणी करून संबंधित कामे मंजूर आराखड्यानुसार झाली आहेत का, याची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी जोर धरत आहे. ग्रामीण भागातील जनतेने विश्वासाने दिलेल्या पाठिंब्याची परतफेड केवळ घोषणांनी नव्हे तर दर्जेदार आणि पारदर्शक विकासकामांतून व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने तातडीने लक्ष घालून नाला सरळीकरणाच्या कामांतील त्रुटी, ठेकेदारांची कथित मनमानी आणि शेतकऱ्यांच्या तक्रारींची चौकशी करावी, अन्यथा ग्रामीण भागातील वाढती नाराजी भविष्यात अधिक तीव्र होण्याची शक्यता नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.



## अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन

**यवतमाळ,दि. ३१ :** पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या३०१ व्याजयंती दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन करण्यात आले. यावेळी तहसीलदार विद्या शिंदे यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

## न्यायप्रविष्ट जमिनीवर प्लॉट विक्रीचा आरोप..!

### 'चिद्दरवार सिटी' ले-आऊटवर आक्षेपाच्या घेऱ्यात गौणखनिज दंडाची वसुली प्रलंबित असताना मंजुरीचा प्रश्न सामाजिक कार्यकर्त्यांची चौकशीची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी






**पुसद, दि. ३१ :** न्यायालयात अपील प्रलंबित असलेल्या शेतजमिनीवर ले-आऊट विकसित करून प्लॉट विक्रीचा प्रयत्न होत असल्याचा गंभीर आरोप करत सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण कांबळे यांनी संबंधित प्रकरणाची चौकशी करून अंतिम मंजुरी रोखण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे.

यासंदर्भात नगर परिषद पुसद, तहसीलदार, सहाय्यक संचालक नगर रचना विभाग यवतमाळ यांच्यासह विविध वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे. तक्रारीनुसार, पुसद-बोरगडी रोडलगत असलेला जुना सर्वे क्रमांक ७९ व नवीन सर्वे क्रमांक १५/१ मधील १ हेक्टर २५ आर क्षेत्राची जमीन सध्या जिल्हा व सत्र न्यायालय, पुसद येथे अपील प्रकरणात न्यायप्रविष्ट आहे. या प्रकरणात डॉ. सतीश वसंतराव चिद्दरवार हे प्रतिवादी पक्षकार असल्याचा दावा करण्यात आला आहे. असे असताना संबंधित जमिनीवर "चिद्दरवार सिटी" नावाने ले-आऊट विकसित करण्यासाठी परवानगी प्रक्रियेचा पाठपुरावा सुरू असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. सन २००९ पासून या जमिनीबाबत न्यायालयीन वाद सुरू असून त्यावरील निकालाविरोधात २०२५ मध्ये जिल्हा व सत्र न्यायालयात अपील दाखल करण्यात आले आहे. त्यामुळे अंतिम निर्णय होईपर्यंत कोणतीही विकास परवानगी किंवा ले-आऊट मंजुरी देऊ नये, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय, डॉ. चिद्दरवार यांच्या माहूर रोडलगतच्या सर्वे क्रमांक १५/२ मधील ले-आऊट विकासकामासाठी विनापरवानगी गौणखनिज वापरल्याप्रकरणी १५ सप्टेंबर २०२५ रोजी २ लाख ६२ हजार ४४० रुपयांचा दंड ठोठावण्यात आल्याचा उल्लेख तक्रारीत आहे. हा दंड अद्याप भरलेला नसल्याचा दावा करत महसूल प्रशासनाने वसुलीची कारवाई का केली नाही, असा सवालही उपस्थित करण्यात आला आहे. दरम्यान, न्यायालयीन वाद सुरू असलेल्या जमिनीतील प्लॉट खरेदी करणाऱ्या नागरिकांची भविष्यात फसवणूक होण्याची शक्यता असल्याचा इशारा तक्रारदारांनी दिला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर संबंधित ले-आऊटला अंतिम मंजुरी मिळणार की प्रशासन सावध भूमिका घेणार, याकडे पुसदकरांचे लक्ष लागले आहे. वरील आरोप तक्रारदारांनी केले असून संबंधित प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. संबंधित पक्षाची भूमिका प्राप्त झाल्यास तीही प्रसिद्ध करण्यात येईल.

## पुण्यश्लोक राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ३१ :** पुण्यश्लोक राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त यवतमाळ नगर पालिकेच्या नगराध्यक्ष ॲड. प्रिदर्शनी अशोक उईके यांनी यवतमाळ येथील येरावार चौक येथे अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मृतिस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. लोककल्याणकारी, न्यायप्रिय, धर्मनिरपेक्ष आणि आदर्श राज्यकर्त्या म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या दूरदृष्टी, परोपकारी वृत्ती आणि जनसेवेच्या कार्यातून भारतीय इतिहासात अजरामर स्थान निर्माण केले. त्यांच्या कारकिर्दीत समाजहिताला प्राधान्य देत अनेक मंदिरे, घाट, धर्मशाळा आणि सार्वजनिक बांधकामे उभारण्यात आली. स्त्रीशक्ती, सुशासन आणि लोकसेवेचा आदर्श त्यांनी संपूर्ण देशासमोर ठेवला. जीवनप्रवासाचा स्मरण करून त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यात आले. राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर यांचे विचार, कार्य आणि संस्कार भावी पिढ्यांसाठी सदैव प्रेरणादायी राहतील असे देखील विचार नगराध्यक्ष ॲड. प्रियर्शनी उईके यांनी व्यक्त केले.

# मोफत गणवेश योजनेत मोठे बदल

## कापडाचा दर्जा तपासणार, महिला बचत गटांना मिळणार शिलाईचे काम

**अमरावती/का.प्र.**

नव्या सुधारणेनुसार, पात्र विद्यार्थ्यांना शाळा सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी गणवेश वाटप करणे बंधनकारक असेल. हे गणवेश स्थानिक महिला बचत गटांमार्फत शिवून घेतले जावेत, असे शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे.

राज्यातील शासकीय आणि जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या कोट्यवधी विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या मोफत गणवेशाच्या दर्जाबाबत आता कोणतीही तडजोड केली जाणार नाही. गणवेशासाठी शंभर टक्के पालिस्टर कापड वापरण्यास शासनाने पूर्णपणे बंदी घातली असून, विद्यार्थ्यांच्या शरीराला वा त्वचेला इजा न पोहचवणारे किमान ७०:३० किंवा ८०:२० प्रमाणात पॉलिस्टरसह कॉटन किंवा व्हिस्कोस मिश्रित दर्जाचे कापड वापरणे बंधनकारक करण्यात आले आहे.



**महिला बचत गटांना प्राधान्य**

नव्या सुधारणेनुसार, पात्र विद्यार्थ्यांना शाळा सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी गणवेश वाटप करणे बंधनकारक असेल. हे गणवेश स्थानिक महिला बचत गटांमार्फत शिवून घेतले जावेत, असे शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे.

ज्या भागात स्थानिक बचत गट उपलब्ध नसतील, तिथे आजूबाजूच्या क्षेत्रातील बचत गटांशी संपर्क साधण्याचे अधिकार शाळा व्यवस्थापन समितीला देण्यात आले आहेत. बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांनी बचत गटांना शाळांशी जोडण्यासाठी पुढाकार घ्यावा, असेही निर्देश आहेत.

**गुणवत्तेची कडक तपासणी, नवीन फॉर्म्यूला**

गणवेशाची गुणवत्ता राखण्यासाठी त्रिस्तरीय तपासणी सक्तीची कारण्यात आली आहे. केंद्रप्रमुख १०० टक्के शाळांची तपासणी करतील.

गट शिक्षणाधिकारी तालुक्यातील किमान ३० टक्के शाळांची तपासणी करतील आणि शिक्षणाधिकारी (प्राथमिक) प्रत्येक तालुक्यातील किमान १० शाळांना प्रत्यक्ष भेट देतील. याशिवाय प्रत्येक तालुक्यातून यादृच्छिक (रँडम) पद्धतीने किमान एका शाळेतील कापडाचा नमुना घेऊन प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवला जाईल. कापड निकृष्ट दर्जाचे आढळल्यास पुरवठादार आणि शाळा व्यवस्थापन समितीवर थेट कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा शासनाने दिला आहे. तसेच राज्यस्तरीय तपासणी पथकेही अचानक भेटी देऊन नमुने गोळा करणार आहेत.

**स्काऊट गाईडसाठी स्वतंत्र गणवेश**

विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या गणवेशापैकी एक गणवेश प्राधान्यक्रमाने 'स्काऊट आणि गाईड' विषयाला अनुरुप असेल. यासाठी मुलांसाठी आकाशी रंगाचा शर्ट आणि गडद निळी हाफ पॅन्ट, तर मुलींसाठी आकाशी शर्ट आणि गडद निळा स्कर्ट असलेला पिनो फ्रॉक (किंवा सलवार-कमीज असलेल्या शाळांमध्ये गडद निळी सलवार आणि आकाशी कमीज) अशी रचना निश्चित करण्यात आली आहे.

**'सीएसआर' मधून निधी उभारणीला परवानगी**

केंद्र सरकारच्या समग्र शिक्षा आणि राज्य सरकारच्या निधीतून या योजनेला अनुदान दिले जाते. मात्र विद्यार्थ्यांना आणखी दर्जेदार गणवेश मिळावेत, यासाठी शाळा व्यवस्थापन समित्यांनी स्वत:चे योगदान द्यावे किंवा 'सीएसआर'च्या माध्यमातून वाढीव निधी गोळा करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन शासनाने केले आहे.

# सर्व विषय शिक्षकांना 'समान पदवीधर वेतनमान' लागू करा

## प्रहार शिक्षक संघटनेची मागणी

**अमरावती/का.प्र.**

इयत्ता सहावी ते आठवीच्या वर्गांवर कार्यरत असणाऱ्या सर्व पात्र विषय शिक्षकांना सरसकट पदवीधर वेतनमान लागू करावे, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या १३ ऑक्टोबर २०१६ रोजीच्या शासन निर्णयातील त्रुटी व विसंगती दूर करून शासनाने तातडीने सुधारित धोरणात्मक परिपत्रक काढावे, अशी मागणी प्रहार शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष महेश ठाकरे यांनी केली आहे.

शासकीय नियमानुसार, राज्यातील सर्वच जिल्ह्यांमध्ये शैक्षणिक अर्हता आणि सेवाज्येष्ठतेनुसार प्राथमिक व साहाय्यक शिक्षकांमधून विषय शिक्षक (पदवीधर) म्हणून नेमणुका करण्यात आल्या आहेत. परंतु, शालेय शिक्षण विभागाच्या निर्णयातील मुद्दा क्रमांक ३ नुसार, सहावी ते आठवीच्या वर्गांना शिकवणाऱ्या एकूण शिक्षकांपैकी केवळ एक तृतीयांश शिक्षकांनाच पदवीधर वेतनमान देण्याची जाचक अट घालण्यात आली आहे. या अटीमुळे एकाच वर्गाला, सारख्याच पात्रतेसह आणि समान जबाबदारीने शिकवणाऱ्या शिक्षकांमध्ये वेतनाची तफावत निर्माण झाली आहे. गेल्या ६ ते ७ वर्षांपासून प्रामाणिकपणे कार्यरत असणारे हजारो पात्र शिक्षक केवळ या प्रशासकीय तांत्रिकतेमुळे हक्काच्या पदवीधर वेतनमानापासून वंचित राहिले आहेत.

सर्व शिक्षकांची शैक्षणिक अर्हता आणि कामाचे स्वरूप सारखेच असताना, केवळ काही टक्के शिक्षकांना लाभदेणे आणि इतरांना वंचित ठेवणे हा पात्र शिक्षकांवर मोठा अन्याय असल्याची भावना व्यक्त करीत प्रहार शिक्षक संघटनेने याकरिता मुख्यमंत्र्यांना निवेदन देऊन पदवीधर वेतनमान लागू करण्याची मागणी केली आहे.

# घातक ऑनलाइन संच मान्यता त्वरित दुरुस्त करा

**अमरावती/का.प्र.**

कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर शैक्षणिक सत्र २०२५ -२६ ची ऑनलाइन संच मान्यता नुकतीच कॉलेज लॉगिन ला टाकण्यात आलेली आहे ही संच मान्यता प्रचलित निकष डावलून घातक निकषाच्या आधारे केली आहे. त्यामुळे राज्यभरातील हजारो शिक्षक
अतिरिक्त, अर्धवेळ, सी.एच.बी.झा ले आहेत .अनेक क.म.वि.तथा तुकड्या अनुदानाकरिता अपात्र होतील अशी स्थिती आहे.ऑनलाइन संच मान्यतेमध्ये तातडीने दुरुस्ती करावी यासाठी सोमवार १ जून २०२६ ला राज्यभर विभागिय शिक्षण उपसंचालक कार्यालयासमोर 'संच मान्यता काळा ड्राप्ट निषेध' आंदोलन करण्यात येणार आहे.

२८मे२०२६ ला कॉलेज लॉगिंला टाकलेल्या संच मान्यता.गेली वर्षभरात संचालक स्तरावर ऑनलाईन संचमान्यते संदर्भात विज्युक्टा व महासंघ पदाधिकारी यांचे सोबत झालेल्या चर्चा व त्यासंदर्भात असलेले शासन आदेश, परिपत्रके संघटनेने दिली. तरी सुध्दा या निकषाच्या आधारे ऑनलाइन संचमान्यता न झाल्यामुळे कनिष्ठ महाविद्याल यीन शिक्षकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला असल्याचे विज्युक्टाचे अध्यक्ष डॉ. अविनाश बोर्डे यांनी म्हटले आहे. या धोरणाविरुद्ध पुणे येथे आयोजित मोर्चाला प्रशासनाने ऐनवेळी अनुमती नाकारल्याने विज्युक्टा व राज्य महासंघाने शिक्षण आयुक्त कार्यालयासमोर प्रचंड धरणे आंदोलन केले आंदोलनानंतर शिक्षण आयुक्त, शिक्षण संचालक तथा आम. सत्यजीतजी तांबे तसेच आम. जयंत आसगावकर महासंघ अध्यक्ष डॉ.संजय शिंदे, समन्वयक प्रा.मुकुंद आंधळकर व पदाधिकारी यांचे समवेत झालेल्या बैठकीत संचमान्यता ऑनलाईन करतांना प्रचलीत निकष लक्षात घेतले जातील. याबाबत सहमती दर्शवली होती. मात्र ते पाळले नसल्याचा आरोप डॉ. अशोक गव्हाणकर महासचिव विज्युक्टा यांनी केला आहे.

## 'काळ्या ड्राप्ट' च्या निषेधार्थ शिक्षकांचे आज आंदोलन

# ॲड. यशोमती ठाकूर यांच्यावर विधान परिषद निवडणुकीची जबाबदारी

**अमरावती/का.प्र.**

विधान परिषदेतील 'स्थानिक स्वराज्य संस्था' या मतदार संघाच्या निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाच्या निरीक्षक म्हणून माजी पालकमंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांची निवड करण्यात आली आहे. त्यामुळे आता ही निवडणूक ॲड. यशोमती ठाकूर यांच्या नेतृत्वात होणार आहे.

विधान परिषदेच्या निवडणु कीच्या राज्यभरातील निरीक्षकांची यादी काँग्रेसच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यालयाकडून जाहीर करण्यात आली. त्यामध्ये ॲड. यशोमती ठाकूर यांच्याही नावाचा समावेश करण्यात आला आहे. आतापर्यंत गुलदस्त्यात असलेले काँग्रेसच्या उमेदवाराचे नाव शनिवारीच जाहीर करण्यात आले असून हर्षजित देशमुख यांनी नामांकन अर्जही दाखल केला आहे.

काँग्रेसचे १२० मतदार असून, हे मतदार व हर्षजित देशमुख यांच्यात समन्वय साधून निवडणुकीची रणनिती आखण्यावर आता भर दिल्या जाणार आहे. दरम्यान येत्या १८ जून रोजी मतदान होणार असून, काँग्रेसच्या मतदारांशिवाय किती मतदारांचे मतदान काँग्रेसच्या पारड्यात पडतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



## काँग्रेसच्या निरीक्षकपदी निवड

# वास्तवाचे प्रतिबिंब लेखणीतून उतरविणे कवीची भूमिका-प्रा.डॉ.शोभा रोकडे

**अमरावती/का.प्र.**

कवी हा युगाचा हूंकार असतो, तत्कालीन वास्तवाचे प्रतिबिंब आपल्या लेखणीतून उतरवणे ही कवीची भूमिका असली पाहिजे, या भानातून आलेली कविता श्रेष्ठ कविता होय..सुयोग रांजनेकर यांनी हे भान जाणिवपूर्वक सांभाळले आहे, म्हणून ही कविता महत्त्वाचा दस्तऐवज होय.असे वक्तव्य डॉ. शोभा रोकडे यांनी प्रमुख अतिथी म्हणून बोलतांना व्यक्त केले.सुप्रसिद्ध युवाकवी, व्याख्याते तथा गझलकार सुयोग राजनेकर यांच्या बहुचर्चित अंगार या कवितासंग्रहाचे प्रकाशन मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयाच्या (रूरल इन्स्टिटयूट)सभागृहात संपन्न झाले.यापसंगी त्यो बोलत होत्या.

'अंगार' हा कवितासंग्रह केवळ कवितांचा संग्रह नाही, तर संवेदनांच्या धगधगत्या प्रवासाची जिवंत अभिव्यक्ती आहे.या कवितांमध्ये संघर्ष आहे, वेदना आहे, विद्रोह आहे;पण त्याचबरोबर माणुसकी जपण्याची आशाही आहे.कवी सुयोग राजनेकर यांच्या शब्दांतील हा अंगार समाजाला अंतर्मुख करणारा आणि विचारांना चेतवणारा ठरतो.ही कविता केवळ वाचकांच्या डोळ्यांत भरत नाही, तर त्यांच्या मनात दीर्घकाळ पेटत राहते.



## अंगार कवितासंग्रहाचे प्रकाशन थाटात

'अंगार'मधील शब्द हे फक्त अक्षर नाहीत, तर काळाच्या वेदनेला दिलेला जिवंत आवाज आहेत.असे वक्तव्य डॉ. मंदा नांदुरकर यांनी प्रमुख अतिथी म्हणून बोलतांना व्यक्त केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. स्मिता देशमुख, उदघाटक ग्रामगीताचार्य गजाननजी काकडे, प्रमुख अतिथी म्हणून डॉ. शोभा रोकडे, डॉ. राजेश मिरगे, डॉ. मंदा नांदुरकरआदि मान्यवर उपस्थित होते.ॲड. डॉ. नीता कचवे, प्रा. सारंगजी ताथोडे, डॉ. दीपाली सांगोले या मान्यवरांनी बहुचर्चित अंगार कवितासंग्रहावर अतिशय सुंदर आणि परखड असे भाष्य केले.

सुयोग सारखे विद्यार्थी शिक्षकांच्या गळ्यातले ताईत असतात.असे वक्तव्य प्रा. डॉ. राजेश मिरगे यांनी प्रमुख अतिथी म्हणून बोलतांना व्यक्त केले.

यावेळी संवेदना बहुद्देशीय संस्था, बांधिलकी प्रतिष्ठान, परिवर्तन प्रबोधिनी, काव्यप्रेमी शिक्षक मंच आदि संघटनांच्यावतीने कवी सुयोग राजनेकर यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.संचालन ग्रामगीताचार्य अजय अडीकणे यांनी केले.

# शेतकऱ्यांच्या शिवपांदन रस्त्यासाठी बेमुदत उपोषण आजपासून

**लेहेगाव/वार्ताहर**

मौजा शिरलस सालेमपूर येथील शिवपांदन रस्त्याचे काम गेल्या दोन वर्षांपासून रखडल्याने संतप्त शेतकऱ्यांनी आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. याबाबत शेतकऱ्यांनी तहसील दार यांना निवेदन देऊन १ जून २०२६ पासून उपोषण सुरू करण्याची नोटीस दिली आहे.

शेतकऱ्यांच्या म्हणण्या नुसार, शिवपांदन रस्त्याचे सुमारे दोन किलोमीटरचे काम पूर्ण झाले असून केवळ १०० ते १५० मीटर अंतराचे काम शिल्लक आहे. मात्र संबंधित ठिकाणी निर्माण झालेल्या अडथळ्यामुळे रस्त्याचे काम फेब्रुवारी २०२४ पासून बंद पडले आहे. प्रशासनाने अनेकदा पाहणी व कार्यवाहीचा प्रयत्न केला असला तरी अद्याप मार्ग मोकळा झालेला नसल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

रस्ता अपूर्ण असल्याने शेतकऱ्यांना शेतमालाची वाहतूक, शेतीची मशागत तसेच दैनंदिन कामांसाठी मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून रस्ता पूर्ण करावा, अन्यथा १ जूनपासून सर्व्हे क्रमांक ६/३ येथे आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. उपोषणात अंकित मावळे, पंकज गुजर, प्रफुल गजलकर आणि सूरज अवचार हे शेतकरी सहभागी होणार असून, मागणी पूर्ण होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.



> प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही मार्ग निघत नाही.रस्ता नसल्याने शेतीची कामे आणि शेतमालाची वाहतूक करताना मोठ्या अडचणी येत आहेत. त्यामुळे आता उपोषणाशिवाय आमच्याकडे दुसरा पर्याय उरलेला नाही.
>
> **अंकित मावळे,** शेतकरी
>
> रस्त्याचे काम जवळपास संपूर्ण काम पूर्ण झाले आहे केवळ थोडेसे अंतरासाठी संपूर्ण रस्ता बंद पाडणे ही दुर्दैवी बाब आहे प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून प्रश्न निकाली काढावा ही आमची अपेक्षा आहे.
>
> **पंकज गुजर,** शेतकरी

# वरूड तालुक्यात गारपिट व वादळी पावसाचा कहर

**वरूड/वार्ताहर**

तालुक्यामध्ये ३० मे रोजी झालेल्या वादळी अवकाळी पावसामुळे व गारपीटीमुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे आंबिया बहार संत्राच्या हजारो हेक्टर क्षेत्राचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून संत्रा मोसंबी भाजीपाला यासह विविध पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्यामुळे नुकसानीचे सर्वेक्षण करुन तात्काळ अनुदान वाटप करण्याबाबत देवेंद्र भुयार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी केली आहे.

तत्काळ पंचनामे करून नुकसानीचा अहवाल शासनाला पाठविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांनी द्यावेत. वरुड तालुक्यात दिनांक ३० मे रोजी दुपारी ४ वाजता दरम्यान गारांचा वर्षाव व अवकाळी वादळी वा-यासह पाऊस झालेला आहे. सदर झालेल्या गारांमुळे व वादळी वा-यासह पावसामुळे शेतक-यांचे गहू, हरभरा इत्यादी पिकांचे तसेच संत्रा व मोसंबी इत्यादी फळ पिंकांचे आंबीया बहाराचे प्रचंड नुकसान झालेले आहे.

व त्यामुळे शेतकरी अत्यंत आर्थिक अडचण आलेला आहे.



# संक्षिप्त

## खुशबू उईके हिचा सत्कार

**कुऱ्हा-** खुशबु उइके हिने स्कॉलरशीप आणि नवोदय ची परिक्षा एकाच सत्रात उतीर्ण केल्या आहे. दोन्ही परिक्षा पास होण्याचा बहुमान करणारी तिवसा तालुक्या तील आदिवासी समाजातील एकमेव विद्यार्थीनी आहे. याबद्दल तिचा सत्का वरखेड-तारखेड येथील नागरिकांचे वतीने तिच्या घरी जाऊन करण्यात आला. खुशबू ५ वर्गात शिक्षण घेतले असून तिची अभ्यासातील जिद्द चिकाटी व सातत्य राखून आर्थिक परिस्थितीवर मात करत तिने यश संपादन केले आहे. तारखेड वरखेड या गावाचा मान लौकिक केला आहे. गरीब परिस्थिती व आईवडिलांचे अल्प शिक्षण असताना तिला आजच विविध प्रकारचे पुरस्कार व गुणवत्ता प्राप्त शालेय प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकाविले आहे. सत्कार प्रसंगी भैय्या बोके, मोहन अग्रवाल जानराव मनोहर सतिश बोके गुरुजी, प्रकाश मनोहर, शरद अग्रवाल, नितीन कुबडे, अमोल बोके, नरेश भोयर, शुभम भोयर, उमेश पारीसे, शेषराव उईके, गिरीधर उईके उपस्थित होते .



## पीयूष प्रफुल गडलिंग शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण

**कुऱ्हा-** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद (एमएससीई), पुणे यांच्यामार्फत दरवर्षी इयत्ता पाचवी (पूर्व उच्च प्राथमिक) व इयत्ता आठवी (पूर्व माध्यमिक) विद्यार्थ्यांसाठी राज्य शिष्यवृत्ती परीक्षा आयोजित करण्यात येते. गुणवंत विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य व शैक्षणिक प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने ही परीक्षा घेतली जाते.यंदाच्या शिष्यवृत्ती परीक्षेच्या निकालात जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक मराठी शाळा, वरखेड येथील इयत्ता पाचवीचा विद्यार्थी पीयूष प्रफुल गडलिंग याने यश संपादन करत शाळेचा नावलौकिक वाढविला आहे. शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण होऊन त्याने आपल्या गुणवत्तेची छाप पाडली आहे.विशेष बाब म्हणजे शाळेतून या परीक्षेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांपैकी पीयूष हा एकमेव विद्यार्थी उत्तीर्ण झाला आहे. शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी मानाचा तुरा खोवला गेला आहे. त्याच्या या यशामुळे शाळेतील शिक्षकवृंद, मुख्याध्यापक, पालक तसेच गावकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.घुरडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभल्याचे पीयूषने सांगितले. तसेच शाळेतील सर्व शिक्षक आणि मुख्याध्यापक आईवडील यांच्या सहकार्यामुळे हे यश मिळाल्याची भावना व्यक्त केली.



## राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंती

**येवदा-** भारतीय जनता पार्टीच्या वतीने येवदा येथे राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन व हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' कार्यक्रमाचेही सामूहिक श्रवण करण्यात आले. कार्यक्रमात उपस्थितांनी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या लोककल्याणकारी कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचे स्मरण केले. तसेच 'मन की बात' कार्यक्रमातून पंतप्रधानांनी मांडलेल्या विविध सामाजिक व राष्ट्रीय विषयांवरील विचारांचे श्रवण केले. यावेळी ओमप्रकाश शर्मा, संजय वाघमारे, चंदूभाऊ रघुवंशी, नितीन बढे, नकुल सोनटक्के, मयूर वांदे, पिंटू आसरे, अभिजीत कराळे, दिलीप दवंडे, अमोल कवळे आदी उपस्थित होते.भारतीय जनता पार्टीच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उपस्थितांनी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजहितासाठी कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला.



## जागतिक होणार वृक्षारोपण


**अमरावती-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या उद्यान विभागातर्फे जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून आगामी ५ जून रोजी वृक्षारोपण केले जाईल. सकाळी ९ वाजता हा कार्यक्रम सुरु होईल. विद्यापीठाच्या मुख्य रस्त्यापासून परीक्षा विभागाच्या उत्तरपत्रिका भांडारकडे जाणाया नवीन रस्त्याच्या दुतर्फा जागेत वृक्षारोपण केले जाणार आहे. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांचे हस्ते हा कार्यक्रम होणार आहे. याप्रसंगी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे तसेच विद्यापीठातील सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी हे प्रामुख्याने उपस्थित राहणार आहे. या वृक्षारोपण कार्यक्रमाला जास्तीतजास्त संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन कार्यकारी अभियंता शशिकांत रोडे व उद्यान अधीक्षक भीमराव वाठोरे यांनी विद्यापीठाच्यावतीने केले आहे.

## उद्या होणार तक्रारीचे निराकरण

**अमरावती-** भारतीय डाक खात्याच्या वतीने अमरावती विभागातील ग्राहकांच्या प्रलंबित तक्रारींचे निवारण करण्यासाठी मंगळवार, २ जून रोजी सकाळी ११ वाजता प्रवर अधीक्षक डाकघर कार्यालयात 'डाक अदालत' आयोजित करण्यात आले आहे. या डाक अदालतीमध्ये प्रामुख्याने स्पीड पोस्ट, नोंदणीकृत पार्सल, काउंटर सेवा, बचत बँक खाते आणि मनीऑर्डर यांसारख्या सेवांशी संबंधित तक्रारी विचारात घेतल्या जातील. विशेषतः अशा तक्रारी, ज्यांचे निवारण सहा आठवड्यांच्या आत झाले नसेल किंवा ज्यांना विभागाकडून समाधानकारक उत्तर मिळाले नसेल, अशा प्रकरणांची दखल घेतली जाणार आहे. तक्रारदारांनी आपला अर्ज सादर करताना त्यामध्ये मूळ तक्रार केल्याची तारीख, संबंधित अधिकाऱ्याचे नाव व पद, आणि तक्रारीचा संपूर्ण तपशील नमूद करणे आवश्यक आहे. हे अर्ज प्रवर अधीक्षक कार्यालयात १ जून पूर्वी पोहोचणे अनिवार्य आहे, असे प्रवर अधीक्षक डाकघर यांनी कळवले आहे.

## दगड मारून जखमी केले

**परतवाडा -** फिर्यादी हा कामावर येत नसल्याच्या कारणावरून आरोपीने फिर्यादीस लाथाबुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ केली व दगड मारून जखमी केले. ही घटना परेड ग्राउंड, परतवाडा येथे गुरुवारी सकाळी ११ वाजताच्या सुमारास घडली. फिर्यादी विशाल प्रकाश इवनात (२१) रा. गवळीपुरा यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# शापीत सिमेंटचे रस्ते

**विकसित राष्ट्राने जो मार्ग स्वीकारला तोच मार्ग विकसिनशिल राष्ट्रांनी चोखाळल्याने आज आपण सर्वजण ग्लोबल वार्मिंगमुळे अडचणीत आलो आहोत. त्यामुळे प्रत्येक क्षेत्राचा विकास हा ठिकाणच्या पर्यावरणाच्या परिस्थितीनुसार करायला हवा तरच सम्यक विकास पण शाश्वत होईल व दीर्घकाळ पुढच्या पीढीला पर्यावरणाचा फायदा होईल.**

**आ**पला भारत देश उष्णकटीबंधीय प्रदेशात येतो. आपल्याकडे ९ महिने सूर्य आकाशात तळपत असतो. पावसाळ्याच्या दिवसातील उकाड्यात वाढ झाली आहे. ४ महिने कालावधित पावसाचे तास कमी झाले आहे. म्हणजेच उन्हाळा वाढला आहे. हिवाळ्यातील थंडी देखील कमी झाली आहे. याचाच अर्थ उन्हाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. आता तर उन्हाळा बारमाही अनुभवायला लागला आहे.

एकीकडे भारतातील जलसाठा दिवसेंदिवस कमी होतो आहे. केंद्रिय तसेच राज्य भुजल विभागाने त्यासंदर्भात जाहीर आवाहन केले आहे की पाण्याचा योग्य वापर कर, पुनर्भरणाच्या प्रक्रिया करा, ज्या स्थानी पाण्याला अडविता येईल तिथे अडवा व जिरवा, त्याकरीता मोठ्या प्रमाणात प्रचार व प्रसार सुरु आहेत व लाखो रुपये खर्च होत आहेत. दुसरीकडे त्याचवेळेस पाण्याचा उपयोग खुप मोठ्या प्रमाणात सुरु आहे. सिमेंटचे, कॉंक्रिटचे रस्ते, घरे यासाठी प्रचंड पाण्याचा वापर सुरु आहे. यामुळे दरवर्षी भूजलाची पातळी खोल खोल जात आहे. हिच परिस्थिती दिवसेंदिवस भीषण होत जाते आहे. सिमेंट कॉंक्रिटासाठी भूजलातून उपसलेले पाणी परत भूजलाला मिळत नाही तर सिमेंट कॉंक्रिटींगच्या मजबूतीसाठी वापरले जाते व त्यामुळे पाणी मृत होते.

दरवर्षी भूस्तरावरचे तापमान वाढत आहे. या तापमान वाढीसाठी जी प्रमुख कारणे आहे, त्यात सिमेंटचे कॉंक्रिटचे रस्ते, घरे,उचं मजली इमारती यांचा फार मोठा सहभाग आहे. याआगोदर आपल्याकडे डांबराचे रस्ते होते, मातीचे घरे होते त्यामुळे पर्यावरणाला धोका नव्हता. आज सर्वत्र स्पर्धा म्हणून डांबरी रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण करण्यामुळे स्थानिक तापमानात वाढ होत आहे. आपल्या प्रदेशात कोणत्या प्रकारचे रस्ते असले पाहिजे याबाबत विचार करण्याची आवश्यकता आहे. ज्याठिकाणी डांबरीकरण करू शकत नाही त्याठिकाणी करण्यास हरकत नाही.



या सर्व परिस्थितीत विविध ग्रामिण योजना, पंतप्रधान ग्राम सडक योजना यात देखिल ग्रामिण क्षेत्रात सिमेंट कॉंक्रिटचे रस्ते खेडोपाडी करणे सुरु आहे. सिमेंट क्रॉक्रिटच्या उपयोगाने एकूणच ग्राम शहर यांच्या एकंदर तापमानात वाढ होत आहे. एकदा हा रस्ता, घरे, मोठ्या इमारती उष्णतेने गरम झाले की थंड होण्याची प्रक्रिया नाही. त्यामुळे रात्रीचे तापमान देखिल वाढले आहे. थंड होण्याची प्रक्रिया सुरु होत नाही तोच दुसऱ्या दिवशी सकाळपासून सूर्याच्या उष्णतेमुळे हे कॉंक्रिटचे जंगल तापायला सुरुवात होते. पूर्वी आमच्याकडे डांबराचे रस्ते होते त्यामुळे ते रात्री कमीत कमी थंड तरी व्हायचे. त्यामुळे रात्रीच्या तापमान कमी असायचे. ग्रामिण क्षेत्रात कॉंक्रिटच्या रस्तावर उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये संध्याकाळी पाणी शिंपडून रस्ता थंड करण्याचे दृश्य अनुभवयाच मिळतात, म्हणजेच पाण्याच्या अपव्यय.

शासनाच्या नियमाप्रमाणे आपल्या उष्णप्रदेशांमध्ये सुरुवातीपासून एक नियम टाऊन प्लानिंगच्या सहाय्याने राबवण्यात येतो. तो म्हणजे आपल्या घराच्या प्लॉटपैकी ३३ टक्के जागेवर बांधकाम करण्यात येऊ नये असा नियम असताना, नियमाचे पालन होताना दिसत नाही. खरे तर ज्याचे घर आहे त्याने घर सोडून इतर जागेवर कॉंक्रिटीकरण करूच नये व त्या जागेवर वृक्ष लागवड करावी. जेणे करून बांधकाम केलेला भाग खूप जास्त तापणार नाही. त्यामुळे कुलरचा वापर कमी वेळ करून विजेची बचत होईल. परंतु आज असे दृश्य दिसत नाही. पूर्वी सर्व जुन्या घरांच्या परिसरात ही व्यवस्था होती. इंग्रजांनी देखील बांधकाम करताना काळजीपूर्वक यादृष्टीने या भूप्रदेशाचा विचार करूनच केल्याचे लक्षात येते. आमचे घर ही आमची आवश्यकता आहे परंतु आमच्या अंगणात सिमेंटीकरण करणे हे धोकादायक आहे.

खरे तर कॉंक्रिटचे रस्ते ज्या प्रदेशात बर्फ पडतो त्या प्रदेशासाठी बरोबर आहेत. कारण जेसीबी सहाय्याने रस्त्यावरील बर्फ बाजुला करते वेळेस व्यवस्थित बाजुला करता येऊ शकतो. त्या ठिकाणी डांबराचे रस्ते असतील तर ते वारंवार उखडल्या जातील व त्याचा दुरुस्तीचा खर्च वाढेल. परंतु जिथे बर्फ पडत नाही त्याठिकाणी सिमेंट कॉंक्रिटचे रस्ते हे शाप ठरत आहेत.

दरवर्षी जो पाऊस पडतो त्याच्या १० टक्के पाणी हे सिमेंटचे जंगल पिते व पाण्याला मृत करते. पाण्याच्या दुर्भिक्षाचे हे एक कारण आहे. दुसरे पाणी जमिनीत मुरत नाही. साधारणतः एक क्युबिक फुट सिमेंटच्या बांधकामासाठी २५० ते ३०० लिटर पाणी खर्च होते. त्यामुळे आपण सर्वांनी विचार केला पाहिजे की ज्या द्वितीय स्रोतातून आपण पाणी उपसून हे सिमेंट कॉंक्रिटचे बांधकाम करतो ते द्वितीय स्रोतातील पाणी आटत आहे व त्यामुळे भूगर्भातील पाणी संपायला लागले आहे. पाश्चिमात्यांकडील पर्यावरण आपल्या भूप्रदेशाला लागू होत नाही त्यामुळे त्यांचे अनुकरण करणे आज महागात पडत आहे व त्यामुळे प्रचंड पर्यावरणाची समस्या आ वासून उभी राहिली आहे. सिमेंटचे रस्ते म्हणजे विकास हा दृष्टीकोन बदलण्याची आज आवश्यकता आहे. १ किमी सिमेंटच्या रस्त्याच्या खर्चामध्ये ५ किमी डांबराचे रस्ते तयार होऊ शकतात व त्याद्वारे आम्ही आमच्या देशातील अनेक भागांतील रस्ते मुख्य रस्त्यांशी जोडू शकलो नाही, ते जोडल्या जाऊ शकतात. आज भारतात १५ ते १६ टक्के जंगल शिल्लक आहे व सिमेंटच्या जंगलाचे प्रमाण मात्र दिवसेंदिवस वाढते आहे.

आमचे राज्यकर्ते विदेशात फिरून येतात व त्याप्रमाणे आमच्याकडील रस्त्याचे दुरुस्ती व सुशोभिकरण करीत असतात. रस्त्यांच्या दुभाजकांमध्ये सुशोभित करणारी झाडे लावली जातात व त्यासाठी वार्षीक खर्च आम्ही सर्वजण महापालिकेला देतच असतो. परंतु नैसर्गिकरित्या मोठी झाडे जशी, कडूनिंब, करंजी, गुलमोहर, आंबा सारखी झाडे या दुभाजकांमध्ये लावली पाहिजे जेणेकरून त्यांच्या सावलीमुळे रस्ते थंड असतील व प्रवासादरम्यान आम्हाला उन्हाचा त्रास कमी होईल. इंग्रजांनी रस्त्याच्या दुतर्फा मोठ मोठी झाडे लावली. त्यांनी सुशोभित करणारी झाडे लावली नाहीत हे लक्षात घेणे आवश्यक आहे.


निरी (NEERI - National Environmental Engineering Research Institute) ने अपने शोध और अध्ययनों के आधार पर सीमेंट/कांक्रीट सड़कों (Cement Roads) का कुछ संदर्भों में विरोध किया है। निरी, वैज्ञानिक तथा औद्योगिक अनुसंधान परिषद (CSIR) के अंतर्गत आने वाली एक प्रमुख पर्यावरण अनुसंधान संस्था है।

पर्यावरण और जलवायु के दृष्टिकोण से, निरी और अन्य पर्यावरणविदों द्वारा सीमेंट सड़कों के विरोध के मुख्य कारण निम्नलिखित हैं:

- शहरी तापमान में वृद्धि (Urban Heat Island Effect): डामर (Asphalt) सड़कों की तुलना में सीमेंट की सड़कें (CC Roads) ज्यादा ऊष्मा (Heat) अवशोषित करती हैं और वातावरण में गर्मी छोड़ती हैं। इससे शहरों का तापमान बढ़ता है।
- जल पुनर्भरण में बाधा (Lack of Water Percolation): सीमेंट की सड़कें पानी को जमीन के अंदर जाने से पूरी तरह रोकती हैं। इससे बारिश का पानी बहकर व्यर्थ हो जाता है और भूजल स्तर (Groundwater level) में भारी गिरावट आती है।

विकसित राष्ट्राने जो मार्ग स्वीकारला तोच मार्ग विकसिनशिल राष्ट्रांनी चोखाळल्याने आज आपण सर्वजण ग्लोबल वार्मिंगमुळे अडचणीत आलो आहोत. त्यामुळे प्रत्येक क्षेत्राचा विकास हा ठिकाणच्या पर्यावरणाच्या परिस्थितीनुसार करायला हवा तरच सम्यक विकास पण शाश्वत होईल व दीर्घकाळ पुढच्या पीढीला पर्यावरणाचा फायदा होईल. याकडे आमचे राज्यकर्ते व आम्ही लक्ष दिले तरच भविष्य उज्ज्वल आहे, याच उद्देशाने हे पत्रलेखन.

**अरविंद बा. कडबे**
'ओलावा फाऊंडेशन'
मो.९४२२११२४२०

# उष्णता वाढ अचानकपणे नाही..

**इं**ग्रजांनी आपल्या देशावर साधारणतः २०० वर्ष राज्य केले या कालावधीत त्यांनी आपले शैक्षणिक धोरण,सामाजिक धोरण,राजकीय धोरण,शेती विषयक धोरण व पर्यावरणीय धोरणात अत्यंत जाणीवपूर्वक आपल्या देशाचा घात केलेला आहे. त्याचा परिणाम आज आपला देश भोगत आहे. कारण इंग्रजांनी जो विकास केला त्याच विकासाच्या पावलावर आपले राज्यकर्ते आपल्या देशाला विकसित करण्याच्या उद्देशाने कामाला लागलेले आहेत असे स्वातंत्र्यानंतर आपल्याला जाणवत आहे.

गांधीजींच्या विचारांनी जर आपण समृद्ध खेडी हा शाश्वत विकासाचा मार्ग स्वीकारला असता तर आजची परिस्थिती कदाचित वेगळी असती. इंग्रजांनी पर्यावरणाच्या दृष्टीने त्यांनी काय केले की त्या काळात आपल्या देशात 'लाकडी कोळसा' हे इंधन म्हणून आपल्याकडे वापरल्या जायचे व त्यासाठी आपले जैविक जंगल होते ते कंत्राटदारांना द्यायला सुरुवात केल व त्या ठिकाणी कमर्शियल जंगलाची सुरुवात झाली. आपल्या देशातले जैविक जंगल (४५-५०%)हळूहळू कमी होण्यास सुरुवात झाली. त्यांच्या धोरणानुसार आपल्याकडे असे म्हणता येईल की त्यांनी सागवानाची शेती जे 'कमर्शियल मूड' म्हणून सर्वत्र मोठ्या प्रमाणात वापरल्या जात होते त्याचा उपयोग करण्यात आला.

स्वातंत्र्यानंतर १९७० मध्ये आपल्या राज्यकर्त्यांनी फॉरेस्ट डेव्हलपमेंट कार्पोरेशन ऑफ इंडिया(FDCM)ची स्थापना करून त्या माध्यमातून इंग्रजांनी लागवड केलेल्या सागवानाची सर्वत्र लागवड केली व आपल्या देशातील जैवविविधता युक्त जंगले मोठ्या प्रमाणात समाप्त झाली. त्याचा दुष्परिणाम आज आपण मोठ्या प्रमाणात तापमान वाढीत दिवसेंदिवस अनुभवतो आहे.




त्याचबरोबर आमच्या राज्यकर्त्यांनी शहरीकरण व त्यात मोठ्या प्रमाणात कॉंक्रिटीकरण करण्याचा घाट घातल्यामुळे तापमान वाढीत मदतच झाली. कॉंक्रिटीकरणाचे रस्ते करताना त्यात दुभाजकांमध्ये मोठी झाड लावण्याची ऐवजी डेकोरेटिव्ह झाड लावण्याचा प्रकार अत्यंत त्रासदायक आहे.

त्याऐवजी त्यांनी इंग्रजांनी जसे रस्त्याच्या दुतर्फा मोठी झाडे लावली होती ती त्यांच्याकडून शिकण्याच्या ऐवजी लहान डेकोरेटिव्ह झाडे काय उपयोगाची? त्यामुळे सिमेंटचा रस्ता हा अधिक उष्णता शोषून घेतो रात्री उष्णता सोडण्याचे काम करतो व त्यामुळे गेल्या ५०-६० वर्षात दिवस व रात्री यातील उष्णतेचे प्रमाणाची दरी ही (Dey temp 46 v Night temp 30 )कमी झालेली आहे पूर्वी जरी उष्णता होती व याच प्रकारचा तापमान होते तरी रात्री गाव शहर थंड व्हायचे आज असे नाही. याच्यात दिवसेंदिवस भर औद्योगीकरणाची झाली तसेच एसीचा मोठ्या प्रमाणात वापर वाढला, विजेचा वापर वाढला व प्रदूषणात सातत्याने भर पडतच गेली.व त्याचे परिणाम म्हणून मग Al-Nino सारखे दुष्परिणाम होत आहे.

आज आपल्याकडे जैविक जंगल फक्त ८-९ टक्के आहे व लागवडीचे जंगल हे १२ ते १३ टक्के आहे याविरुद्ध उष्णता वाढवणारे घटक जसे मोठ्या प्रमाणात रासायनिक शेती, पेट्रोल व डिझेलच्या गाड्या वाढतच आहे. युद्धात वापरल्या जाणारे मोठ्या प्रमाणात शस्त्रे ही पण उष्णता वाढवण्यास मदत करीत आहे या सर्वांचा दुष्परिणामच आपण अनुभवतो आहे. त्यासोबतच एकही नदी, नाला, ओढा, तलाव, जलाशय हे जैविक पाण्याने प्रवाहित नाही त्यामुळे त्याचाही परिणाम होत आहे. प्रदूषणाची साखळी सातत्याने वाढत असताना त्याला सांभाळणारी जैविक साखळी मात्र कोलमडताना आपण अनुभवतो आहे व त्याचा परिणाम तापमान वाढ.आम्हाला याकरता प्रयत्न करावे लागतील तरच भविष्य उज्वल होईल जीवन जगणे सुसह्य होईल.

# पगारदार मध्यमवर्गाची काळरात्र सुरु होणार



**आ**ता नीट लक्षात घ्या. पगारदार मध्यम वर्गाची काळ रात्र सुरू होणार आहे. गेल्या ८ वर्षात सरकारी महागाईची आकडेवारी लक्षात घेतली तर मध्यमवर्गाची क्रयशक्ती वाढली नाही. शेतकऱ्यांचे उत्पन्न ११ टक्क्यांनी कमी झाले आहे. हीच परिस्थिती कारकून, टेक्निशियन वगैरे काम करणाऱ्या लोकांची आहे. सरकारी आकडेवारी पेक्षा प्रत्यक्ष महागाई जास्त असते हे लक्षात घेतले तर दिसणारे चित्र भयावह आहे. क्रयशक्ती घटली आहे, म्हणून खर्च नाहीये. मागणी नाहीये. म्हणून गुंतवणूक होत नाहीये. उद्योगा साठी वातावरण अधिक पोषक व्हावे ह्या दृष्टीने धोरणात्मक हालचाल काहीच नाहीये म्हणून परकीय गुंतवणूक सुद्धा गेले दोन वर्ष पलायन करते आहे. ह्या वर्षी पाऊस कमी झाला तर भाज्या, डाळी, तेलबिया महागतील.

फुकट वस्तू वाटून मते मिळविता येतात. कुंभ मेळे वगैरे करून हिंदुत्ववादी लोकांना खुश ठेवता येते. पण ह्यांनी अर्थव्यवस्था चालत नाही. त्यासाठी उत्पादकता वाढायला लागते. गुंतवणूक यावी लागते. उच्च दर्जाचा रोजगार निर्माण करावा लागतो. संशोधन, नवीन शोध ह्यात गुंतवणूक करावी लागते. हे असे व्हावे म्हणून धोरणात्मक बदल करावे लागतात.

मोदी शहा सरकार हे निवडणूक जिंकणारे सरकार आहे. निवडणुकीचे राजकारण त्यांना नीट कळते. पण अर्थव्यवस्था सांभाळायची तर वेगळा माइंडसेट लागतो. विषय नीट कळायला लागतो. दुर्दैवाने ह्या सरकार मधील जे कोणी तज्ञ आहेत (ते गोखले इंस्टिट्यूट चे चांसलर असलेले सन्याल म्हणून एक गृहस्थ आहेत ते पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार मंडळीचे सदस्य आहेत तसली विनोदी पात्रे सोडून देऊ) ते सुद्धा स्पष्ट बोलत नाहीत. स्वतंत्र मत मांडले की पत्ता कट होतो हे आता सगळ्यांनाच समजले आहे. त्यामुळे धोरणात्मक फार काही होणार नाही. युद्ध सुरू होऊन महिना झाला तरी पंतप्रधान काहीच बोलले नव्हते. निवडणुका होत्या. निवडणूक झाल्यावर रासायनिक खत कमी वापरा वगैरे थातुर मातुर काहीतरी बोलले. युरिया ची किंमत गेले १५ वर्ष तेवढीच आहे. आयात खतावर सध्या ९० टक्के सबसिडी आहे ती कमी केली तर लोक खत कमी वापरतील. पण ते करण्याचे आणि शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून पर्यायी धोरण निर्मिती करण्याची मानसिकता आणि क्षमता, दोन्ही ह्यांच्या कडे नाहीत.

म्हणून येत्या वर्षात खर्च वाढणार आहेत. साधारण १२-१५ टक्के. पण पगार वाढणार नाही. म्हणून जपून खर्च करा. कोणतेही आर्थिक धाडस करताना दहा वेळा विचार करा. सगळी सोंगे आणता येतात, पैशाचे आणता येत नाही हे लक्षात ठेवा. विनाकारण कर्ज घेऊ नका. अनावश्यक गोष्टींसाठी तर अजिबात घेऊ नका.

**-निरज हातेकर**

# कॉर्पोरेट भांडवल!

**स्व**तःच स्वतःचा नाश करणारे , suicidal प्रवृत्ती असणारे कॉर्पोरेट भांडवल! .....आणि त्या प्रणालीचे प्रवक्ते भांडवल शाही विरोधी म्हणून बदनाम करतात डाव्याना! स्वतःमधील आत्मघातकी प्रवृत्ती बद्दल हे प्रवक्ते काहीही बोला नाहीत.Jefferies हे अमेरिकेतील एक मोठे ब्रोकरेज हाऊस आहे. आणि भारतासकट अनेक देशात गुंतवणूक व्यवहार आहेत. त्याचे प्रमुख ख्रिस वूड हे Greed and Fear (हाव आणि भय) या नांवाने एक साप्ताहिक न्यूजलेटर लिहितात.अलीकडच्या न्यूजलेटर मध्ये त्यांनी आर्टिफिशल इंटेलिजन्स क्षेत्रात होणाऱ्या महाकाय भांडवल गुंतवणुकीकडे लक्ष वेधले आहे.

अमेरिकेतील गुगल,मेटा,ॲमेझॉन आणि मायक्रोसॉफ्ट या फक्त चार कंपन्या मिळून वर्षभरात ७०० बिलियन डॉलर्स (म्हणजे ६७ लाख कोटी रुपये) भांडवल गुंतवणुक करणार आहेत. ए आय क्षेत्रातील दुसऱ्या लहान मध्यम कंपन्यांची भांडवल गुंतवणुक वेगळीच.गुंतवणुकीमुळे अमेरिकेत भांडवलाचा मोठ्या प्रमाणावरती नाश होऊ शकतो असा इशारा दिला आहे. त्याचा अर्थ असा की आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर ज्या प्रमाणात वाढत जाईल त्या प्रमाणात अनेक उद्योग व्यवसाय बंद पडू शकतात. आणि त्या उद्योग व्यवसायात घातलेले भांडवल मोठ्या प्रमाणावर निरुपयोगी ठरू शकते. मृत होऊ शकते.

गेल्या ४० वर्षात बेबंद भांडवलशाही, मार्केट शक्तींनी किती उत्पादक भांडवलाचा कायमचा नाश केला.... याची आकडेवारी ही लोक कधीही गोळा करणार नाहीत. मिळेल त्यावेळी डोळे विस्फारतील



त्या भांडवलातून ना काही वास्तुमाल सेवा उत्पादन होतील, ना विक्री होईल, ना परतावा मिळेलष्ठआज हे उद्योग व्यवसाय जी रोजगारनिर्मिती करत आहेत ती देखील बंद होईल. त्यासाठी त्यांनी इतिहासातील काही दाखले दिले आहेत (संदर्भ इकॉनॉमिक टाईम्स ३० मे, पान क्रमांक १०)

वीज, पाण्याची उपलब्धता कमी होणे, त्याचा किंमती वाढणे यांच्या किंमती नागरिक मोजणार आहेत. त्याची डॉलर, रुपयातील किंमत मोठी असणार आहे. मोठ्या प्रमाणावरती पाणी आणि वीज वापरणाऱ्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स उद्योगाचे पर्यावरणावर होणारे परिणाम याची डॉलर किंवा रुपयातली किंमत अजून चर्चेत देखील नाही. प्रश्न असा विचारावयास हवा की आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा समाजाला, अर्थव्यवस्थेला नेट गेन काय ? पुढचा प्रश्न. कोणत्या समाज वर्ग घटकांना लाभ होणार आणि कोणते समाज वर्ग घटक त्याची किंमत मोजणार).

**संजीव चांदोरकर**

# सर्वात श्रीमंत मृतदेह होण्यासाठी जगू नका!

**भा**रतातील अनेक निवृत्त नागरिकांचे जीवन पाहिले तर एक विचित्र विरोधाभास दिसून येतो. आयुष्यभर कष्ट करून, काटकसर करून, प्रत्येक रुपया जपून खर्च करून त्यांनी स्वतःसाठी आर्थिक सुरक्षितता निर्माण केलेली असते. स्वतःचे घर, बँकेत चांगली बचत, एफडी, पीपीएफ, म्युच्युअल फंड यामध्ये लाखों-कोटी रुपयांची गुंतवणूक असते. तरीही त्यांच्यापैकी अनेकजण स्वतःच्या गरजा, आनंद आणि आरोग्यावर खर्च करण्यास कचरतात. आर्थिकदृष्ट्या सक्षम असूनही ते मानसिकदृष्ट्या खर्च करण्यास तयार नसतात. यालाच आर्थिक मानसशास्त्रात 'Switch Failure' असे म्हटले जाते.

आजची निवृत्त पिढी अशा काळात वाढली, जेव्हा देशात टंचाई होती. रेशन कार्ड, मर्यादित उत्पन्न, नोकरीची असुरक्षितता आणि भविष्यातील अनिश्चितता यामुळे बचत ही केवळ सवय नव्हती, तर जगण्यासाठीची गरज होती. त्यांनी मुलांच्या शिक्षणासाठी, घरासाठी, कुटुंबाच्या भविष्यासाठी स्वतःच्या अनेक इच्छा बाजूला ठेवल्या. अनेकांनी सुट्ट्या घेतल्या नाहीत, साधे जीवन जगले आणि प्रत्येक खर्चाचा विचार केला.

मात्र समस्या तेव्हा निर्माण होते, जेव्हा निवृत्तीनंतरही हीच मानसिकता कायम राहते. आयुष्यभर 'बचत करा' या विचारावर चाललेला मेंदू अचानक 'खर्च करा आणि आनंद घ्या' या अवस्थेत सहजपणे जाऊ शकत नाही. त्यामुळे अनेक निवृत्त व्यक्ती बँकेत भरपूर पैसे असूनही एसी कमी वापरतात, महाग उपचार टाळतात, आरामदायी प्रवास करण्याऐवजी त्रास सहन करतात आणि स्वतःच्या आनंदासाठी पैसे खर्च करणे टाळतात.

अनेकांना मूळ रक्कम वापरण्याची भीती वाटते. ते फक्त एफडीवरील व्याज खर्च करतात आणि मूळ रक्कम जसच्या तशी ठेवतात. काहीजण गुडघ्याची शस्त्रक्रिया किंवा आरोग्यावरील आवश्यक खर्च पुढे ढकलतात. काहींना वाटते की मुलांसाठी जास्तीत जास्त संपत्ती मागे ठेवली पाहिजे. परिणामी स्वतःचे आयुष्य मात्र मर्यादित आणि अपूर्ण राहते.

यामागे एक मोठी भीतीही असते.'मी जास्त जगलो तर?','पैसे संपले तर?' किंवा 'भविष्यातील वैद्यकीय खर्च कसा भागवू?' अशा प्रश्नांमुळे अनेकजण सतत सर्वात वाईट परिस्थितीची कल्पना करत राहतात. भविष्यातील चिंतेमुळे वर्तमानातील आनंद हरवून बसतात.

यावर उपाय काय? सर्वप्रथम, निवृत्तीनंतर खर्च करणे ही चुकीची गोष्ट नाही, हे स्वीकारणे आवश्यक आहे. आयुष्यभर कमावलेल्या पैशांमधून काही हिस्सा स्वतःच्या आनंदासाठी राखून ठेवला पाहिजे. प्रवास, छंद, आरोग्य, मित्र-परिवारासोबत वेळ घालवणे यासाठी स्वतंत्र निधी ठेवता येतो. आर्थिक सुरक्षिततेसाठी आवश्यक निधी वेगळा आणि जीवनाचा आनंद घेण्यासाठीचा निधी वेगळा ठेवणे ही चांगली पद्धत ठरू शकते.

मुलांसाठी संपत्ती ठेवणे चांगलेच आहे, पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे त्यांना आनंदी, निरोगी आणि आत्मनिर्भर पालक दिसणे. पालकांनी स्वतःचे जीवनही पूर्णपणे जगले पाहिजे. कारण पैसा हा शेवटी एक साधन आहे, उद्दिष्ट नाही.आपण आयुष्यभर साठवलेली संपत्ती जर आनंद, समाधान, आरोग्य आणि अनुभवांमध्ये रूपांतरित केली नाही, तर त्या संपत्तीचा उपयोग काय? बँक खात्यातील आकडे वाढत राहतील, पण आयुष्याचे क्षण परत येणार नाहीत.

म्हणूनच निवृत्तीनंतरचा काळ हा फक्त पैसे जपण्याचा नसून,आयुष्य जगण्याचा काळ आहे. स्वतःवर खर्च करा,आरोग्याची काळजी घ्या,प्रवास करा, आवडी जोपासा आणि जीवनाचा आनंद घ्या. अन्यथा शेवटी मोठी संपत्ती मागे राहील,पण मनात राहील ती न जगलेल्या आयुष्याची खंत.सर्वात श्रीमंत मृतदेह होण्यापेक्षा,सर्वात समाधानकारक आयुष्य जगणे अधिक महत्त्वाचे आहे.

**ॲड. धनंजय देशमुख**
वकील, समुपदेशक व समाजचिंतक
मो.९२८४३८२१०२

# लोकशाहीची संकल्पना आणि त्यापुढील आव्हाने

**२**०२६ हे भारतीय लोकशाहीचे अमृत महोत्सवी वर्ष आहे. जनसामान्यांना,साधारण व्यक्तीला असाधारण व उन्नत करणारी व्यवस्था म्हणजे लोकशाही होय.दुसऱ्या अर्थाने लोकशाही म्हणजे लोकांनी लोकांकरीता चालविलेले राज्य म्हणजे लोकशाही होय.भारतीय लोकशाही मध्ये स्वातंत्र्य समता न्याय व बंधुत्व आत्मा आहे. लोकशाहीची संकल्पना व्यापक आहे. लोकशाही जर मजबूत असेल तर देशाचा विकास ,जनतेचा विकास आहे पण संपली तर मात्र अधोगती आहे हे निर्विवाद आहे. देशात लिखित घटना असून सर्वांना मूलभूत अधिकार आहे.भारताच्या घटनेमध्ये सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाहीवादी असा उल्लेख आहे.

**भारतीय लोकशाही समोरील आव्हाने** -

१)जातीयवाद-लोकशाहीमध्ये सर्वच धर्म स्वभाव आहे. पण धर्मांध शक्ती उदयास येऊन जाती जातीमध्ये वाद निर्माण केल्यास अधोगती झाल्याशिवाय राहणार नाही.

२)राजकारणाचे गुन्हेगारीकरण - गेल्या पंचवीस तीस वर्षात राजकारणाचे गुन्हेगारीकरण आणि गुन्हेगारांचे राजकारण वाढले आहे.गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले अनेक खासदार संसदेत व आमदार विधिमंडळाचे सदस्य आहेत.

३)लोकशाही मार्गाने होत असलेल्या निवडणुकीत खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे.घोडे बाजारच काय आता तर हत्ती बाजार होत आहे.निवडणुकीत काळा पैसा भरपूर ओतल्या जातो.

४)संसदीय लोकशाही मध्ये सर्वसामान्य नागरिक,स्त्री पुरुष यांना मतदानाचा अधिकार घटनेने दिला आहे पण विधानसभा आणि लोकसभेच्या निवडणुकीत केवळ ५५ ते ६० टक्केच मतदार मतदान करतात.

५) लोकशाहीमध्ये निवडून दिलेले प्रतिनिधी हे जनतेचे सेवक व कारभारी असतात तर नागरीक मालक,राजे असतात पण हेच लोकप्रतिनिधी चुकले तर त्यांना जाब मालक विचारू शकते पण, प्रतिनिधी मालक,हुकूमशहा प्रमाणे वागू लागले तर ते लोकशाहीसमोर आव्हान आहे.



**प्राचार्य डॉ. संजय साळीवकर,**
अमरावती.
मो.९४२३४२४८५१

# खदानच्या 'मेळ्या'वर धाड की 'मैत्रीपूर्ण भेट'?

## एसपींचा आदेश; पथकाची कारवाई अनब मुख्य सूत्रधाराला 'व्हीआयपी पास'?

■ ॲड. समीर ठाकूर ■

*अकोला : जिल्हा पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांनी अवैध धंद्यांविरोधात उघडलेली मोहीम किती गांभीर्याने राबविली जाते आणि फिल्डवरील काही घटक ती किती प्रामाणिकपणे अंमलात आणतात, याचे ताजे उदाहरण खदान पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका गाजत असलेल्या कारवाईतून समोर आल्याची चर्चा आता रंगू लागली आहे.*

विश्वसनीय सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, खदान पोलिस ठाण्याच्या हद्दीत एका ठिकाणी मोठ्या प्रमाणात अवैध जुगार आणि इतर बेकायदेशीर व्यवहार सुरू असल्याची माहिती थेट जिल्हा पोलिस अधीक्षकांच्या निदर्शनास आली होती. विशेष म्हणजे हा एखादा छोटा-मोठा अड्डा नव्हता, तर दिवसाढवळ्या सुरू असलेले आणि रात्री उशिरापर्यंत गजबजलेले असे अवैध साम्राज्य असल्याची चर्चा आहे. परिसरात आंबट शौकिनांची एवढी गर्दी जमा होत होती की जणू एखादा जत्रेचा किंवा मेळ्याचा माहोल निर्माण झाला होता.

माहितीची गंभीर दखल घेत एसपी चांडक यांनी तातडीने गुन्हे शाखेतील एका अधिकाऱ्याला आणि त्यांच्या पथकाला धाड टाकण्याचे आदेश दिल्याचे सांगितले जाते. आदेश मिळाल्यानंतर पथक घटनास्थळी पोहोचलेही. मात्र त्यानंतर जे घडले, त्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

प्रत्यक्षदर्शींनी सांगितलेल्या माहितीनुसार, धाड सुरू झाली तेव्हा त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर लोकांची उपस्थिती होती.

अनेक जण व्यवहारात सक्रिय असल्याचेही बोलले जाते. मात्र एवढ्या मोठ्या गर्दीतून कारवाईच्या नावाखाली केवळ दोन जणांना ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर कारवाईचा गाजावाजा करण्यात आला, पण धंद्याचा कणा मानले जाणारे प्रमुख चेहरे मात्र कारवाईच्या परिघाबाहेरच राहिल्याचे आरोप होत आहेत. यामुळे ही धाड खरोखरच अवैध धंदा उद्ध्वस्त करण्यासाठी होती की केवळ कारवाईचा देखावा उभा करण्यासाठी, असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.

### केवळ धाडी नव्हे, 'धाडीमागच्यां'वरही कारवाई हवी!

अवैध धंदे बंद करायचे असतील तर फक्त दोन-चार मोहरे पकडून भागणार नाही. धंद्याचा आर्थिक कणा, त्यामागील सूत्रधार, माहिती पुरविणारी यंत्रणा आणि कथित संरक्षण साखळी यावरही प्रहार करावा लागेल. अन्यथा धाड पडेल, फोटो निघतील, प्रेसनोट जाईल, दोन आरोपी पकडले जातील आणि काही तासांत पुन्हा सर्व काही पूर्ववत सुरू होईल. जिल्ह्यातील अनेक नागरिकांना नेमकी हीच भीती वाटत आहे. आता चेंडू एसपी चांडक साहेब यांच्या कोर्टात आहे. या कारवाईची सखोल चौकशी होऊन जबाबदारी निश्चित होते की प्रकरण कागदोपत्रीच थंडावते, यावर पुढील अनेक प्रश्नांची उत्तरे अवलंबून असणार आहेत.

### जप्तीची रक्कमही 'डाएट प्लॅन'वर?

या कारवाईत दाखविण्यात आलेली जप्ती आणि प्रत्यक्षात सुरू असलेल्या व्यवहारांचे प्रमाण यामध्येही मोठी तफावत असल्याचे बोलले जात आहे. प्रत्यक्ष दृश्य पाहणारे आणि कारवाईची कागदोपत्री आकडेवारी पाहणारे अनेक जण आश्चर्य व्यक्त करीत आहेत. जर धंदा एवढ्या मोठ्या प्रमाणात सुरू होता, तर मग जप्ती इतकी मर्यादित कशी? हा प्रश्न उपस्थित होत असून या कारवाईतील पंचनामे आणि प्रत्यक्ष परिस्थिती यांचे स्वतंत्र परीक्षण व्हावे, अशी मागणीही पुढे येत आहे.

### नदी, झाडी अन् झुडुपांचा 'जादुई' बचावमार्ग?

धाडीनंतर संबंधित पथकाकडून अनेक संशयित नदी, झाडी आणि झुडुपांचा फायदा घेऊन पसार झाल्याचा दावा करण्यात आल्याची चर्चा आहे. मात्र हा दावा ऐकून अनेकांनी उपरोधिक प्रतिक्रिया दिली आहे. कारवाईपूर्वी परिसराचा वेढा का घालण्यात आला नाही? पळून जाण्याचे मार्ग बंद का करण्यात आले नाहीत? आवश्यक मनुष्यबळ का वापरण्यात आले नाही? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे अद्याप मिळालेली नाहीत. परिणामी, 'धंदेवाले पळाले की पळवले गेले?' असा टोमणाही आता नागरिकांमधून ऐकायला मिळत आहे.

### एसपी साहेबांच्या डोळ्यात धुळफेक?

सर्वात गंभीर बाब म्हणजे या संपूर्ण कारवाईमुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनाच चुकीचे चित्र दाखविण्याचा प्रयत्न झाला का, हा प्रश्न आहे. कारण माहितीच्या आधारे दिलेल्या आदेशानंतर प्रत्यक्ष कारवाईचा परिणाम अपेक्षेप्रमाणे दिसून आला नाही. जिल्हा पोलिस प्रमुखांना समाधानकारक अहवाल सादर झाला असेल; मात्र घटनास्थळावरील वास्तव आणि अहवालातील चित्र यामध्ये फरक असल्याची चर्चा असल्याने आता या प्रकरणाकडे स्वतः एसपी चांडक कोणत्या नजरेने पाहतात, याकडे लक्ष लागले आहे.

### खदान ठाणेदारांनाही विचारणा होणार?

या प्रकरणामुळे आणखी एक महत्त्वाचा प्रश्न समोर आला आहे. खदान पोलिस ठाण्याच्या हद्दीत एवढ्या मोठ्या प्रमाणावर अवैध धंदा सुरू होता, तर स्थानिक पोलिसांना त्याची माहिती नव्हती का? जर माहिती नव्हती तर तो गंभीर निष्काळजीपणाचा प्रकार मानावा लागेल. आणि माहिती असूनही कारवाई झाली नाही तर प्रश्न अधिक गंभीर ठरतो. म्हणूनच आता जिल्हा पोलिस अधीक्षक अर्चित चांडक हे संबंधित खदान ठाणेदारांना कारणे दाखवा नोटीस बजावतात का? स्थानिक पातळीवरील जबाबदारी निश्चित करतात का? डीबी पथकाच्या भूमिकेची चौकशी करतात का? याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे

### 'वहीद'ला अभय कोणाचे?

या संपूर्ण प्रकरणात सर्वाधिक चर्चेचा विषय ठरत आहे तो म्हणजे कथित मुख्य सूत्रधार म्हणून नाव घेतल्या जाणाऱ्या वहीद या व्यक्तीचा. स्थानिक पातळीवर धंद्याशी संबंधित म्हणून ज्याचे नाव घेतले जाते, त्या व्यक्तीपर्यंत कारवाईचा हात का पोहोचला नाही? हा प्रश्न आता नागरिक विचारत आहेत. धाड पडते, पथक पोहोचते, काही जण पकडले जातात; पण मुख्य नाव मात्र पुन्हा एकदा सुरक्षित राहते. हा केवळ योगायोग मानायचा की त्यामागे आणखी काही समीकरणे आहेत? याबाबत चर्चा रंगत आहे.

---

# शिरपूरच्या पाणीपुरवठा योजनेची दुरवस्था; कर्मचाऱ्यांचा जीव धोक्यात

## जीर्ण विहीर व मोडकळीस आलेली खोली; प्रशासनाच्या दुर्लक्षाबद्दल ग्रामस्थांमध्ये संताप

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या शिरपूर गावातील पाणीपुरवठा योजनेची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून, जीर्ण झालेली विहीर आणि मोडकळीस आलेल्या पंपगृहामुळे पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांचा जीव धोक्यात आला आहे. अनेक वर्षांपासून या समस्येकडे दुर्लक्ष होत असल्याने ग्रामस्थांनी प्रशासनाच्या निष्क्रिय कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीलगत असलेल्या खोलीच्या भिंतींना मोठे तडे गेले असून, एका बाजूची भिंत पूर्णपणे कोसळल्याची माहिती समोर आली आहे.

उर्वरित भिंती आणि छतही कमकुवत झाल्याने ते कोणत्याही क्षणी कोसळू शकते, अशी भीती व्यक्त केली जात आहे. अशा धोकादायक परिस्थितीत पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांना दररोज काम करावे लागत असल्याने त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.



स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, विहीर व पंपगृहाची अवस्था गेल्या अनेक वर्षांपासून खराब असून याबाबत प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करण्यात आल्या आहेत. मात्र, संबंधित विभागांकडून कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. गावातील नागरिकांनी प्रशासनाने तातडीने या ठिकाणाची पाहणी करून दुरुस्ती व सुरक्षिततेच्या उपाययोजना हाती घ्याव्यात, अशी मागणी केली आहे. अन्यथा भविष्यात एखादी दुर्घटना घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनावर राहील, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

### उघड्यावर विद्युत तार; अपघाताचा धोका

पाणीपुरवठा योजनेतील मोटारपंप सुरू व बंद करण्यासाठी कर्मचाऱ्यांना जीव मुठीत घेऊन काम करावे लागत आहे. पंपगृह परिसरात फ्यूज पेटीसह विद्युत तारा उघड्यावर असल्याने विजेचा धक्का लागून गंभीर अपघात होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. याकडे प्रशासनासह महावितरण विभागाचेही दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

वेळीच दखल न घेतल्यास मोठी दुर्घटना घडू शकते. अशा परिस्थितीत अपघात झाल्यास जबाबदार कोण, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. शिरपूर येथील पाणीपुरवठा योजनेच्या दुरवस्थेमुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून तातडीच्या कारवाईची मागणी जोर धरत आहे.

---

# गरजूंना आर्थिक मदत व रुग्णवाहिका सेवा मोफत

## सामाजिक कार्यकर्ते निलेश कापकर यांची सामाजिक बांधिलकी

■ प्रतिनिधी | खेट्री ■

सामाजिक बांधिलकी जपत आलेगाव येथील सामाजिक कार्यकर्ते निलेश कापकर यांनी अपघातग्रस्त युवक व पॅरालिसिसग्रस्त महिलेस आर्थिक मदत करून मानवतेचा आदर्श घालून दिला. लाखनवाडा (ता. खामगाव, जि. बुलढाणा) येथील लखन सुरेश गोरे (वय २२) हे ८ एप्रिल रोजी झालेल्या भीषण अपघातात गंभीर जखमी झाले होते. त्यांच्या पायाला गंभीर दुखापत झाल्याने डॉक्टरांना तो पाय कापावा लागला. या कठीण परिस्थितीत कापकर यांनी त्यांना ६,००० ची मदत दिली.



तसेच आलेगाव येथील पॅरालिसिसग्रस्त सुमन हिम्मतराव वानखडे या निराधार महिलेस ५,००० ची मदत देण्यात आली. त्यांना मोफत रुग्णवाहिका व डिझेल खर्चाची सुविधाही पुरविण्यात आली. नागेश कंटाळे यांनी ५,००० ची मदत केली असून, इतर नागरिकांनीही लोकवर्गणीतून सहकार्य केले. यावेळी शिवसेना शिंदे गटाच्या वतीने भविष्यात कृत्रिम पाय व आर्थिक मदत देण्याचे आश्वासन देण्यात आले. 'सेवा हीच आमची ओळख' या ब्रीदवाक्यानुसार पुढेही मदत करण्याचा निर्धार कापकर यांनी व्यक्त केला.

---

# ईएसआयसी विमाधारकांसाठी आयकॉन सेकंडरी हॉस्पिटल संलग्न

**अकोला :** एसआयसी रुग्णालयांची सुविधा उपलब्ध नसलेल्या ठिकाणी विमाधारकांना कॅशलेस वैद्यकीय उपचार मिळावेत, यासाठी ईएसआयसीकडून विविध खाजगी मल्टि-स्पेशालिटी रुग्णालयांशी टाय-अप करण्यात येतात.

एखाद्या आजारावरील आवश्यक सुविधा ईएसआयसी रुग्णालयात उपलब्ध नसल्यास विमाधारकांना सूचीबद्ध खाजगी रुग्णालयांमध्ये उपचार घेण्याची सुविधा दिली जाते. ईएसआयसीने महाराष्ट्रासह देशभरातील विमाधारकांसाठी सुपर स्पेशालिटी व मल्टि-स्पेशालिटी उपचारांसाठी अनेक खाजगी रुग्णालयांशी करार केले आहेत.

---

## जाहीर नोटीस

**दिवाणी न्यायालय क. स्तर बाळापूर**
**दयानंद मारुती वाघमारे यांचे न्यायालयात**
**सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर बाळापुर, बाळापुर, अकोला.**

दिवाणी किरकोळ अर्ज/११८/२०२६
विलास विजय राठोड वि. नील
पुढिल तारिख : २३-०६-२०२६

**अर्जदार :-** १. विलास विजय राठोड वय अं३१ वर्ष धंदा मजुरी २. एकनाथ विजय राठोड वय अं३६वर्ष धंदा मजुरी अर्जदार १ व २ रा. व्याळा ता. बाळापूर जि. अकोला ३. सुनिता किसन शेळके वय अं३४वर्ष धंदा घरकाम रा. सुकोडा ता. जि. अकोला ४. पुष्पा पांडुरंग सोळंके वय अं३४वर्ष धंदा घरकाम रा. पिंपळगांव रोड, घाटपुरी ता. खामगांव जि.बुलढाणा ५. शारदा रमेश चव्हाण वय अं२९ वर्ष धंदा घरकाम रा. खुमगांव ता. नांदुरा जि.बुलढाणा

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII १८२७ अंतर्गत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. मयत वनमाला विजय राठोड ही दिनांक २२.०३.२०२६ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर ता. जि. नागपूर येथे मरण पावली. मयत विजय मोतीराम राठोड हे दिनांक ०९.१०.२०२३ रोजी मौजे व्याळा ता. बाळापूर जि.अकोला येथे मरण पावले. वरील नमूद अर्जदार यांना मयत वनमाला विजय राठोड व मयत विजय मोतीराम राठोड यांचे एकमेव वारस असल्यामुळे त्यांना शासकीय, निमशासकीय व ईतर लाभाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक २३.०६.२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक २३.०४.२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

---

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १७६**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

---

# श्रीश्याम श्रीमहाकाल भजन महोत्सवास उत्स्फूर्त प्रतिसाद अनेक मान्यवरांनी उपस्थिती



**अकोला :** श्री श्याम प्रेमी सावरे ग्रुपच्या वतीने सिटी स्पोर्ट क्लबच्या मैदानात संपन्न झालेल्या पहिल्या श्याम-महाकाल भजन महोत्सवास श्याम व महाकाल भक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.या भजन महोत्सवात कोलकत्ता येथील भजनकार शुभम रुपम.तसेच उज्जैन येथील भजनकार किशन भगत यांनी खाटू नरेश श्यामबाबा व महाकाल यांच्या भजनांच्या माध्यमातून भक्तीभाव निर्माण केला.त्यांची भजने ऐकण्यासाठी दूरवरून भाविकांनी मैदानात एकच गर्दी केली होती.या उत्सवात खाटू धामच्या धर्तीवर श्री श्यामबाबा व महाकालची भव्य झाकी साकार करण्यात आली होती तसेच अखंड दिव्य ज्योत साकार करून भक्तांसाठी उत्तम दर्शन व्यवस्था करण्यात आली होती.सामूहिक आरती व दर्शन सोहळ्याने या भजन महोत्सवाचा प्रारंभ महानगरातील भजन गायक पंडित उमेश शर्मा उर्फ डब्बू तथा भजन गायिका नेतल शर्मा यांच्या भजनानी करण्यात आला.दरम्यान या महोत्सवात आयपीएस अधिकारी इशानी आनंद समवेत मान्यवरांनी उपस्थिती दर्शवित या उपक्रमाचे स्वागत केले.

---

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ५२८/२०२६ प्रोसेस नं.५२०२/२०२६
चौ.ता. १९/०६/२०२६ दिनांक : १६/०४/२०२६

**अर्जदार :** १. सुनिता गोपाल खेते २. ऋतुजा गोपाल खेते दोन्ही रा. शिवाजी नगर, जुने शहर, अकोला, ता. जि. अकोला. ३. दिव्यानी गोविंदा जवादे रा. हनुमान मंदिराजवळ, भारती प्लॉट, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला. ४. निकिता विवेक खार्वे रा. सनावद रोड, मॉ. गंगा नगर, शिव मंदिरामागे, खरगोन, मध्यप्रदेश.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : गोपाल मनोहर खेते
**पत्ता :-** रा. शिवाजी नगर, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत गोपाल मनोहर खेते यांचे दि. २८/०८/२०२४ रोजी विघ्नहर्ता हॉस्पिटल, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १९/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

---

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या लाभार्थ्यांना आवाहन; भूलथापांना बळी पडू नये

**अकोला :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना ३१ डिसेंबर २०२५ पूर्वी ई-केवायसी करणे आवश्यक होते. ज्या लाभार्थ्यांनी निर्धारित मुदतीत ई-केवायसी पूर्ण केलेली नाही, त्यांचे योजनेअंतर्गत मिळणारे लाभ बंद करण्यात आले आहेत.

ई-केवायसी संदर्भात शासनाकडून किंवा महिला व बाल विकास विभागाकडून कोणतेही नवीन निर्देश अथवा अद्ययावत माहिती प्राप्त झाल्यास ती अधिकृत माध्यमांद्वारे तसेच वर्तमानपत्रांद्वारे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येईल. मात्र, काही व्यक्ती लाभार्थी महिलांना चुकीची व दिशाभूल करणारी माहिती देत आहेत. ङ्ग'३०० रुपये भरून ऑनलाइन तक्रार दाखल करावी लागते, ती तक्रार मंत्रालयात पाठविली जाते व त्यानंतर लाभ पुन्हा सुरू होतात'ङ्ख अशा प्रकारच्या खोट्या आश्वासनांद्वारे महिलांची आर्थिक फसवणूक केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे लाभार्थी महिलांनी अशा कोणत्याही अफवा, भूलथापा किंवा अनधिकृत व्यक्तींच्या सांगण्यावर विश्वास ठेवू नये. कोणालाही पैसे देऊ नयेत तसेच आपली आर्थिक फसवणूक होणार नाही याची काळजी घ्यावी. लाभार्थ्यांनी केवळ शासनाच्या अधिकृत सूचनांवरच विश्वास ठेवावा व कोणतीही शंका असल्यास संबंधित महिला व बाल विकास विभागाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

---

# सिंदखेड मोरेश्वर येथील हातभट्टी उद्ध्वस्त

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; तीन जणांविरुद्ध दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात सुरू असलेल्या 'ऑपरेशन प्रहार' मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेने बार्शीटाकळी तालुक्यातील सिंदखेड मोरेश्वर शिवारात मोठी कारवाई करत अवैधरित्या सुरू असलेला गावठी हातभट्टी दारू निर्मितीचा अड्डा उद्ध्वस्त केला. या कारवाईत तब्बल २ लाख १ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून नष्ट करण्यात आला, तर तीन आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली अकोला पोलीस दलाने अवैध व्यवसायांविरोधात विशेष मोहीम सुरू केली असून, त्याअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला सिंदखेड मोरेश्वर परिसरात हातभट्टी दारू तयार केली जात असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. या माहितीची खातरजमा केल्यानंतर पथकाने शनिवारी सकाळी संबंधित ठिकाणी छापा टाकला. छाप्यामध्ये तीन जण प्रत्यक्ष हातभट्टी दारू गाळताना आढळून आले. यामध्ये संजय हरिलाल केवट (३५, रा. कापसी), रमेश पंचु केवट (६०, रा. कापसी) आणि भिमराव दशरथ वानखडे (५२, रा. सिंदखेड मोरेश्वर) यांचा समावेश आहे. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करताच मोठ्या प्रमाणावर मोहमाचा सडवा, तयार गावठी दारू तसेच दारू निर्मितीसाठी वापरले जाणारे साहित्य आढळून आले.



### १, २४५ लिटर मोहमाचा सडवा जप्त

कारवाईदरम्यान पोलिसांनी टिन पत्र्याच्या ८३ डब्यांमध्ये साठवून ठेवलेला सुमारे १,२४५ लिटर मोहमाचा सडवा जप्त केला. या सडव्याची किंमत अंदाजे १ लाख ८६ हजार ७५० रुपये असल्याचे सांगण्यात आले. याशिवाय ५५ लिटर गावठी हातभट्टी दारू, चार मोठ्या प्लास्टिक टाक्या आणि इतर साहित्यही जप्त करण्यात आले. पंचांसमक्ष आवश्यक नमुने (सीए सॅम्पल) घेण्यात आल्यानंतर उर्वरित अवैध दारू, सडवा आणि साहित्य घटनास्थळीच नष्ट करण्यात आले. त्यामुळे परिसरात सुरू असलेला हा अवैध व्यवसाय पूर्णपणे उद्ध्वस्त करण्यात पोलिसांना यश आले.

---

### या अधिकाऱ्यांनी बजावली महत्त्वाची भूमिका

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक आणि अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शंकर शेळके, पोलीस उपनिरीक्षक विष्णू बोडखे, जीपीएसआय बोरकर, पोलीस हवालदार पठाण, पोलीस शिपाई स्वप्निल खेडकर, अन्सार, सतीश तसेच चालक पोलीस शिपाई मनीष यांनी या कारवाईत सहभाग घेतला. पोलीस विभागाच्या म्हणण्यानुसार, जिल्ह्यातील अवैध धंदे, गुन्हेगारी आणि समाजविघातक प्रवृत्तींविरोधातील मोहिम आगामी काळात आणखी तीव्र करण्यात येणार असून, कायदा मोडणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाईचा बडगा कायम राहणार आहे.

# मतदारयाद्यांच्या एसआयआर मॅपिंग प्रक्रियेत नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग नोंदवावा - आ. सुलभा खोडके यांचे आवाहन

**अमरावती/प्रतिनिधी:-** भारतीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार यादीचा विशेष सखोल पुनर्निरीक्षण कार्यक्रम (एसआयआर ) अंतर्गत अमरावती मध्ये वर्ष २००२ च्या मतदार यादी सोबत सद्याची वर्ष २०२४ च्या मतदार यादीची पडताळणी करून मॅपिंग करण्यात येत आहे. या मोहिमेत मतदार केंद्रस्तरीय अधिकारी ( बीएलओ ) मार्फत घरोघरी जाऊन अथवा ऑनलाईन पद्धतीने मतदारांची प्रत्यक्ष पडताळणी करण्यात येत आहे. अमरावती विधानसभा मतदार संघात जास्तीत जास्त एसआयआर मॅपिंग प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी नागरिकांनी संबंधित बीएलओंना भेटून स्वयंस्फूर्तीने सहभाग नोंदवावा. असे आवाहन अमरावतीच्या आमदार सुलभा खोडके यांनी केले आहे.

सद्यास्थितीत झपाट्याने झालेल्या शहरीकरणामुळे लोकसंख्येचे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर झाले. अनेक मतदारांनी नवीन ठिकाणी नाव नोंदवले, पण जुन्या ठिकाणचे नाव वगळले नाही. परिणामी मतदारयाद्यांमध्ये दुबार नावे वाढली असण्याची शक्यता असल्याने ही पडताळणी केली जात आहे. (३८)-अमरावती विधानसभा मतदार संघात मतदारांचे जास्तीत जास्त मॅपिंग करण्याकरिता ३२२ बीएलओ कार्यरत असून त्यांच्या कडून सदरचे काम पूर्ण करून घेण्यासाठी ३१ बीएलओ पर्यवेक्षक नेमण्यात आले आहे. अमरावती मध्ये निवडणूक विभागाकडून मतदार यादीच्या पडताळणीचे काम जवळपास ७१ टक्के झाले. अद्यापही २४ टक्के मतदारांचे मॅपिंग होणे बाकी आहे.



त्यामुळे ज्या मतदारांचे मॅपिंग झालेले नाही, त्यांनी तातडीने आपल्या भागातील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ ) यांच्याशी संपर्क साधावा. ज्या मतदारांचे बीएलओंकडून मॅपिंग पूर्ण झाले आहे, त्यांची 'एसआयआर' प्रक्रिया अत्यंत सोप्या आणि सुरळीत पद्धतीने पार पडणार आहे. तसेच मतदाराचे नाव २००२ च्या मतदार यादीत नसेल तर त्याचे आई-वडील, आजी-आजोबा यांचे नाव ECINET ॲप द्वारे शोधून यांचे २००२ मधील मतदार संघ क्रमांक, मतदान केंद्र क्रमांक व अनुक्रमांक असा हा तपशील तपासून मॅपिंग प्रक्रिया पूर्ण करण्यात येत आहे.

मात्र, ज्यांचे मॅपिंग झालेले नसेल, अशा मतदारांना या प्रक्रियेदरम्यान त्यांच्या जन्मतारखेच्या पुराव्यासाठी वेगवेगळी कागदपत्रे सादर करावी लागतील. हा त्रास टाळण्यासाठी मतदारांनी स्वतःहून पुढाकार घेणे गरजेचे आहे.

अनेक मतदारांची नावे मतदारयादीत दोन ठिकाणी असण्याची शक्यता असते. अशा मतदारांनी सध्या ते जेथे वास्तव्यास आहेत किंवा ज्या ठिकाणी त्यांना मतदानाचा हक्क हवा आहे, तेथील नाव कायम ठेवावे. तर दुसऱ्या ठिकाणचे नाव कमी करण्यासाठी मतदार नोंदणी अधिकारी किंवा संबंधित बीएलओंकडे 'नमुना अर्ज क्र.७ ' सादर करावा, गृहभेटी देणाऱ्या बीएलओना सहकार्य करून एसआयआर मॅपिंग मोहिमेत स्वयंस्फूर्तीने सहभागी होण्याचे आवाहन आमदार सुलभा खोडके यांनी केले आहे.

मतदाराचे एकच ओळखपत्र असणे व त्याने एकाच मतदान केंद्रात नियमानुसार मतदान करणे अभिप्रेत आहे. मतदान प्रक्रियेत सुलभता आणि अचूकता आणण्यासाठी नागरिकांनी आपल्या बीएलओंची भेट घेऊन मॅपिंग प्रक्रिया पूर्ण करावी. तसेच दुबार नावांच्या सुधारणेसाठी सहकार्य करावे, या संदर्भात काही अडचणी असल्यास अमरावती विधानसभा मतदार संघातील मतदार नोंदणी अधिकारी, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तसेच बीएलओ पर्यवेक्षक अथवा मतदार केंद्रस्तरीय अधिकारी किंवा हेल्पलाईन नंबर ८३०८०८००८८, ७३८७२६६९७०, ७४१०७७०६३५ ,७३८५२१५३९५, ९९७५२०५२००, या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# विद्यापीठ कंत्राटी भरती प्रक्रियेवर संशय

## -युवक काँग्रेसचा तीव्र विरोध

**अमरावती/प्रतिनिधी:-** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठासाठी मनुष्यबळ पुरवठ्याचे कंत्राट असलेल्या ग्रेट शेरलॉक कंपनीतर्फे शनिवारी स्थानिक रामगिरी हॉटेल येथे विविध पदांसाठी मुलाखती आयोजित करण्यात आल्या होत्या. या प्रक्रियेदरम्यान उमेदवारांकडून नोकरी देण्याच्या मोबदल्यात प्रत्येकी दहा हजार रुपये मागितले जात असल्याची माहिती शहर युवक काँग्रेसला मिळाली. त्याची दखल घेत पदाधिकाऱ्यांनी मुलाखतस्थळी धाव घेत संबंधितांकडे विचारणा केली. यावेळी उपस्थित उमेदवारांनी पण पैशांची मागणी झाल्याचा आरोप केल्याचे युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.



या संदर्भात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्यात आला असता, त्यांनी सदर भरती प्रक्रिया ही कंत्राटदार कंपनीमार्फत राबविण्यात येत असल्याचे सांगत या प्रकरणाबाबत अनभिज्ञता दर्शविली. मात्र भरती प्रक्रियेतील संशयास्पद बाबी लक्षात घेता युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी या प्रकरणाचा तीव्र निषेध नोंदवून पारदर्शक चौकशीची मागणी केली. घटनेची माहिती मिळताच मोठा पोलिस बंदोबस्त घटनास्थळी आला. यावेळी युवक काँग्रेसचे माजी प्रदेश सचिव समीर जवंजाळ, अमरावती विधानसभा युवक काँग्रेस अध्यक्ष वैभव देशमुख, एनएसयूआय शहराध्यक्ष संकेत साहू, आकाश गेडाम, शुभम बांबल यांच्यासह विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. प्रशांत विघे व अमोल देशमुख उपस्थित होते. युवक काँग्रेसने या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली असून, पारदर्शक आणि गुणवत्ताधारित भरती प्रक्रिया राबविण्याची आवश्यकता व्यक्त केली आहे. या संदर्भात कंपनीच्या अधिकाऱ्यांनी रिक्रुटमेंट व कन्सल्टन्सी शुल्क घेत असल्याचे सांगून गैरप्रकाराचा आरोप फेटाळला.

# अखेर सुधाकर भारसाकळे शिवसेनेत

## -अनेक पदाधिकाऱ्यांचाही प्रवेश -काँग्रेसला दर्यापूर तालुक्यात खिंडार

**दर्यापूर/प्रतिनिधी:-** काँग्रेसचे दर्यापुरातील महत्त्वाचे नेते आणि तालुका काँग्रेस अध्यक्ष सुधाकर भारसाकळे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. सुधाकर भारसाकळे यांच्या पक्ष प्रवेशाने दर्यापूरसह मतदार संघातील राजकारण बदलणार असल्याने खळबळ उडाली आहे. त्यांच्यासह काँग्रेसच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेत प्रवेश घेतला.

दर्यापूर तालुक्यातील काँग्रेसशी संबंधित अनेक माजी व विद्यमान पदाधिकारी, सहकारी संस्थांचे संचालक तसेच विविध सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना एकनाथ शिंदे गटामध्ये जाहीर प्रवेश केला. या पक्षप्रवेशामुळे दर्यापूरच्या राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली असून शिवसेनेची तालुक्यातील संघटनात्मक ताकद वाढल्याचे मानले जात आहे.

प्रवेश करणाऱ्यांमध्ये माजी काँग्रेस पदाधिकारी, कृषी उत्पन्न बाजार समिती, खरेदी-विक्री संघ, विविध सहकारी संस्थांचे संचालक, युवक काँग्रेसचे पदाधिकारी तसेच अल्पसंख्याक काँग्रेसशी संबंधित कार्यकर्त्यांचा समावेश आहे. प्रमुख प्रवेशकर्त्यांमध्ये सुधाकर भारसाकळे, दिलीप चव्हाण, गजानन जाधव, प्रभाकर कोरपे, राजू कराळे, गजानन देवतळे, साहेबराव भदे, राजेश खेडकर, राजेश राठी, अनिल भारसाकळे, मधुसूदन पाचे, संजय चांदूरकर, कैलास घडते, अमोल घमाळे,



भैय्यासाहेब टेकाडे, संतोष भोंडे, रफीकउद्दीन सय्यद, जमीर खान पठाण, अमोल जाधव, सुरेश मानकर, नितीन लोडम, उमेशर साबळे, सतीश भारसाकळे, राधेश्याम भारसाकळे, युवराज तायडे, अक्षय भारसाकळे, राज पाटील, पवन पाचपोरे, कपिल पोटे, इमरान खान पठाण आणि सुधाकर खारोळे यांचा समावेश आहे.या घडामोडीमुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका तसेच तालुक्यातील राजकीय समीकरणांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून दर्यापूरमधील राजकीय वातावरण अधिकच तापण्याची चिन्हे दिसत आहेत.

# मनुष्याने चारित्र्य सांभाळून नेहमी सदाचारी व निर्व्यसनी जगावे : प्रमोद पोकळे

## -सुसंस्कार शिबिरात भगवान बुद्धांच्या चरित्रावर प्रबोधन

**अमरावती/प्रतिनिधी:-** अखिल मानवजातीला प्रज्ञा, शील आणि करुणेचा संदेश देऊन जगातील दुःख निवृत्तीचा व विश्वशांतिचा मार्ग सांगणाऱ्या भगवान गौतम बुद्धांनी राजमहाल व वैभव-ऐश्वर्याचा त्याग केला आणि कठोर साधनेतून बुद्धत्व प्राप्त करून आपल्या पहिल्यावहिल्या प्रवचनात जे पंचशील सांगितले ते जगातील सर्व धर्म, पंथ, संप्रदायाचे मूळ तत्त्व व सार आहे. चोरी करणे, खोटे बोलणे, हिंसा करणे, व्यभिचार करणे व मादक द्रव्ये प्राशन करणे हे पाप असून याला जगातील कोणताही धर्म मान्यता देत नाही. त्यामुळे मनुष्याने चारित्र्य व नीतिमत्ता सांभाळून नेहमी सदाचारी व निर्व्यसनी जीवन जगण्याचा प्रयत्न करावा, असे प्रतिपादन दूरदर्शन व आकाशवाणी लोक-कलावंत प्रमोद पोकळे गुरुजी यांनी केले.



श्रीगुरुदेव राष्ट्रधर्म प्रचार समितीच्या अभ्यासक्रमानुसार राष्ट्रधर्म युवा मंच द्वारा पार्वती नगर-३ येथील संकटमोचन हनुमान मंदिराचे भव्य प्रांगणात आयोजित सर्वांगीण बाल-सुसंस्कार शिबिरास भेट दिली असता 'ओळख सुंदर जीवनाची' या विषयावर ते बोलत होते.

पुढे बोलताना पोकळे गुरुजी म्हणाले की, या शिबिरातून निर्माण होणारी व्यसनमुक्त व चारित्र्यवान भावी पिढीच उज्ज्वल भारताचे स्वप्न साकार करू शकते. याप्रसंगी शिबिराचे आयोजन श्रीकृष्ण बैलमारे, श्याम सनके, प्रा. अंकुश मानकर, शुभम् झाडे, विजय जयसिंगपुरे, रूपेश मोरे, कुणाल खडसे, तेजस गोथरकर, सौरभ खेतखेडे, मृणाल बैलमारे, श्रृती सनके, प्रवीण शेगोकार, विनय खेडकर, सीताराम भेलकर, बाबुराव उभाळ आदी मंडळी उपस्थित होती. यावेळी आयोजन समितीच्या वतीने प्रमोद पोकळे गुरुजी यांचा सत्कार करण्यात आला.

संपूर्ण लोक-सहभागावर चालणाऱ्या या सर्वांगीण सुसंस्कार शिबिरात आदर्श दिनचर्येत संत महापुरुषांचे चरित्र-दर्शन, सामुदायिक ध्यान, सूर्य-नमस्कार, योगासने, प्राणायाम, लाठीकाठी, कराटे, लेझिम, सामुदायिक सायं-प्रार्थना, व्यक्तित्व विकास, स्वावलंबन, राष्ट्रभक्ती, विविध विषयांवर बौद्धिके तसेच भजन-गायन व विविध मनोरंजक मैदानी खेळ आदींचे मार्गदर्शन सेवाभावी शिक्षकांकडून दिले जात आहे.

# कौंडिण्यपुर येथे इस्कॉन तर्फे एक लाखाहून अधिक भक्तांना महाप्रसाद वितरणाचा संकल्प

**कौंडिण्यपुर/प्रतिनिधी:-** विदर्भाचे वृंदावन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री धाम कौंडिण्यपुर येथे इस्कॉनचे संस्थापक आचार्य परमपूज्य ए. सी. भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद यांचे वरिष्ठ शिष्य, त्रिदंडी संन्यासी परमपूज्य श्रील लोकनाथ स्वामी महाराज यांच्या प्रेरणेने श्री श्री रुक्मिणी द्वारकानाथ मंदिर, इस्कॉन कौंडिण्यपुर यांच्या वतीने अधिक मासाच्या पावन पर्वानिमित्त एक लाखाहून अधिक भक्तांना महाप्रसाद वितरण करण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

दिनांक १७ मे ते १५ जून या कालावधीत दररोज श्री धाम कौंडिण्यपुर येथे येणाऱ्या सर्व श्रद्धाळू भक्तांसाठी यजमानांच्या माध्यमातून अखंड महाप्रसाद वितरण सेवा सुरू आहे.



या महाप्रसाद सेवेचे यजमान म्हणून राजेंद्र हरिकिसनजी सरडा, रोहिणी सुनील काशिकर (नागपूर), सुरेश अग्रवाल (आर्वी), चेतन अग्रवाल (नागपूर), अक्षय अग्रवाल (अमरावती), पारेश वर्मा (मालेगाव), माणिकराव लोखंडे (आर्वी) तसेच ॲड. आनंद पारचोरे (नागपूर) यांनी विविध दिवशी सेवा अर्पण केली असून त्यांच्या वतीने भक्तांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले.

दररोज पहाटे ४.३० वाजता श्री श्री रुक्मिणी द्वारकानाथ आणि श्री गोवर्धन (गिरिराज) भगवान यांच्या शुभ मंगल आरतीने कार्यक्रमाची सुरुवात होते. त्यानंतर 'हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे । हरे राम हरे राम राम राम हरे हरे ?' या महामंत्राचा सामूहिक जप भक्तगणांकडून केला जातो. सकाळी ७.३० वाजता दर्शन आरती आणि इस्कॉन संस्थापक आचार्य श्रील प्रभुपाद यांची गुरुपूजा संपन्न होते. त्यानंतर यजमानांच्या हस्ते श्री सत्यनारायण भगवानाची पूजा व कथा आयोजित करण्यात येते.

सकाळी ११ वाजता भव्य महाआरती झाल्यानंतर अधिक मासानिमित्त श्री धाम कौंडिण्यपुर येथे येणाऱ्या सर्व भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात येते. या आध्यात्मिक उपक्रमाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून दररोज हजारो भक्त या सेवेचा लाभ घेत आहेत.

गेल्या पंधरा दिवसांपासून श्री धाम कौंडिण्यपुर येथे हजारो भक्त मोठ्या श्रद्धेने एकत्र येत असून पवित्र स्नान, जप, तप, भगवानांचे दर्शन आणि महाप्रसादाचा लाभ घेत आहेत. दररोज हजारो भाविकांच्या उपस्थितीमुळे संपूर्ण धाम भक्तिमय वातावरणाने भारावून गेले आहे.

येत्या पंधरा दिवसांमध्येही हा पवित्र उत्सव सुरू राहणार असून सर्व भाविकांनी या दुर्मीळ आध्यात्मिक संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन इस्कॉन कौंडिण्यपुर मंदिराचे अध्यक्ष परमपूज्य अक्रूर प्रभुजी यांनी केले आहे.

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

**चौकशीची जाहीर नोटीस**

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 278/2026 कलम २२
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री.जनकल्याण सेवा संस्था, अमरावती, ता.जि.अमरावती**
**एफ-१२७७३/अमरावती**
बाबत अर्जदार - **गोविंद जनार्दन जोग, रा.हेडगेवार हॉस्पीटल, अमरावती**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९/२२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--
(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत (वर्णन)** - निरंक
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - अमरावती शहर येथील नझुल शिट नं.६५, प्लॉट नं.५/१, एकुण क्षेत्रफळ २७,५५२.९० चौ.मीटर पैकी ६६९ चौ.मीटर जागा, ह्याचा प्लॉट नं.५/१-ब, त्यावर असलेल्या बांधकामासहीत, ज्याची चतुःसिमा--
पुर्वेस - आदित्य अपार्टमेंट व त्यामागे रेल्वे लाईन
पश्चिमेस - अमरावती-बडनेरा रस्ता
उत्तरेस - प्लॉट नं.५/१-अ
दक्षिणेस - श्री.पाटील यांचे घर

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२४.०४.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २६३**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# शिवसेना स्थापनेच्या ६० वर्षपूर्तीनिमित्त तिवसा तालुका मेळावा

**कुऱ्हा /प्रतिनिधी:-** हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी जयंती वर्षानिमित्त तसेच शिवसेना स्थापनेची तब्बल ६० वर्षे पूर्ण होत असल्याच्या औचित्याने तिवसा तालुक्यात भव्य शिवसेना मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात तालुक्यातील सर्व आजी-माजी पदाधिकारी, शिवसैनिक, शाखाप्रमुख, महिला आघाडी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, युवासेना कार्यकर्ते तसेच ज्येष्ठ शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून कार्यक्रमाबाबत तालुक्यात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.



हा मेळावा मंगळवार दिनांक २ जून २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता श्रीजीत मंगल कार्यालय, बस स्टँड मागे, तिवसा येथे आयोजित करण्यात आला आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खासदार तथा शिवसेनेचे ज्येष्ठ मार्गदर्शक अनंत गुडे हे राहणार आहेत. कार्यक्रमाचे उद्‌घाटक म्हणून शिवसेना उपनेते तथा सहसंपर्कप्रमुख नागपूर सुधीर सूर्यवंशी उपस्थित राहतील. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून शिवसेना जिल्हाप्रमुख अमरावती पराग गुडदे हे कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. याशिवाय कार्यक्रमात माजी विभागीय महिला संपर्कप्रमुख आशावरी देशमुख, माजी जिल्हाप्रमुख तथा माजी नगरसेवक प्रदीप बाजड, उपजिल्हाप्रमुख राजेश बंड, तिवसा विधानसभा संघटक विलासराव माहुरे, महिला पतसंस्था अध्यक्षा मंदा श्रीखंडे, बेबी तायडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती जयकांत माहुरे, संचालक राजेंद्र मढवे, विनोद ढोणे यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

**जाहिर सुचना**

**श्री विठ्ठल रुख्माई संस्थान, सोनोरा (बु), ता. चांदुर रेल्वे, जि. अमरावती. रजि.नं. ए-१२३३/ अमरावती** यांच्या मालकीचे व ताब्यात असलेले खालील वर्णन केलेली स्थावर मिळकत (शेत जमिन) विक्री करणे आहे. तरी इच्छुक व्यक्तींनी आपली निविदा खालील दिलेल्या पत्त्यावर पाठवावी. मिळकतीचे वर्णन नोंदणी पोट तुकडी चांदुर रेल्वे ग्रामीण कचेरीच्या कक्षेतील, ग्रामपंचायत बासलापुर, पंचायत समिती, चांदुर रेल्वे व जिल्हा परिषद, अमरावतीच्या हद्दीतील मौजे- तरोडा येथील शेत सर्व्हे नं. / गट नं. ९९, आकार रु.पै.३.२५, भोगवटदार वर्ग-१ असुन याचे एकुण क्षेत्रफळ १ हे. २० आर. याची चर्तुः सिमा खालील प्रमाणे.

**पुर्वेस :** मधुकर दांडेकर यांचे शेत **पश्चिमेस :** संदीप गिराशे यांचे शेत
**उत्तरेस :** मालखेडे यांचे शेत **दक्षिणेस :**सरकारी रस्ता

**अटी व शर्ती**

**१.** सदर प्रकाशन प्रकाशीत झाल्यापासून १५ दिवसांच्या आत निविदा न्यासाकडे पाठवावी.
**२.** आलेल्या सर्व निविदा दि.२०/०६/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानच्या ठिकाणी उघडण्यात येतील.
**३.** आलेल्या निविदांपैकी सर्वोच्च बोली असलेली निविदा निवडण्यात येईल.
**४.** निवडण्यात आलेल्या निविदाधारकास दि. २०/०६/२०२६ पासून ८ दिवसांच्या आत इसारापोटी रु.५१,०००/- (रुपये एक्कावन्न हजार फक्त) रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट/धनादेश संस्थेच्या नावाने द्यावा लागेल व इसारचिठ्ठी करुन घ्यावी लागेल.
**५.** वरिल संपुर्ण व्यवहार हा वि. सह धर्मदाय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांच्या परवानगीला अधीन राहूनच केल्या जाईल.
**६.** वि. सह धर्मदाय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांची परवानगी मिळे पर्यत निविदाधारकाने दिलेली इसाराची रक्कम न्यासाकडे बिनव्याजी जमा राहील.
**७.** वि. सह धर्मदाय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांनी कोणत्याही कारणास्तव परवानगी नाकारली असता निविदा धारकाची न्यासाकडे जमा असलेली इसाराची रक्कम निविदाधारकास बिनव्याजी परत करण्यात येईल.
तरी वरील अटी व शर्ती लक्षात घेऊन इच्छुक व्यक्तींनी निविदा पाठवाव्या.
**दिनांक :- ३१/०५/२०२६**
**स्थळ :- चांदुर रेल्वे**

**अध्यक्ष श्री विठ्ठल रुख्माई संस्थान,**
**सोनोरा (बु.), ता.चांदुर रेल्वे, जि. अमरावती**

**निविदा पाठविण्यासाठी पत्ता :- श्री विठ्ठल रुख्माई संस्थान, सोनोरा (बु.), ता.चांदुर रेल्वे, जि. अमरावती. मो.क्र. ८०८०४६००२९**

# विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती



**अमरावती/प्रतिनिधी:-** स्थानिक विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात ( सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल) अमरावती येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. विशेष म्हणजे, रुग्णालयातील महिला कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे पुढाकार घेत या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

याप्रसंगी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. दिव्यांनी मुंदाने होत्या, तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. माधुरी गाडेकर उपस्थित होत्या. उपस्थित मान्यवरांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या लोककल्याणकारी कार्यास अभिवादन केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व अध्यक्ष यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे विचार आणि कार्य आपल्या भाषणातून अधोरेखित केले.

उन्हाळ्याचे दिवस आणि रुग्णांची गरज लक्षात घेता, रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे यांनी जयंतीनिमित्त रुग्णालयात एक लोकोपयोगी उपक्रम राबवण्याची संकल्पना मांडली होती. त्यांच्या या संकल्पनेला रुग्णालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला. सर्व कर्मचाऱ्यांनी एकत्र येत, स्वतःहून निधी गोळा करून रुग्णालयाला एक 'वॉटर कुलर' भेट दिला. यामुळे रुग्णालयात येणारे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांसाठी थंड पिण्याच्या पाण्याची सोय झाली आहे.

महिलांनी केलेले उत्कृष्ट नियोजन आणि कर्मचाऱ्यांच्या सामूहिक दातृत्वामुळे या जयंती महोत्सवाचे सर्वत्र कौतुक होत आहे. कार्यक्रमाला रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका, प्रशासकीय कर्मचारी व चतुर्थश्रेणी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**पाहिजेत**

हजरत ख्वाजा गरीब नवाज एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटी, अचलपूर द्वारा संचालित

**गरीब नवाज उर्दू पुर्व माध्यमिक शाळा, बिलनपूरा, अचलपूर शहर**

ता. अचलपूर, जि. अमरावती
(अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त १०० टक्के अनुदानित शाळा)

प्राथमिक शिक्षण सेवकाचे १ पद उर्दू माध्यमातून व अंशतः अनुदान तत्वावरील सहा. शिक्षक १ पद उर्दू माध्यमातून शिकविण्याकरीता भरावयाचे आहे.

तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | पदाचे नांव | पद संख्या | शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता | संवर्ग | शिकविण्याचे माध्यम | मानधन /वेतन शासनाच्या नियमानुसार | शाळेचा प्रकार | पद रिक्त कारण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | शिक्षण सेवक वर्ग १ ते ५ करीता टी.ई.टी. किंवा सीटीईटी पास पेपर १ | ०१ | एच.एस.सी. डी.एड्. | खुला | उर्दू | शासकीय नियमानुसार | अनुदानित | सेवानिवृत्त झाल्या मुळे |
| २ | उर्दू प्राथमिक सहा. शिक्षक वर्ग ६ ते ७ करिता अंशतः अनुदान ६० टक्के तत्वावरील टी.ई.टी. किंवा सीटीईटी पास पेपर २ | ०१ | एच.एस.सी. डी.एड्. व बी.ए. बी.एड् . | खुला | उर्दू | शासकीय नियमानुसार | अनुदानित | सेवानिवृत्त झाल्या मुळे |

इच्छुक उमेदवारांनी दिनांक १६/०६/२०२६ रोजी शैक्षणिक अर्हताप्रमाणे सर्व कागदपत्र व मुळ प्रमाणपत्र व झेरॉक्स प्रमाणपत्रांसह शाळेचे कार्यालयात गरीब नवाज उर्दु पूर्व माध्यमिक शाळा, बिलनपूरा, अचलपूर शहर, जि. अमरावती या कार्यालयात स्वखर्चाने सकाळी १२.०० ते संध्याकाळी ५.०० वाजे पर्यंत मुलाखतीकरीता उपस्थित राहावे.

**प्रभारी मुख्याध्यापिका**
गरीब नवाज उर्दू पूर्व माध्यमिक शाळा
बिलनपूरा, अचलपूर शहर. जि. अमरावती

**अध्यक्ष**
गरीब नवाज उर्दू पूर्व माध्यमिक शाळा,
बिलनपूरा, अवलपूर शहर, जि. अमरावता

# बँकेत पैसा नाही? मग जनतेने दामाजीकडे जावे ?

## कानगावच्या बँक ऑफ इंडियात 'कॅश संपली'

## शेतकरी, व्यापारी आणि खातेदार संतप्त



**मोझरी (शेकापूर)/ जनमाध्यम**

राष्ट्रीयीकृत बँकेच्या शाखेतच रोख रक्कम उपलब्ध नसल्याचा धक्कादायक प्रकार कानगाव येथे समोर आला आहे. बँक ऑफ इंडियाच्या शाखेत 'कॅश नाही' असा फलक लावण्यात आल्याने शेकडो खातेदारांना रिकाम्या हाताने परत जावे लागले. या घटनेमुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली असून बँकेच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

कानगाव परिसरातील ३५ ते ४० गावांतील शेतकरी, मजूर, महिला बचत गट आणि लहान व्यापारी या शाखेवर अवलंबून आहेत. शनिवारी आठवडी बाजार असल्याने मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार होतात. त्यातच खरीप हंगामाची तयारी, बियाणे-खते खरेदी तसेच विद्यार्थ्यांच्या प्रवेशप्रक्रियेसाठी अनेक जण पैसे काढण्यासाठी बँकेत पोहोचले होते.

मात्र, मोठ्या रकमेची मागणी करणाऱ्या ग्राहकांना केवळ हजार-दोन हजार रुपयेच देण्यात येत असल्याची माहिती समोर आली. 'कॅश नाही' असे सांगून ग्राहकांना परत पाठविण्यात आल्याने जनतेत तीव्र नाराजी पसरली. खातेदारांनी विश्वासाने जमा केलेले पैसे नेमके कुठे गेले, असा सवाल उपस्थित केला जात आहे. विशेष म्हणजे ही परिस्थिती मागील दोन-तीन दिवसांपासून असल्याचेही काही नागरिकांनी सांगितले. रोख रकमेअभावी किराणा खरेदी करावी की शेतमजुरांची मजुरी द्यावी, असा पेच अनेक कुटुंबांसमोर निर्माण झाला आहे. या प्रकाराची वरिष्ठ बँक अधिकाऱ्यांनी तातडीने दखल घेऊन कारणांची चौकशी करावी व ग्राहकांना दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

# सेवाग्राम स्थानकावर 'इंटरलॉकिंग'चा प्रभाव; अनेक रेल्वेगाड्या रद्द



## ३० मे ते ६ जूनदरम्यान विशेष ब्लॉक

## प्रवाशांना प्रवासापूर्वी गाडीची स्थिती तपासण्याचे आवाहन

**वर्धा/ जनमाध्यम**

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागांतर्गत नागपूर-सेवाग्राम मार्गावर तिसरी व चौथी रेल्वेलाइन टाकण्याच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासह सेवाग्राम स्थानकावर इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग (ईआय) प्रणाली बसविणे आणि यार्ड रिमॉडेलिंगचे काम वेगाने सुरू आहे. या कामांसाठी ३० मे ते ६ जूनदरम्यान विशेष ट्रॅफिक व पॉवर ब्लॉक घेण्यात येत असल्याने अनेक प्रवासी रेल्वेगाड्यांच्या वाहतुकीवर परिणाम होणार आहे.

रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, ६ जून रोजी वर्धा-नागपूर मेमू, नागपूर-वर्धा मेमू, अमरावती-अजनी एक्स्प्रेस आणि अजनी-अमरावती एक्स्प्रेस पूर्णपणे रद्द राहणार आहेत. तसेच हावडा-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस एक्स्प्रेस आणि नागपूर-वर्धा मेमू या गाड्यांचा सेवाग्राम स्थानकावरील थांबा ३० मे ते ६ जूनदरम्यान तात्पुरता रद्द करण्यात आला आहे. दरम्यान, नागपूर स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्रमांक २ बंद असल्याने कोचिंग ऑपरेशनवरील निर्बंधांची मुदत ५२ दिवसांवरून ६१ दिवसांपर्यंत वाढविण्यात आली आहे. त्यामुळे ३० मे ते ७ जून या कालावधीत रेल्वे वाहतूक प्रभावित राहणार असून प्रवाशांना अतिरिक्त गैरसोयीचा सामना करावा लागू शकतो. गाड्यांचे शॉर्ट टर्मिनेशन व शॉर्ट ओरिजिनेशन करण्यात आले आहे. नागपूर-मडगाव एक्स्प्रेस ३० मे ते ६ जूनदरम्यान नागपूरऐवजी अजनी स्थानकावरच समाप्त होईल, तर मडगाव-नागपूर एक्स्प्रेस ३१ मे ते ७ जूनदरम्यान अजनी स्थानकावरूनच सुटणार आहे. प्रवासाचे नियोजन करण्यापूर्वी संबंधित रेल्वेगाडीची सद्यस्थिती तपासूनच प्रवास करावा, असे आवाहन मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने केले आहे. तसेच या कामांमुळे होणाऱ्या गैरसोयीबद्दल रेल्वे प्रशासनाने खेद व्यक्त केला आहे.

# गुन्हेगारी वार्ता

## डोक्यावर दांडक्याचा प्रहार

**वर्धा -** जुन्या वादातून एका मजुरावर दांडक्याने हल्ला करून गंभीर जखमी केल्याची घटना शहरातील विरांगना राणी दुर्गावती नगर परिसरात घडली. या प्रकरणी शहर पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. छगन वलके हे टपाल विभागात मजूर म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या शेजारी राहणाऱ्या शौर्य उर्फ जग्गू सडमाके याच्याशी काही दिवसांपूर्वी वाद झाला होता. त्याच कारणावरून पुन्हा दोघांमध्ये शाब्दिक बाचाबाची झाली. वाद वाढल्यानंतर शौर्यने दांडक्याने छगन यांच्या डोक्यावर प्रहार केल्याचे सांगण्यात आले. यात ते गंभीर जखमी झाले. जखमी छगन यांना प्रथम जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी त्यांना सेवाग्राम रुग्णालयात हलविण्यात आले. घटनेची माहिती मिळताच शहर पोलिसांनी तपास सुरू केला. या प्रकरणी आरोपी शौर्य सडमाके याच्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## उड्डाणपुलाखाली अनोळखी व्यक्तीचा मृतदेह

**वर्धा -** तळेगाव (श्या.पं.) परिसरातील उड्डाणपुलाखाली सर्व्हिस रोडलगत एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली. मृत व्यक्तीचे वय सुमारे ४० वर्षे असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक शाम सोनपरोते यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. पाहणीदरम्यान पुलाखाली एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. प्राथमिक तपासात संबंधित व्यक्तीचा मृत्यू उष्माघातामुळे झाला असावा, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह पुढील प्रक्रियेसाठी पाठविला. मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नसून त्याबाबत तपास सुरू आहे. या घटनेची नोंद तळेगाव (श्या.पं.) पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## विधीसंघर्षित बालकाकडून गांजा जप्त

**वर्धा -** अमली पदार्थविरोधी मोहिमेदरम्यान हिंगणघाट पोलिसांनी एका विधीसंघर्षित बालकाच्या ताब्यातून गांजा जप्त करून त्याला ताब्यात घेतले. या कारवाईत गांजा व मोबाईलसह एकूण २१ हजार २७२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. हिंगणघाट ते येनोरा रोडवरील जीआर दालमिल परिसरात एक बालक अवैधरित्या गांजा बाळगत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी तत्काळ कारवाई करत संबंधित बालकाला ताब्यात घेतले. त्याच्या राहत्या खोलीची झडती घेतली असता ३१३.६ ग्रॅम गांजा आढळून आला. पोलिसांनी गांजा व मोबाईल जप्त करून प्रकरणाची नोंद केली. संबंधित बालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून जप्त केलेला गांजा कोठून आणला गेला आणि त्यामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास सुरू आहे.

## ज्येष्ठाचा मृतदेह आढळला

**वर्धा -** शहरातील वैकुंठधाम मार्गावरील विसावा चौक परिसरात एका ज्येष्ठ व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मृत व्यक्तीचे वय अंदाजे ६० ते ६५ वर्षे असल्याचे पोलिसांनी सांगितले. स्थानिक व्यावसायिक पाणी घेण्यासाठी गेल्यानंतर झाडाखाली एक व्यक्ती निश्चल अवस्थेत पडलेली दिसली. त्याने तातडीने शहर पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविला. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर त्याला मृत घोषित केले. मृतकाची ओळख पटलेली नसून त्याच्याजवळ कोणतीही ओळखपत्रे आढळली नाहीत. त्याच्या उजव्या हातावर 'दत्तू नागोसे' असे गोंदण आहे.

# ज्येष्ठ अधिकमासानिमित्त मंगळवारी जगद्गुरूंचे वर्धा येथे आगमन

**वर्धा/ जनमाध्यम**

ज्येष्ठ अधिकमासानिमित्त वीरशैव लिंगायत समाजासाठी विशेष धर्मसभा, आशीर्वचन व दर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. काशी ज्ञानपीठाच्या जंगमवाडी मठाचे पीठाधीश्वर डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांचे मंगळवार, २ जून रोजी वर्धा येथे आगमन होणार आहे.

रामनगर येथील वीरशैव लिंगायत शिवमंदिर सभागृह येथे सायंकाळी ५.३० वाजता आयोजित कार्यक्रमात जगद्गुरूंचे आशीर्वचन आणि दर्शनाचा लाभ भाविकांना घेता येणार आहे. ज्येष्ठ अधिकमासाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या सोहळ्याबाबत समाजबांधवांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. या कार्यक्रमाला वीरशैव लिंगायत समाजातील सर्व बंधू-भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन वीरशैव सेवा मंडळ, वर्धा यांच्या वतीने करण्यात आले आहे.

तसेच कार्यक्रमास वेळेवर उपस्थित राहून धर्मसभेची शोभा वाढवावी, असेही मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी नमूद केले आहे. जगद्गुरूंच्या आशीर्वचनातून समाजाला धार्मिक, सामाजिक व आध्यात्मिक मार्गदर्शन मिळणार असल्याने या कार्यक्रमाकडे भाविकांचे लक्ष लागले आहे.

# संविधानिक हक्कांवरील आव्हानांविरोधात सजग राहण्याची गरज




## रमाई स्मृतिदिनानिमित्त ॲड. दिशा वाडेकर यांचे प्रतिपादन

**वर्धा/ जनमाध्यम**

संविधानाने वंचित, शोषित आणि मागास समाजघटकांच्या उत्थानासाठी दिलेल्या तरतुदींना विविध स्तरांवर आव्हाने निर्माण होत असून, संविधानिक अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी समाजाने अधिक सजग राहण्याची गरज असल्याचे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयातील अधिवक्ता ॲड. दिशा वाडेकर यांनी केले.

रमाई स्मृतिदिनानिमित्त रमाई फाउंडेशन, वर्धा यांच्या वतीने सत्यनारायण बजाज सार्वजनिक वाचनालय येथे 'आंबेडकरी चळवळीसमोरील संविधानिक व कायदेशीर आव्हाने व उपाय' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ महानाट्य दिग्दर्शक व आकाशवाणीचे निवृत्त निवेदक अशोक जांभूळकर होते, तर यूपीएससी परीक्षेत ५६१ वा क्रमांक प्राप्त करणारे बापूसाहेब गायकवाड प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ॲड. वाडेकर यांनी संविधान, आरक्षण आणि सामाजिक न्यायाच्या प्रश्नांवर सखोल भाष्य केले. उच्च शिक्षण संस्थांतील जातीय व लैंगिक भेदभाव तसेच तुरुंग व्यवस्थेतील विषमता याविरोधात लढलेल्या न्यायिक संघर्षांची माहिती त्यांनी दिली. संविधानिक मूल्यांचे रक्षण करण्यासाठी लोकशाही संस्थांबाबत जागरूकता वाढविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

उच्च शिक्षण अस्मितेचे आयुध' या विषयावर मार्गदर्शन करताना बापूसाहेब गायकवाड यांनी प्रतिकूल परिस्थितीतही जिद्द आणि आत्मविश्वासाच्या बळावर यश संपादन करता येते, असे सांगितले. शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाची सुरुवात माता रमाई यांच्या प्रतिमेला अभिवादन व बुद्धवंदनेने झाली.

प्रास्ताविक सरिता पखाले यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. ज्ञानेंद्र मुनेश्वर यांनी तर आभार प्रदर्शन रविंद्र जिंदे यांनी केले. कार्यक्रमास नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# डिझेल दरवाढीचा फटका; शेती मशागतीचे दर वाढले

## ट्रॅक्टर, जेसीबी, मळणी यंत्रांच्या भाड्यात वाढ; खरीप हंगामापूर्वी शेतकरी चिंतेत

**वर्धा/ जनमाध्यम**

पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या किमतींचा थेट परिणाम शेती क्षेत्रावर होत असून, जिल्ह्यात ट्रॅक्टर, जेसीबी, पोकलेन व मळणी यंत्रांच्या भाडेदरात वाढ करण्यात आली आहे. गेल्या पंधरा दिवसांत डिझेलच्या दरात झालेल्या सुमारे आठ रुपयांच्या वाढीमुळे यंत्रमालकांनी एकरी व ताशी दरात २०० ते ३०० रुपयांनी वाढ केली आहे. त्यामुळे खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात आणखी भर पडली आहे.



पूर्वी बैलांच्या साहाय्याने केली जाणारी मशागत आता मोठ्या प्रमाणात यांत्रिकीकरणाकडे वळली आहे. वेळेची बचत आणि जलद कामे होत असल्याने शेतकरी ट्रॅक्टर व इतर यंत्रसामग्रीला प्राधान्य देतात. मात्र डिझेल दरवाढीमुळे या यंत्रांच्या वापराचा खर्च वाढला आहे. आधीच बियाणे, खते, कीडनाशके आणि मजुरीचे दर वाढलेले असताना शेतीमालाला अपेक्षित भाव मिळत नसल्याची शेतकऱ्यांची तक्रार आहे. अशा परिस्थितीत मशागतीच्या वाढीव दरांमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित विस्कळीत होत असल्याचे चित्र दिसत आहे. दरवाढीचा हा परिणाम आगामी पेरणी हंगामात अधिक तीव्र जाणवण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी इंधन दर नियंत्रणात आणण्याची मागणी होत आहे.

# पाणीटंचाई निधीवर डल्ला? बांबरड्यात 'कागदी कामांचा' महाघोटाळा

## विहिरी कोरड्या... निधीही गायब ; ग्रामस्थांचा अधिकारी-कंत्राटदारांवर गंभीर आरोप

**आष्टी शहीद/ जनमाध्यम**

पाणीटंचाईसारख्या गंभीर समस्येवर शासनाकडून लाखो रुपयांचा निधी मंजूर होत असताना बांबरडा ग्रामपंचायतीत मात्र या निधीचीच 'वाट' लावल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. कंत्राटदार, विस्तार अधिकारी आणि ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या संगनमतातून पाणीटंचाई निवारणाच्या निधीचा अपव्यय करण्यात आल्याचा आरोप होत असून माहिती अधिकारातून मिळालेल्या कागदपत्रांमुळे हा कथित प्रकार चव्हाट्यावर आला आहे.

ग्रामस्थांच्या माहितीनुसार, गेल्या चार वर्षांत बोरखेडी व बांबरडा येथील सार्वजनिक विहिरींचे खोलीकरण व गाळ उपसण्याची कामे प्रत्यक्षात झालेलीच नाहीत. मात्र शासनाकडून दरवर्षी पाणीटंचाई निवारणासाठी निधी उपलब्ध होत असतानाही तो नेमका कुठे खर्च झाला, याचे समाधानकारक उत्तर अधिकाऱ्यांकडे नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, तत्कालीन सरपंच लता कडताई यांनी वारंवार मागणी करूनही विहिरींच्या कामांकडे दुर्लक्ष करण्यात आले. माहिती अधिकारातून प्राप्त झालेल्या कागदपत्रांमध्ये खर्चाचे तपशील आणि प्रत्यक्ष परिस्थिती यामध्ये मोठी तफावत आढळून आल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. निधीचा वापर कागदोपत्री दाखवून प्रत्यक्षात कामे न करता लाखो रुपयांची विल्हेवाट लावण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे

. चौकशी न झाल्यास तीव्र लोकआंदोलन उभारण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

सुचिता धंडाळे, माजी सरपंच लता कडताई, जोसना कडताई, मारोती घटी, दिवाकर घटी, अमोल नगरे, भाग्यश्री चेले व गणेश चेले यांच्या स्वाक्षऱ्या असलेल्या निवेदनामुळे प्रशासनाची झोप उडाली असून, आता चौकशीतून नेमके सत्य बाहेर येणार की प्रकरण दडपले जाणार, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

**चौकशी झाली तर अनेकांचे 'पाणी' उतरणार**

पाणीटंचाईने त्रस्त नागरिकांना दिलासा देण्यासाठी आलेला निधी जर खरोखरच कागदोपत्री खर्च दाखवून गायब झाला असेल, तर हा केवळ आर्थिक गैरव्यवहार नसून जनतेच्या विश्वासाशी केलेला विश्वासघात ठरेल.

त्यामुळे या प्रकरणातील सत्य बाहेर येणे गरजेचे असल्याची भावना ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत.

## तांबा घाटातून रेतीची चोरी

**वर्धा-** नदीच्या तांबा रेतीघाटातून अवैधरित्या रेतीचे उत्खनन करून वाहतूक करणाऱ्यांवर पुलगाव पोलिसांनी कारवाई करत ट्रॅक्टर-ट्रॉलीसह ७ लाख ५६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुलगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यशवंत सोलसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांचे पथक ३० मे रोजी हद्दीत गस्त घालत होते. दरम्यान, तांबा घाटातून रेती भरलेला ट्रॅक्टर विजयगोपाल मार्गे येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी विजयगोपाल-तांबा मार्गावर सापळा रचला. काही वेळातच हिरव्या रंगाचा विनाक्रमांकाचा जॉन डिअर ट्रॅक्टर ट्रॉलीसह येताना दिसला. पोलिसांनी वाहन थांबवून तपासणी केली असता ट्रॉलीमध्ये रेती भरलेली आढळली.

जाहीर सुचना

माझे अशिल **श्री. दिनकरराव विठोबाजी वाघमारे** हे मौजा वरुड, ता. व जि. वर्धा येथील, ग्रामपंचायत वरुड अंतर्गत, वॉर्ड क्र. ०३ मधील अनु. क्र. २३०, गावठाण, घर क्र. २१९, क्षेत्रफळ १६७.०५ चौ. मीटर (१८०२.०० चौ. फूट) असलेल्या तसेच त्यावरील बांधकामासह मिळकतीचे एकमेव व कायदेशीर मालक आहेत. सदर मिळकतीच्या चतु:सीमा पुढीलप्रमाणे आहेत :-

**पूर्वेस :** श्री. विठोबाजी आनंद वाघमारे यांची मोकळी जागा,
**पश्चिमेस :** श्री. सुरेश महादेव दुराटकर यांचे घर,
**उत्तरेस :** सिमेंट रस्ता,
**दक्षिणेस :** सिमेंट रस्ता,

ग्रामपंचायत वरुड यांनी दिनांक २९/०५/२०२६ रोजी दिलेल्या फेरफार प्रमाणपत्रानुसार, श्री. दिनकर विठोबाजी वाघमारे हे मौजा वरुड, ता. व जि. वर्धा, ग्रामपंचायत वरुड, वॉर्ड क्र. ०३, घर क्र. २१९, क्षेत्रफळ १६७.०५ चौ. मीटर (१८०२.००चौ. फूट) व त्यावरील १०४.०० चौ. मीटर (११२२.०० चौ. फूट) बांधकाम असलेल्या मिळकतीचे मागील १३ वर्षांपासून ताबेदार व मालक आहेत. श्री. दिनकर विठोबाजी वाघमारे हे सदर मिळकत त्यांच्या पुत्र श्री. भूषण दिनकरराव वाघमारे यांच्या नावे बक्षीसपत्र (गिफ्ट डिड) द्वारे हस्तांतरित करीत आहेत.

तसेच **श्री. भूषण दिनकरराव वाघमारे** यांनी सदर मिळकतीच्या तारणावर जना स्मॉल फायनान्स बँक लिमीटेड कडे कर्जासाठी अर्ज केलेला आहे. त्याअनुषंगाने सर्वसामान्य जनतेस जाहीर सूचित करण्यात येते की, वरील व्यवहारासंदर्भात कोणाचा काही हक्क, दावा, आक्षेप, स्वारस्य किंवा हरकत असल्यास त्यांनी या नोटीसच्या प्रसिद्धीपासून ७ (सात) दिवसांच्या आत आवश्यक पुराव्यांसह खालील पत्त्यावर लेखी स्वरूपात संपर्क साधावा अन्यथा, सदर व्यवहारास कोणाचीही हरकत नसल्याचे गृहित धरून पुढील कार्यवाही करण्यात येईल व त्यानंतर प्राप्त होणारा कोणताही दावा अथवा आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही.

**ॲड. आर. आर. तिवारी**
रामनगर, वर्धा.मो. नं. ९९२२४२६१६८

जाहीर सुचना

माझ्या अशिल **सौ. पुष्पलता बाबाराव कैकाडे**, रा. हिंगणी, ता. सेलू, जि. वर्धा या मौजा सालोड (हि.), ता. व जि. वर्धा येथील मौजा क्र. १३७, जुना सर्व्हे क्र. ३४४/१, ३४४/२, मधील प्लॉट क्र. ७१, क्षेत्रफळ १२०.०० चौ. मीटर या मिळकतीच्या एकमेव व संपूर्ण मालक असून सदर मिळकतीचा त्यांचा शांततापूर्ण ताबा व कब्जा आहे. माझ्या अशिलांनी सदर प्लॉट विकण्याचा निर्णय घेतला असून त्यानुसार श्री. अंकित फुलचंद तिवारी यांच्यासोबत विक्री करार केला आहे. तसेच, १) सौ. पुष्पलता बाबाराव कैकाडे, २) सौ. जयश्री मंगेश कैकाडे, ३) कु. हंसिका मंगेश कैकाडे आणि ४) चि. ओजस मंगेश कैकाडे (अल्पवयीन क्र. ३ व ४ यांचे नैसर्गिक पालक व संरक्षक सौ. जयश्री मंगेश कैकाडे यांच्यामार्फत) या मौजा सालोड (हि.), ता. व जि. वर्धा येथील मौजा क्र. १३७, जुना सर्व्हे क्र. ३४४/१ ,३४४/२ मधील प्लॉट क्र. ७२, क्षेत्रफळ १२०.०० चौ. मीटर या मिळकतीच्या मालक आहेत. सदर प्लॉट क्र. ७२ हा स्वर्गीय मंगेश कैकाडे यांच्या मालकीचा होता. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या वरील नमूद कायदेशीर वारसांची नावे सदर प्लॉटवर फेरफार नोंदीनुसार नोंदविण्यात आली आहेत. आता सौ. पुष्पलता बाबाराव कैकाडे, सौ. जयश्री मंगेश कैकाडे तसेच अल्पवयीन वारसांच्या संरक्षक म्हणून सौ. जयश्री मंगेश कैकाडे यांनी सदर प्लॉट श्री. अंकित फुलचंद तिवारी यांना विकण्याचा निर्णय घेतला आहे. माझ्या अशिलांचा सदर मिळकत विकण्याचा/हस्तांतरित करण्याचा मानस असून, या मिळकतीसंबंधी कोणत्याही व्यक्ती, वित्तीय संस्था, बँक, प्राधिकरण किंवा संघटना यांचा कोणताही हक्क, दावा, मालकी हक्क, स्वारस्य, आक्षेप, मागणी, तारण, गहाण, बोजा, भार, सुलभाधिकार, भाडेहक्क, वारसाहक्क किंवा अन्य कोणताही अधिकार असल्यास त्यांनी या जाहीर नोटीसच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून १० दिवसांच्या आत त्यासंबंधीचे सर्व पुराव्यांसह लेखी स्वरूपात अधोहस्ताक्षरी यांच्याकडे कळवावे. अन्यथा, सदर मिळकतीवर कोणाचाही कोणताही दावा अथवा आक्षेप नसल्याचे गृहित धरले जाईल व प्रस्तावित विक्री/हस्तांतरण प्रक्रिया कोणत्याही पुढील सूचनेशिवाय पूर्ण करण्यात येईल. तसेच त्यानंतर प्राप्त होणारा कोणताही दावा, हक्क किंवा आक्षेप हा त्यागलेला व ग्राह्य नसलेला समजण्यात येईल.

**ॲड.आर आर. तिवारी,**
रामनगर, वर्धा. मो.९९२२४२६१६८

# बंड्याला आग लावून लाखाचे नुकसान; नाचनगावातील प्रकार

**पुलगाव/ जनमाध्यम**

तालुक्यातील नाचनगाव येथे शेतमाल व शेती उपयोगी साहित्य ठेवलेल्या बंड्याला (कोठ्याला) आग लावून सुमारे एक लाख रुपयांचे नुकसान केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पुलगाव पोलिसांनी एका संशयिताविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

फिर्यादी संजय संतोषराव साव (वय ४६, रा. नाचनगाव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, धनगरपुरा परिसरात त्यांच्या चुलत सासऱ्याच्या मालकीचा बंडा असून त्यामध्ये शेतीसाठी लागणारे साहित्य, पाईप, कुटार, नांगर, वखर, डवरे व बैलबंडी ठेवण्यात येत होती. २८ मे रोजी दुपारी साडेदोनच्या सुमारास त्यांना मोबाईलवरून बंड्याला आग लागल्याची माहिती मिळाली. त्यानंतर ते घटनास्थळी पोहोचले असता ग्रामस्थ आग विझविण्याचा प्रयत्न करत होते. आग आटोक्यात आल्यानंतर चौकशी केली असता काही नागरिकांनी प्रदीप पंडित (रा. नाचनगाव) याने आग लावल्याचा संशय व्यक्त केला. या आगीत ५५ हजार रुपयांचे प्लास्टिक पाईप, ५ हजार रुपयांची बैलबंडीची जु, १० हजार रुपयांचे चणा-तूर कुटार तसेच सुमारे ३० हजार रुपयांचे शेती उपयोगी साहित्य जळून खाक झाले. प्रकरणी पुलगाव पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३२६(एफ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी अद्याप फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रीती ढेपे करीत आहेत.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)
**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - १८४
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# मिनी बँक संचालकाकडून महिला गुंतवणूकदारांची फसवणूक

## आठ दिवसांनंतर पोलिसांत गुन्हा दाखल; ठाणेदारांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

मुऱ्हा देवी येथील बचत गटातील महिलांची एका मिनी बँक संचालकाने लाखो रुपयांनी फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. विशेष म्हणजे, या गंभीर प्रकरणात तक्रार देण्यासाठी महिलांना तब्बल आठ दिवस पोलीस स्टेशनच्या चकरा माराव्या लागल्या. रहिमापूर चिंचोली पोलीस स्टेशनच्या ठाणेदारांनी तक्रार घेण्यास टाळाटाळ केल्याने आता पोलिसांच्या कार्यक्षमतेवर आणि भूमिकेवर तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.



मुऱ्हा देवी येथील महिला बचत गटांचे पैसे मिनी बँक (CSC) संचालकाने हडप केल्याची घटना १० दिवसांपूर्वी समोर आली होती. हक्काचे पैसे बुडाल्याने हवालदिल झालेल्या महिला तक्रार देण्यासाठी रहिमापूर चिंचोली पोलीस स्टेशनला गेल्या असता, ठाणेदारांनी त्यांची तक्रार नोंदवून घेण्यास वारंवार नकार दिला.

महिलांची दाद घेतली जात नसल्याचे पाहून शिवसेना शहरप्रमुख मुन्ना उर्फ योगेश इसोकार यांनी या प्रकरणात पुढाकार घेतला. त्यांनी उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांकडे (SDPO) रीतसर निवेदन देऊन महिलांची तक्रार नोंदवून घेण्याची विनंती केली.

तरीही स्थानिक स्तरावर टाळाटाळ सुरूच होती. अखेर, मिनी बँक (CSC) कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वतः हस्तक्षेप करून पोलिसांना गुन्हा दाखल करण्याची विनंती केली, त्यानंतर आरोपी मतिन सौदागर याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.मुऱ्हा देवी येथिल ९ महिला बचत गटाच्या तक्रारीवरून मिनी बँक संचालक मतिन सौदागरवर भारतीय न्याय संहिता बीएनएस २०२३ ३१८(४),३३६(३),३४०(२) नुसार गुन्हे दाखल करण्यात आले.

लाखो रुपयांची फसवणूक झालेली असतानाही पोलिसांनी महिलांना सहानुभूती न दाखवता आरोपीला वाचवण्याचा प्रयत्न का केला? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. परिसरात सौदागर कुटुंबाची मोठी दहशत असल्याचे बोलले जाते. या कुटुंबातील सदस्यांवर यापूर्वीही हत्ये सारखे गंभीर गुन्हे दाखल असून, अवैध दारू विक्री. अवैध वाळू, आणि गोमांस तस्करीसारख्या व्यवसायात त्यांचा सहभाग असल्याची चर्चा आहे. याच 'अर्थपूर्ण' संबंधांमुळे पोलीस कारवाई करण्यास कचरत होते का, असा संशय महिला बचत गटांनी व्यक्त केला आहे.

**तपास काढून घेण्याची मागणी**

आरोपीला वाचवण्यासाठी पोलिसांनी जाणीवपूर्वक विलंब केला. त्यामुळे या प्रकरणाचा तपास विद्यमान ठाणेदारांकडून काढून घेण्यात यावा आणि पोलीस अधीक्षकांनी स्वतः यात लक्ष घालावे,' अशी मागणी पीडित महिलांनी केली आहे. तसेच, या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या आरोपींना परिसरातून तात्काळ तडीपार करावे, अशी मागणीही जोर धरू लागली आहे. या प्रकरणाने अंजनगाव सुर्जी परिसरात खळबळ उडाली असून, आता पोलीस अधीक्षक यावर काय कडक पावले उचलतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# उन्हाचा तडाखा,पाण्याचा आटापिटा!

## विभागातील जलसाठा ३४ टक्क्यांवर

**अमरावती/का.प्र.**

विदर्भातील कडक उन्हाळ्याची पार्श्वभूमी आणि मान्सूनच्या आगमनापूर्वीची अगतिकता अमरावती विभागातील जलसाठ्यावरून स्पष्टपणे समोर आली आहे. जलसंपदा विभागाच्या अहवालानुसार, अमरावती प्रादेशिक विभागातील मोठे, मध्यम आणि लघु अशा एकूण २८८ पाटबंधारे प्रकल्पांमध्ये सद्यस्थितीत केवळ ३४.७२ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. गतवर्षीच्या याच कालावधीतील साठ्याशी तुलना करता यंदा पाणीपातळी खालावल्याने आगामी काळात तीव्र पाणीटंचाईचे संकट उभे राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अमरावती विभागातील एकूण ३,०९९.८७ दशलक्ष घनमीटर (द.ल.घ.मी.) प्रकल्पीय उपयुक्त पाणीसाठ्यापैकी आजमितीला केवळ १,०७६.२७ द.ल.घ.मी. पाणी उपलब्ध आहे. विशेष म्हणजे, मागील आठवड्यात हा साठा १,१०९.१९ द.ल.घ.मी. इतका होता. म्हणजेच अवघ्या एका आठवड्यात तब्बल ३२.९२ द.ल.घ.मी. पाण्याचा वापर आणि बाष्पीभवन झाले आहे, जे वाढत्या तापमानाची भीषणता दर्शवते. विभागातील ९ मोठ्या प्रकल्पांची स्थिती पाहिल्यास, त्यात एकूण ३८.३२ टक्के उपयुक्त पाणीसाठा आहे. मात्र, ही टक्केवारी केवळ अमरावती जिल्ह्यातील उर्ध्व वर्धा प्रकल्पामुळे टिकून आहे, जिथे सध्या ४६.३५ टक्के (२६१.४२ द.ल.घ.मी.) साठा उपलब्ध आहे. दुसरीकडे, खडकपूर्णा प्रकल्पाची स्थिती अत्यंत दयनीय झाली असून, आला यवतमाळमधील पुस (३४.२५ टक्के), अरुणावती (४०.१४ टक्के), बेंबळा (३३.७३ टक्के) आणि काटेपूर्णा (२६.९८ टक्के) या मोठ्या प्रकल्पांनीही चिंताजनक पातळी गाठली आहे.

## संक्षिप्त



### खल्लार हायस्कुलचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

**खल्लार-**श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित असलेल्या खल्लार हायस्कूल, खल्लार येथिल विद्यार्थ्यांनी आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.परीक्षेत विद्यालयाचे शिष्यवृत्तीकरिता आर्यन ईश्वर मेश्राम,पूर्वी योगेश शिंगणे, अथर्व दिनेश खंडारे,प्रिती दिनेश इंगळे, वैभव डिगांबर खंडारे,सिद्धी अमोल बावने, सोहम अमोल मदनकर,खुशी उमेश इंगळे,सोहम अमित देशपांडे,अभय नरेश घोंगडे,कार्तिक संतोष झोड,तनया अमित देशपांडे हे विद्यार्थी पात्र ठरले आहेत.या शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये पात्र झालेल्या विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे विद्यालयाच्या वतीने कौतुक व सत्कार करण्यात आला. या यशाबद्दल श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, प्राचार्य केशवराव गावंडे कार्यकारणी सदस्य, विनायक गावंडे शाळा तपासणी अधिकारी, शाळा समिती सदस्य मधुसूदन धाबे, पंजाबराव टवलारे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले मुख्याध्यापक डी आर नवरे, शिष्यवृत्ती प्रभारी.ए. डब्ल्यू.बागडे, यू.डी .राणे,पी डब्ल्यू.घुरडे, ए एस मोपारी, ऋतुजा बोंडे,सय्यद अब्दुल्ला यांचे मार्गदर्शन लाभले. शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक-पालक संघ, माता-पालक संघसर्व पालक, सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी पात्र विद्यार्थ्यांचे कोतुक केले.



### महानगरपालिकेत अहिल्यादेवी होळकर जयंती

**अमरावती-**अहिल्यादेवी होळकर जयंती निमित्य हारार्पण कार्यक्रम अमरावती महानगरपालिकेत झाला. अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती निमित्य महापौर श्रीचंद तेजवानी यांचे हस्ते अहिल्यादेवी होळकर यांचे प्रतिमेस हारार्पण विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे करण्यात आले.यावेळी सभागृह नेता चेतन गावंडे, झोन सभापती इस्माईल कासम लालुवाले, नगरसेवक सचिन वैद्य, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, प्रमोद मोहोड, भुषण खडेकार, शिवा फुटाणे, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.



### विद्यापीठात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन

**अमरावती-**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात साजरी करण्यात आली.यावेळी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले.जयंती कार्यक्रमाला जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच विद्यापीठाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संचालन व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.

### संजय ढेंबरे यांचे निधन



**अंजनगाव बारी-**पार्डी (देवी) येथील विद्यमान ग्रामपंचायत सदस्य संजय नारायण ढेंबरे यांचे वयाच्या ५२ व्या वर्षी अल्पशा आजाराने दि.३० मे रोजी दुपारा निधन झाले. ते मनमिळावू, कर्तव्यदक्ष व लोकाभिमुख व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते.त्याच्यावर (दि.३०) पार्डी स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. संजय ढेंबरे यांच्या अंत्ययात्रेला ग्रामपंचायत पदाधिकारी, सदस्य, सामाजिक कार्यकर्ते, ज्येष्ठ नागरिक व ग्रामस्थांची मोठी उपस्थिती लाभली. शोकाकुल वातावरणात त्यांना अखेरचा निरोप देण्यात आला.

# फार्मर कप स्पर्धेसाठी अमरावती तालुका सज्ज; ८० शेतकऱ्यांचा सहभाग

**शिराळा/वार्ताहर**

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे सक्षमीकरण करणे आणि गटाच्या माध्यमातून आधुनिक शेतीला चालना देण्याच्या उद्देशाने आयोजित 'फार्मर कप' (Farmer Cup) स्पर्धेसाठी अमरावती तालुका पूर्णपणे सज्ज झाला आहे. या स्पर्धेत तालुक्यातील एकूण ८० शेतकरी रगटांनी सहभाग घेतला असून, यामध्ये ५५ पुरुष गट आणि २५महिला शेतकरी गटांचा समावेश आहे.

विशेष म्हणजे, पाणी फाऊंडेशन, कृषी विभाग आणि 'उमेद' या तीन प्रमुख यंत्रणांच्या संयुक्त सहभागातून या स्पर्धेचे अत्यंत नियोजनबद्ध आयोजन करण्यात आले आहे.मेंटरद्वारे शेतकऱ्यांना प्रोत्साहन स्पर्धेत सहभागी झालेल्या शेतकरी गटांना योग्य दिशा व मार्गदर्शन मिळावे यासाठी कृषी विभाग,उमेद आणि पाणी फाउंडेशनच्या वतीने विशेष 'मेंटर' (मार्गदर्शक) यांची निवड करण्यात आली आहे. हे मेंटर सध्या गावागावांत जाऊन पुरुष व महिला शेतकऱ्यांशी संवाद साधत असून, त्यांना स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी प्रोत्साहित करत आहेत.अमरावती तालुक्यातील विविध गावांनी या स्पर्धेत मोठ्या प्रमाणावर भाग घेतला आहे. यामध्ये प्रामुख्याने:शिराळा, पुसदा, वलगाव, नया अकोला, देवरा, देवरी,यावली, मावली, कापूसतळणी, वडगावमाहोरे शेवती (जाहागीर),अंजनगाव



बारी, काटआमला, केकतपूर, नांदुरा, अशा अनेक गावांचा समावेश असून,येथील शेतकरी गटांमध्ये कमालीचा उत्साह पाहायला मिळत आहे.कामाच्या आधारावर होणार गुणांकन 'फार्मर कप' ही स्पर्धा केवळ सहभागापुरती मर्यादित नसून प्रत्यक्ष कृतीवर आधारित आहे. सहभागी शेतकरी गट आपल्या शेतामध्ये प्रत्यक्ष कोणकोणते प्रयोग राबवणार आहेत, शेती सुधारणेच्या कोणत्या पद्धती अवलंबणार आहेत आणि गटाच्या माध्यमातून कोणती सामूहिक कामे करणार आहेत, या सर्व बाबींची प्रत्यक्ष पाहणी करून गुणांकन (Scoring) केले जाणार आहे.

**राज्य स्तरावर तब्बल ५० लाखांचे पहिले बक्षीस!**

या स्पर्धेत सर्वाधिक गुणांकन मिळवणाऱ्या यशस्वी शेतकरी गटांना जिल्हा व राज्य पातळीवर भरघोस रोख पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

महिला शेतकऱ्यांच्या प्रयत्नांना दाद देण्यासाठी आणि त्यांचे मनोबल वाढवण्यासाठी विशेष पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. राज्यातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या तीन महिला गटांना प्रत्येकी १० लाख रुपयांचे विशेष पारितोषिक दिले जाणार आहे.गटाच्या माध्यमातून शेतीचा खर्च कमी करणे, उत्पन्न वाढवणे आणि शाश्वत शेतीकडे पाऊल टाकणे यासाठी ही स्पर्धा अमरावती तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी एक सुवर्णसंधी ठरत आहे. यासाठी कृषि विभागाचे मेंटर मारोती जाधव, उमेदच्या मेंटर सुवर्णा चौधरी, माधुरी रामटेके,पाणि फाऊंडेशन चे मार्गदर्शक जयकुमार सोनूले, प्रशांत देवळे, रेणूका पोहकार यांचे उत्कृष्ट मागदर्शन मिळत आहे, त्यामुळे या गटामध्ये पारितोषिक मिळविण्यासाठी आता चांगली स्पर्धा लागलेली दिसून येत आहे, शेतकरी गटानी मोठ्या उत्साहाने व जिद्दीने शेतीच्या एसओपीची अंमलबजावणीची सुरूवात केली आहे.तालुक्यातील सर्व गावांमध्ये गटबांधणीला चांगला प्रतिसाद मिळत आहे,'फॉर्मर कप' च्या माध्यमातून शेतकरी एसपीचा वापर करून शाश्वत शेतीकडे वळतील अशी माहिती प्रशांत गुल्हाने अमरावती तालुका कृषी अधिकारी यांनी दिली.

# उन्हाळी बॅडमिंटन प्रशिक्षण शिबीर उत्साहात

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे तथा तालुका क्रीडा संकुल समिति, चांदूर रेल्वे यांच्या संयुक्त विद्यमाने स्थानिक क्रीडा संकुल येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य उन्हाळी बॅडमिंटन क्रीडा प्रशिक्षण शिबिर २०२६ चा उत्साहपूर्ण वातावरणात समारोप करण्यात आला.



शिबिरादरम्यान प्रशिक्षक नंदू सोरगिवकर यांनी विद्यार्थ्यांना बॅडमिंटनच्या विविध तांत्रिक बाबींचे प्रशिक्षण दिले. तसेच खेळापूर्वी नियमित व्यायाम, शारीरिक तंदुरुस्ती आणि खेळातील शिस्त याबाबतही मार्गदर्शन केले. तालुका क्रीडा अधिकारी शेख सलीम व प्रशिक्षक नंदू सोरगिवकर यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिर यशस्वीरीत्या पार पडले. लहान मुलांच्या गटात विराज विरकर याने प्रथम, तर सक्षम मोहतुरे याने द्वितीय क्रमांक पटकाविला. लहान मुलींच्या गटात आराध्य धाकडे हिने प्रथम, तर अंबा पवार हिने द्वितीय क्रमांक मिळविला. मोठ्या मुलांच्या गटात कृष्णा व्यास याने प्रथम, तर साहिल कैलकार याने द्वितीय क्रमांक पटकाविला. याशिवाय हर्षिता मोरे, मुक्ता देशपांडे आणि आयुष खेरकर यांना वैयक्तिक उत्कृष्ट कामगिरीबद्दल विशेष पुरस्कार प्रदान करण्यात आले. विजेत्या स्पर्धकांना मेडल व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. समारोप कार्यक्रमाला आमदार प्रताप अडसड, तालुका क्रीडा अधिकारी शेख सलीम, पोलीस उपनिरीक्षक नंदलाल लिंगोट, रितेश मुंधडा, डॉ. शिखा पांडे, प्रवीण भोगे, अमोल चतुर, बाळा धाकडे, सुरज काळे, अविनाश कैलकार आणि मयूर कोरडे यांच्यासह पालक व क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी शिबिराचे प्रशिक्षक नंदू सोरगिवकर यांचा उत्कृष्ट प्रशिक्षण कार्याबद्दल सर्व पालकांच्या वतीने शाल व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. या प्रशिक्षण शिबिरामुळे विद्यार्थ्यांमध्ये बॅडमिंटन खेळाविषयी आवड निर्माण होण्यासोबतच शारीरिक तंदुरुस्ती व क्रीडासंस्कार जोपासण्यास मोठी मदत झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

### चांदूर रेल्वेची गावठी दारू निर्मितीवर धडक कारवाई

**चांदूर रेल्वे-** पोलीस स्टेशन चांदूर रेल्वे पोलिसांना ३१ मे रोजी माहिती मिळाली की, ग्राम गौरखेडा येथील पारधी बेड्यावर गिरीश सुभाष पवार हे इतर साथीदारांसह मोहाच्या सडवा आणि इतर रासायनिक पदार्थांपासून अवैधरित्या गावठी दारू तयार करत आहेत. पोलीस स्टेशन चांदूर रेल्वेचे पो.नि. अजय आकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने घटनास्थळी धाड टाकली. कारवाइ 'दरम्यान मोहाचा सडवा भरलेले प्रत्येकी २०० लिटर क्षमतेचे ३२ प्लास्टिक ड्रम आणि २०० लिटर क्षमतेचे १० लोखंडी ड्रम जप्त करण्यात आले. या प्रकरणी भट्टी मालक गिरीश सुभाष पवार यांच्या विरोधात महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (फ), (क), (ड) तसेच बी.एन.एस. कलम १२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, दत्ता तोटेवाड, अशोक थोरात, पोलीस निरीक्षक चांदूर रेल्वे अजय आकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि नीतेश आझाडे, पोउपनि रोहित कुदळे, पोहेको शिवाजी घुगे,राहुल, योगेश, निकिता अशा पोलीस पथकाने केली.

# अहिल्यादेवींचे कार्य आजही प्रेरणादायी-सुरज तेलगोटे



**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**

लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी न्याय, सेवा आणि संस्कृती संवर्धनाचा आदर्श देशासमोर ठेवला. जनकल्याणासाठी समर्पित असलेले त्यांचे जीवन आजही प्रत्येकाला प्रेरणा देणारे आहे, असे प्रतिपादन आसेगावचे ठाणेदार सुरज तेलगोटे यांनी केले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सव समिती, आसेगाव पूर्णा यांच्या वतीने बस स्थानक परिसरात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात अहिल्यादेवी होळकर, छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. यावेळी ज्ञानेश्वरराव गादे, तुळशीदास पावडे, रूपराव नवले, श्रावण बोकडे, श्रीकृष्ण मेहत्रे, रावसाहेब लव्हाळे, मंगलाताई करडे तसेच मुख्याध्यापिका माहोरे मॅडम यांनी अहिल्यादेवींच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या लोकाभिमुख प्रशासनाचा गौरव केला.कार्यक्रमास समाजबांधवांसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. जयंतीनिमित्त बस स्थानक परिसरात नागरिकांसाठी थंडगार पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

## संघर्ष योद्धा बहुद्देशीय संस्थे'तर्फे

# नवनियुक्त पोलिस कर्मचारी व गुणवंत विद्यार्थ्यांचा नागरी सत्कार

**अमरावती/का.प्र.**

महाजनपुरा येथील श्री गजानन महाराज मंदिर परिसरात 'संघर्ष योद्धा बहुउद्देशीय संस्थे'च्या वतीने आयोजित विशेष स्वागत व सत्कार सोहळा अत्यंत उत्साहात आणि निश्चितबद्ध पद्धतीने पार पडला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत राज्य राखीव पोलीस दलात (ऐंइइ) निवड झालेले परिसरातील सुपुत्र आकाश कवठाळे आणि नुकत्याच जाहीर झालेल्या १० वी व १२ वीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करणारे गुणवंत विद्यार्थी यांचा हा नागरी सत्कार सोहळा होता.

कार्यक्रमाची सुरुवात गजानन महाराजांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलनाने झाली. या प्रसंगी संस्थेचे संस्थापक सौरभ सावरकर, अध्यक्ष शुभम सावरकर, मुख्य सत्कारमूर्ती आकाश कवठाळे आणि आकाशला मोलाचे मार्गदर्शन करणारे त्यांचे शारीरिक शिक्षक हरीश पावडे प्रामुख्याने मंचावर उपस्थित होते.कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरलेल्या आकाश कवठाळे यांचा शाल, पुष्पगुच्छ आणि 'संघर्ष योद्धा सन्मानचिन्ह' देऊन जाहीर नागरी सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना आकाश कवठाळे यांनी उपस्थित तरुणांना स्पर्धा परीक्षा



व पोलीस भरतीच्या तयारीसाठी मोलाचे मार्गदर्शन केले आणि जिद्दीच्या जोरावर यश कसे मिळवायचे, याचे अनुभव सांगितले.कार्यक्रमाचे अध्यक्ष शुभम सावरकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व संस्था भविष्यातही असे शैक्षणिक व सामाजिक उपक्रम राबवत राहील अशी ग्वाही दिली.या सोहळ्यात इयत्ता १२ वी मधील परिसरातील कुमारी हनी आठवले, तसेच इयत्ता १० वी मधील हर्षल अर्जापुरे, लावण्या कटिस्कर व कनक सायंबेकर या विद्यार्थ्यांनी परीक्षेमध्ये उत्तम गुण प्राप्त केले, त्याबद्दल संस्थेच्या वतीने त्यांना स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. याच पद्धतीने परिसरातील इतरही गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. आपल्या मातीतील मुलांचे हे कौतुक पाहण्यासाठी पालकांनी व नागरिकांनी मंदिर परिसरात मोठी गर्दी केली होती. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन निवेदक आयुष सावरकर आणि चेतन नांदुरकर यांनी केले. तसेच कार्यक्रमाला उपस्थित मान्यवरांचे, विद्यार्थ्यांचे आणि पालक वर्गाचे आभार प्रदर्शन करण्याची जबाबदारी रुपेश नांदुरकर यांनी पार पाडली.हा सोहळा उत्तमरित्या पार पाडण्याकरिता संस्थेचे पदाधिकारी व सदस्य मुकेश बोरकर, शेखर चव्हाण,नयन विजयकर, मनोज विजयकर, कुणाल नांदुरकर, समीर सावरकर, अतुल बोरकर, जय सावरकर आणि विकी गायकवाड यांचे महत्त्वपूर्ण योगदान लाभले.

# कारवाईचा बडगा काही लाखांत नमला?

## लाखमोलाचा सल्ला देऊन पाहणी करणारे परतले; खाण-क्रशर प्रकरणात नव्या चर्चांना उधाण

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** सातपुड्याच्या कुशीत दडलेली गाजीपूर-रुदाळीची कहाणी आता केवळ खाण, क्रशर आणि उत्खननापुरती मर्यादित राहिलेली नाही. या परिसरातील प्रत्येक डोंगर, प्रत्येक खडक आणि प्रत्येक धुळीच्या कणातून आता एकच प्रश्न बाहेर पडताना दिसत आहे की 'कारवाई खरंच झाली का, की कारवाईचं नाटक करून सर्व काही काही लाखांत मिटवलं गेलं?'

अकोट तालुक्यातील पोपटखोड गट ग्रामपंचायतीअंतर्गत येणाऱ्या मौजे गाजीपूर व रुदाळी येथे गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या खाण व क्रशर उद्योगांबाबत 'जनमाध्यम'ने उघड केलेल्या धक्कादायक वास्तवामुळे प्रशासनात खळबळ उडाली होती. आदिवासी बांधवांच्या जमिनी, संशयास्पद भाडेपट्टे, अवैध उत्खनन, कोट्यवधींचा महसुली तोटा, पर्यावरणाची होणारी अपरिमित हानी आणि विविध विभागांचे संशयास्पद मौन यावर वृत्तमालिकेने प्रकाशझोत टाकला होता. मात्र या वृत्तमालिकेनंतर घडलेल्या घटनांनी आता अधिकच गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.

वृत्तमालिका प्रसिद्ध होताच एका महत्त्वाच्या विभागाचे पथक गत आठवड्यात अचानक गाजीपूर-रुदाळी परिसरात दाखल झाले. अधिकाऱ्यांच्या गाड्या आल्या, पाहणी झाली, परवानग्या तपासल्या




आणि अन्य अनेक बाबींवर कठोर कारवाई होण्याची चर्चा सुरू झाली. गावकऱ्यांनाही वाटले की आखेर शासन यंत्रणा जागी झाली. परंतु काही वेळातच चित्र पालटले.

### ■ वृत्तमालिका की विभागांसाठी सुवर्णसंधी?

गाजीपूर-रुदाळी प्रकरणातील सर्वात गंभीर बाब म्हणजे या वृत्तमालिकेनंतर संबंधित विभागांची वाढलेली वर्दळ. ज्या ठिकाणी वर्षानुवर्षे अनेक प्रश्न प्रलंबित होते, तिथे अचानक विविध विभागांच्या गाड्या पोहोचू लागल्या. मात्र या भेटींचा शेवट बहुतांश वेळा कागदी सूचनांमध्येच होत असल्याची चर्चा आहे. त्यामुळे 'ही वृत्तमालिका जनहितासाठी सुरू आहे की काही विभागांसाठी पर्वणी ठरत आहे?' असा एक उपरोधिक प्रश्न स्थानिकांकडून विचारला जात आहे कारण बातमीनंतर पाहणी होते, चर्चा होते, बैठका होतात; पण ठोस कारवाईचा मागमूस मात्र दिसत नाही.

### ■ प्रश्न अनेक, उत्तर कुणाकडे?

जर सर्व काही नियमांनुसार असेल तर कारवाईची भाषा का वापरण्यात आली? जर नियमभंग आढळले असतील तर कठोर कारवाई का झाली नाही? जर केवळ किरकोळ त्रुटी होत्या तर इतकी मोठी यंत्रणा तिथे दाखल का झाली?आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे पाहणीच्या सुरुवातीला दिसलेला कठोरपणा काही वेळातच मवाळ कसा झाला? गाजीपूर-रुदाळीच्या डोंगरांमध्ये सध्या याच प्रश्नांची प्रतिध्वनी ऐकू येत आहे.

आणि संबंधित व्यावसायिकांमध्ये काही काळासाठी भीतीचे वातावरण निर्माण झाले. पाहणीदरम्यान कारवाईचे संकेत देण्यात आले. नियमभंग, प्रदूषण, परवानग्यांतील तफावत

कारवाईची अपेक्षा असताना ना कुठली मोठी नोटीस, ना दंडात्मक कारवाई, ना व्यवसाय बंद करण्याचे आदेश. उलट

### ■ एसी ऑफिसमधील बैठक आणि 'लाखमोलाचा' सल्ला-

स्थानिक स्तरावर चर्चिल्या जाणाऱ्या माहितीनुसार, पाहणी करणाऱ्या पथकातील काही सदस्यांनी प्रत्यक्ष खाण परिसरापेक्षा संबंधित व्यावसायिकाच्या वातानुकूलित कार्यालयात अधिक वेळ घालविल्याची चर्चा आहे. याच बैठकीत भविष्यात कोणत्या बाबींची काळजी घ्यावी, कोणती कागदपत्रे अद्ययावत ठेवावीत, कोणत्या त्रुटी कशा 'झाकता' येतील, कोणते पाणी कुठे मुरवता येईल आणि पुढील अडचणी टाळण्यासाठी काय उपाययोजना कराव्यात याबाबत 'लाखमोलाचे मार्गदर्शन' करण्यात आल्याची चर्चा रंगली आहे. गावकऱ्यांच्या भाषेत सांगायचे झाले तर, 'कारवाईचा बडगा दाखवून शेवटी लाखमोलाचा सल्ला देण्यात आला.' यातील 'लाखमोलाचा' शब्द केवळ सल्ल्याच्या किंमतीसाठी वापरला जातो आहे की त्यामागे काही आर्थिक व्यवहार दडले आहेत, याबाबत आता संशयाची सुई फिरू लागली आहे.

### ■ आदिवासींच्या जमिनींचा प्रश्न अजूनही अनुत्तरित-

या संपूर्ण प्रकरणाचा मूळ मुद्दा म्हणजे आदिवासी समाजाच्या जमिनी. गैरआदिवासी घटकांकडून करण्यात आलेले व्यवहार, भाडेपट्टे, त्यांची वैधता, शासनाची परवानगी, महसुली नियम आणि जमीन हस्तांतरणाचे प्रश्न अद्याप कायम आहेत. खाण व क्रशर उद्योगातून कोट्यवधींची उलाढाल होत असल्याचा आरोप होत असताना, मूळ जमीनधारक आदिवासी बांधवांना नेमका किती लाभ झाला, हा प्रश्न अजूनही उत्तराच्या प्रतीक्षेत आहे.

संबंधित पथकाने खाण व क्रशर मालकाला काही किरकोळ सुधारणा करण्याच्या सूचना देऊन प्रकरणाला पूर्णविराम दिल्याची चर्चा आता जोर धरू लागली आहे.

दरम्यान, वृत्तमालिकेच्या पुढील भागात खाण, क्रशर आणि संबंधित विभागांमधील परस्पर संबंध, परवानग्यांचा गुंता आणि कोट्यवधी रुपयांच्या आर्थिक व्यवहारांबाबत आणखी काही धक्कादायक बाबींचा भांडाफोड होणार आहे एवढे मात्र निश्चित !

# चार महिलांचा जीव घेणारी वाघीण परतवाड्यात

## मेळघाट वाघ्रप्रकल्पात सोडण्याची चर्चा

**अमरावती /प्रतिनिधीः-** : चंद्रपूर जिल्ह्यात सिंदेवाही तालुक्यातील जंगलात तेंदुपत्ता संकलनासाठी गेलेल्या चार महिलांवर हल्ला करून ठार करणाऱ्या जहाल वाघीणीला आज परतवाड्यात आणण्यात आले आहे. या वाघिणीला अमरावती जिल्ह्यातील मेळघाटच्या जंगलात सोडले जाणार असल्याची चर्चा सुरु आहे. चार महिलांना ठार करणारी वाघीण परतवाड्यात आणल्याने नागरिकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. दुसरीकडे या वाघिणीला परतवाड्याला आणले मात्र तिला कोणत्या जंगलात सोडायचे हे अद्याप ठरले नसल्याचे सांगण्यात येत आहे.



तेंदूपत्ता संकलनाकरिता जंगलात गेलेल्या सिंदेवाही तालुक्यात येणाऱ्या गुंजेवाही गावातील एकूण चार महिलांवर सदर वाघीणीने हल्ला करून त्यांना ठार केले होते. २२ मे रोजी ही दुर्दैवी घटना घडली होती. यानंतर वन विभागाने या वाघिणीला पकडण्याकरिता मोठे प्रयत्न केले. जंगलात ज्या भागात वाघीण होती, त्या भागात चार पिंजरे आणि २० ट्रॅप कॅमेरे लावण्यात आले. यासोबतच मोशन सेन्सर लाईव्ह सीसीटीव्ही कॅमेरे देखील लावण्यात आले होते. वन विभागाच्या पथकाने २४ मे रोजी या वाघिणीला पकडण्यात ☞(पान २ वर)

# आमदार लवटे धावले अपघातातील जखमींच्या मदतीला

## स्वतःच्या गाडीने पोहचविले रुग्णालयात

**खल्लार/प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जी ते दर्यापूर मार्गावर दौऱ्यावर असताना अपघात झालेला दिसताच दर्यापूरचे आमदार गजानन लवटे यांनी तत्काळ आपले वाहन थांबवून जखमींना आपल्या वाहनात बसवून उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. तसेच रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांना तातडीने योग्य उपचार करण्याच्या सूचना देत, स्वतः उपस्थित राहून जखमींची विचारपूस केली व त्यांना आवश्यक ती सर्व मदत उपलब्ध करून दिली.



काल (दि.३०) अंजनगाव दर्यापूर मार्गावर कुंभारगाव फाट्याच्या समोर सायंकाळच्या सुमारास दोन दुचाकीची धडक झाली. यात दोन जण जखमी झाले होते. याचवेळी दर्यापूरचे आमदार गजानन लवटे हे दर्यापूरकडे येत असतांना त्यांना अपघात होऊन दोन जण जखमी झाल्याचे दिसले. त्यांनी आपले वाहन थांबवून अपघातातील जखमीना स्वतःच्या ☞(पान २ वर)

# मेळघाटातील 'कुटीर' साडीला जागतिक स्तरावर मान्यता

## ऑस्ट्रेलियन विचारवंत बार्बरा ओ'नील यांनी परिधान करून केले कौतुक

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्ह्यातील दुर्गम मेळघाट परिसरातील आदिवासी व ग्रामीण महिलांच्या कौशल्याला आता थेट आंतरराष्ट्रीय स्तरावर (दि.३१) मोठी मान्यता मिळाली आहे. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या विकेंद्रित सोलर चरखा समूह कार्यक्रमांतर्गत कस्तुरबा सोलर खादी महिला समितीच्या महिलांनी तयार केलेल्या 'कुटीर' ब्रँडच्या



साडीने जागतिक स्तरावर आपला प्रभाव पाडला आहे. दिल्ली येथे आयोजित 'लिव्ह वेल, लिव्ह नॅचुरली' या कार्यक्रमात ऑस्ट्रेलियातील प्रसिद्ध आरोग्य व नैसर्गिक जीवनशैली प्रचारक☞(पान २

# मंत्री नितीन गडकरी यांनी घेतली भाजपचे जेष्ठ नेते अरुण अडसड यांची सदिच्छा भेट

## -अरुणोदय वर जुन्या आठवणींना उजाळा

**धामणगाव रेल्वे/ प्रतिनिधीः-** आमगाव ते खामगाव अश्या शेतकऱ्यांच्या न्यायासाठी काढलेली कापूस दिंडी यात्रा ,बहिरम येथील शेतकऱ्यांसाठी केलेले आंदोलन, विधानसभा अधिवेशनात विदर्भातील त्या काळात मांडलेले प्रश्न , विदर्भ वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष असताना त्यावेळी भाजपचे जेष्ठ नेते अरुण अडसड यांनी रस्ते,पाणी व ज्वलंत समस्या सोडविल्या अश्या एकापेक्षा एक प्रश्नाला आज केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी उजाळा दिला.



अमरावती येथील अरुणोदय निवासस्थानी भाजपा चे ज्येष्ठ नेते अरुण अडसड यांची ना . गडकरी यांनी भेट घेतली. भाजपाच्या कार्यकर्त्यांचे कवच कुंडल☞(पान २ वर)

# वडनेर गंगाई येथे १६ लक्ष रुपयाची धाडसी चोरी

**खल्लार/प्रतिनिधीः-** येवदा पोलिस स्टेशन हद्दीत येणाऱ्या वडनेर गंगाई येथे धाडसी चोरी झाली असून चोरट्यानी १६ लक्ष रुपयांचा मुद्देमाल लंपास केला आहे.

गोपाल मधुकर रेवस्कर हे २६ मे रोजी बाहेरगावी गेले असता घरी कोणी नसल्याचा फायदा घेऊन चोरट्यांनी चोरी केली. गोपाल रेवस्कर घरी परत आल्यानंतर मुख्यदाराचे कुलूप व्यवस्थित होते.परंतु घराच्या आत मधिल दाराचे कुलूप आणि कळीकोंडा तुटल्या अवस्थेत




आढळले. त्यांना संशय येताच त्यांनी घरातील अलमारी पाहली असता अलमारीचे दार व्यवस्थित लागलेले होते.परंतु आतमधील लॉकर तोडून त्यामधिल साडेचार लाख रुपये नगदी आणि ११५ ग्रॅम सोने असे १३ लक्ष ५०० रुपयांचा ☞(पान २ वर)

# प्रशासनाला वारंवार निवेदने देऊनही दखल नाही

# हतबल होऊन श्री विठोबा संस्थान उच्च न्यायालयात

## -ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास कामांतर्गत गट क्र. ५ मधील संरक्षण भिंतीचे काम तात्काळ स्थगित करा

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** तालुक्यातील प्रसिद्ध कापुराची यात्रा म्हणून ओळख असलेल्या सावंगा विठोबा येथील श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान परिसरात सुरू असलेल्या ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास कामांबाबत गंभीर आक्षेप नोंदवत संस्थानने अखेर उच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावले आहेत. प्रशासनाला वारंवार निवेदने व स्मरणपत्रे देऊनही कोणतीही दखल घेतली गेली नसल्याचा आरोप करत, संस्थानने गट क्रमांक ५ मधील संरक्षण भिंतीचे काम तात्काळ स्थगित करण्याची मागणी केली आहे. संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या कामांमध्ये गट क्रमांक ५ मध्ये संरक्षण भिंतीचे बांधकाम सुरू आहे. मात्र या कामापूर्वी संबंधित जागेचे प्रत्यक्ष मोजमाप व सिमांकन करण्यात



आले नसल्याचा आरोप संस्थानने केला आहे. त्यामुळे बांधकामात अनेक तांत्रिक त्रुटी व विसंगती निर्माण झाल्या असून चुकीच्या ठिकाणी संरक्षण भिंत उभारली जात असल्याचा दावा करण्यात आला आहे. संस्थानच्या म्हणण्यानुसार, या संरक्षण भिंतीमुळे परिसरातील काही लहान मंदिरे पाण्याखाली जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. तसेच☞(पान २ वर)

# महात्मा फुले अर्बन को-ऑप. बँकेला ना. नितीन गडकरी यांची सदिच्छा भेट

**अमरावती/प्रतिनिधीः-** महात्मा फुले अर्बन को-ऑप. बँक लि. शेगाव - रहाटगाव रोड, अमरावती येथे ना. नितीन गडकरी केंद्रीय मंत्री (रस्ते वाहतूक व महामार्ग) भारत सरकार यांनी सदिच्छा भेट दिली व बँकेच्या प्रशासकीय इमारतीची पाहणी केली व प्रशांसा केली. यावेळी त्यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेला व महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले आणि स्वर्गीय विनायकराव उर्फ



दादासाहेब कोरडे यांच्या प्रतीमेला हाराअर्पण करण्यात आले.

यानिमित्ताने बँकेच्या वतीने ना. नितीन गडकरी यांचे स्वागत व सत्कार बँकेतर्फे शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन बँकेचे अध्यक्ष दिलीपराव लोखंडे, उपाध्यक्ष प्रमोदराव कोरडे व संचालक राजेंद्र आंडे यांनी केला, तसेच बँकेची स्मरणिका भेट दिली.

याप्रसंगी नितीन गडकरी यांनी मनोगत व्यक्त, करताना म्हटले की महात्मा फुले बँकेची स्थापना माजी मंत्री माझे सहकारी स्व. विनायकराव कोरडे यांनी केली व याचे उद्घाटन १० मार्च २००० ☞(पान २ वर)

# डॉ.नितीन फडणवीस यांचे निधन

**नागपूर/प्रतिनिधी :** मूळचे नागपूरकर आणि



हैदराबादच्या इंडियन इंस्टिट्यूट आफ केमिकल टेक्नालॉजीचे निवृत्त वैज्ञानिक डॉ. नितीन फडणवीस यांचे आज दुपारी हैदराबाद येथील अपोलो इस्पितळात निधन झाले . ते ७१ वर्षांचे होते.

त्यांच्या मागे पत्नी गीतांजली, मुलगा मिहिर आणि भाऊ-बहिणी असा परिवार आहे. भरतनगरचे जुने रहिवासी कै. वसंतराव फडणवीस यांचे ते पुत्र होत.

# निवडणूक निरीक्षक डॉ.ह.पि. तुम्मोड आज अमरावतीत दाखल होणार

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र विधान परिषदेच्या १६ स्थानिक प्राधिकारी मतदारसंघातून निवडून आलेल्या सदस्यांची मुदत संपली आहे. त्यामुळे रिक्त होणाऱ्या या १६ जागांसाठी भारत निवडणूक आयोगाने १८ मे २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या पत्रकान्वये निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. या अंतर्गत अमरावती स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाची द्विवार्षिक निवडणूक येत्या १८ जून २०२६ रोजी पार पडणार असून, २२ जून २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे. या निवडणुकीच्या अनुषंगाने, निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्त केलेले महाराष्ट्र राज्य कामगार



आयुक्त डॉ. ह. पि. तुम्मोड (भा.प्र.से.) हे सोमवार, दि. १ जून २०२६ रोजी अमरावती येथे येत आहेत. त्यांच्या निवासाची व्यवस्था शासकीय विश्रामगृह, अमरावती येथील 'तापी' या कक्षात करण्यात आली आहे. निवडणूक प्रक्रियेशी संबंधित काही तक्रारी असल्यास किंवा त्यांच्याशी संपर्क साधायचा असल्यास, ते सकाळी १० ते सकाळी ११ या वेळेत उपलब्ध असतील. नागरिक किंवा संबंधित व्यक्ती त्यांच्याशी ८९९९१०८९१२ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधू शकतात, अशी माहिती उप जिल्हा निवडणूक अधिकारी, अमरावती यांच्याकडून देण्यात आली आहे.

# गौरखेडा पारधीबेड्यावर पोलिसांची धाड

## -८४ हजार लिटर मोहाचा सडवा नष्ट -९.८८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधी-** चांदूर रेल्वे पोलिसांनी अवैध गावठी दारू निर्मिती करणाऱ्या हातभट्टीवर धडक कारवाई करत तब्बल ८४ हजार लिटर मोहाचा सडवा नष्ट केला. या कारवाईत सुमारे ९ लाख ८८ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त व नष्ट करण्यात आला असून, एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चांदूर रेल्वे पोलिसांना ३१ मे २०२६ रोजी गुप्त माहिती मिळाली की, ग्राम गौरखेडा येथील पारधीबेड्यावर गिरीश सुभाष पवार हा आपल्या साथीदारांसह मोहाचा सडवा व इतर रासायनिक पदार्थांचा



वापर करून अवैधरित्या गावठी दारूची निर्मिती करत आहे. माहितीची खातरजमा करून पोलीस निरीक्षक अजय आकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने तत्काळ घटनास्थळी धाड टाकली. कारवाईदरम्यान प्रत्येकी २०० लिटर क्षमतेचे ३२ प्लास्टिक ड्रम व १० लोखंडी ड्रम मोहाच्या सडव्याने भरलेले आढळून आले. या ड्रममधील एकूण ८४ हजार लिटर मोहाचा सडवा, ज्याची अंदाजे किंमत ८ लाख ४० हजार रुपये आहे, तो जागीच नष्ट करण्यात आला.

याशिवाय दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारे नवसागर, गूळ, लोखंडी पिपे, टोपल्या, कढई, पाइप तसेच इतर आरोग्यास अपायकारक साहित्य जप्त करण्यात आले. जप्त व नष्ट करण्यात आलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत ९ लाख ८८ हजार ८०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.☞(पान २ वर)